म.ग्रं.सं. ठाणे
विषय : निबंध
सं. क्र. : ६०७

साहित्य २

# ::: आदेश विरुद्ध अत्रे :::

( मूळ लेख व उलट तपासणी )

संपादक:—

पुरुषोत्तम भास्कर भावे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

ळी पौर्णिमा
र्च १९४४ ) ( मूल्य २ रुपये.

| फिर्यादी : | आरोपी : |
| --- | --- |
| श्री. प्र. के. अत्रे | श्री. वि. घ. देशपांडे |
| | श्री. शं. शा. बूट |
| | श्री. पु. रा. खांडवेकर |
| | श्री. ल. बा. चलपे |
| | श्री. बा. व्यं. हरदास |
| | वकील : |
| वकील : | श्री. के. आर. भेंडे |
| श्री. एम्. एन्. तळपदे | श्री. एन्. एच्. हेळेकर |

(१) सर्व अधिकार प्रकाशकाचे स्वाधीन आहेत.
(२) वेष्टनावरील व्यंगचित्र श्री. गोडसे ह्यांचे आहे.

प्रकाशक :
**पुरुषोत्तम भास्कर भावे,**
सिताबर्डी, नागपूर.

मुद्रक :
**पु. रा. खांडवेकर,**
गोपाल प्रिं. प्रेस, महाल, नागपूर.

# —: अनुक्रमणिका :—

**अत्रे–आख्यान :**


(१) सत्याचे प्रयोग व सट्ट्याचे प्रयोग !
(२) मोहनबाबांचा " भक्त प्रल्हाद " !
(३) होलिकाचार्य प्र. के. अत्रे.
(४) ग्वालेरकरणीच्या तमाशांतील सोंगाड्या !
(५) सेनाखासखेल, समशेर बहादर, प्र. के. अत्रे !
(६) हाय–हाय–बाबूराव ! हाय–हाय–अत्रे !
(७) अत्र्यांचे बातरे व पुण्याचे पैजार !
(८) प्रल्हाद केशवाचा मस्तक–झेंडू !


**उलट तपासणी : ( प्र. के. अत्रे )**


(१) आचार्य व वनमाला ह्यांचा प्रथम परिचय !
(२) सोसायटी कां सोडली ?
(३) सुधाबाई अत्रे व वनमाला !
(४) पडद्याआडचे शालाविसंगत दृश्य !
(५) अत्रे वनमालेचे पालक, मालक, कीं चालक ?
(६) प्रल्हाद केशवाची मुग्ध दुःखे !
(७) संगीत साधना, नृत्यसाधना, व द्रव्यसाधन.
(८) तिच्या सौंदर्याचे उपयोग !
(९) न त्याग, न सेवा !
(१०) डॉक्टरांनी दिलेला एकच पेग !
(११) प्रो. फडके काय ढोसतात ?
(१२) फडके व कमल ह्यांचे " जुझू " !!

(१३) सौ. सुधा अत्रे ह्यांचे पत्र !
(१४) फडक्यांच्या पश्चिम तनूवर चपला !
(१५) घरांत ठेवलेली परनार !
(१६) सुशिला सावंत कीं सुशिला अत्रे ?

---

**उलट तपासणी:** ( पां. वा. गाडगीळ )

(१) रात्री केलेले कमी जास्ती !
(२) वनमाला क्रॉसवरील अधिकार !
(३) टि. म. चा. वा. वि. !

---

**पुरवणी पत्रें:**

(१) बापाचें मुलास पत्र !
(२) अत्रे पत्रे व तारा !

---

# पुकारा !

श्री. प्र. के. अत्रे हे हाडाचे खेळाडू असल्याविषयींच्या कित्येक वदंता माझ्या कानावर होत्या. आपण एक अव्वल दर्जाचे Sport असल्याविषयींची लेखी व तोंडी ग्वाही श्री. अत्रे ह्यांनीं देखील वारंवार भरलेली आहे. श्री. अत्रे ह्यांचा खेळाडूपणावरील दावा ही एक सोईस्कर "फेक" (Pose) आहे, अन्यांनीं सुरू केलेला खेळ दोहाती होऊन तो त्यांच्या विशालवपूशीं पुरता येऊन भिडला, म्हणजे त्यांचे खरेखुरे चिडखोर, असहिष्णु व दांभिक स्वरुप व्यक्त होतें, असेंहि कित्येक जाणकारांचें निदान आहे. दुसऱ्याच्या अंगावर मोठ्या उत्साहानें चिखलाच्या टोपल्या रित्या करणाऱ्या होळीच्या होळकरानें, त्याच खेळाचा अपरिहार्य भाग, म्हणून दुसऱ्याकडूनहि चार शिंतोड्यांची अपेक्षा करावयास हरकत नाहीं. परंतु श्री. अत्रे निरचित क्रीडा नियमांत दुसऱ्या कोणाच्या प्रतिकारात्मक क्रीडाकौशल्यास बिलकुल थारा नाहीं ! गालीप्रदानाचा सारा खेळ एकमुखीं असावा, असा त्यांचा मोठा विलक्षण व गैरवाजवी हेका आहे !

श्री. अत्रे ह्यांनीं कोणावर अब्रूनुकसानीची फिर्याद गुदरणें म्हणजे एखाद्या सराईत व धंदेवाईक खिसेकापूनें आपणांस गर्दींत पोहोंचलेल्या कलात्मक उपसर्गाविषयीं पोलिसठाण्यावर जाऊन आकांत मांडण्यासारखें आहे. तथापि नैतिक दृष्ट्या जें कधींहि अस्तित्वांत नव्हतें, ते वैधरीत्या सिद्ध करून घेण्याचा आटोकाट विनोदी प्रयत्न मास्तर महाशयाकडून वारंवार घडला, व त्यांच्या त्या भीम प्रयत्नांस कधीं सपशेल शरणागतीचे, कधीं शिस्तवार माघारीचे, तर कधीं दूरदर्शीत्वापोटीं जन्मलेल्या " खेळाडू " समेटाचे रसाळ पण विचित्र फळ आलें ! आधींच फुगीर प्रकृतीचे असणारे अत्रे, दूत दास व दोस्त ह्यांचें करवी विविध प्रसंगीं आणि विविध हेतूंनीं सात्विक संतापाच्या व नाटकी शौर्याच्या वाऱ्यानें फुलविलें गेलें, व आत्मलुब्धतेच्या त्या नशेंत त्यांना बलाबलाचा

व सुक्तासूक्ताचा सर्वस्वी विसर पडला. स्वतःच्या तत्त्वनिष्ठेची, स्वतःच्या प्रामाणिकपणाची, स्वतःच्या समर–कौशल्याची व स्वतःच्या चारित्र्याची मोजपट्टी घेऊन अत्र्यांनीं विपक्षीय. " आदेश " ला व तरुण हिंदुत्वनिष्ठांना मोजण्याची चूक केली नसती, तर वैध शासनाचा खुंटा हलवून पाहण्याच्या प्रयासांत त्यांना जे अनेक प्रकारचे क्लेश झालें, ते कदाचित् त्यांना झालें नसते !

कोणा एका प्रसंगीं श्री. **शिवरामपंत करंदीकरां** सारख्या सज्जनाचें तोंड रंगविण्याची तोंडी वल्गना श्री. **अत्र्यांनीं** केली होती. मतभेदाचे मामले सरकार दरबारी मांडत बसणें **प्रल्हादपंतांना** मान्य नाहीं, त्यापेक्षां ते बाहुबलानें मिटवून टाकणें बरें, अशा हिशेबानें **अत्र्यांच्या** इच्छेस मान देऊन पुण्यांत सार्वजनिक रंगकामाचा एक समारंभ लगोलग पार पाडण्यांत आला. त्याच सुमारास " **आदेश** " मध्यें **अत्र्यांचें** मूल्यमापन करणारी एक लेखमाला सुरू होती. **वीर सावरकरां**विषयीं सीमेची शिवराळ व अप्रामाणिक विधानें करणाऱ्या " **नवयुग** "ला वास्तविक ती एक प्रेमाची परत-भेट होती. **साहित्याचार्य केळकरां** सारख्या गुरुजनांची टवाळी करणाऱ्या, **प्रो. फडक्यावर** कटिप्रदेशाखालीं ( Below the Belt ) तीव्रतर वार करणाऱ्या, **माटे–मराठ्यांवर** तुटून पडणाऱ्या, **शांताराम–विनायकावर** चुळा थुंकणाऱ्या, येवढेंच काय पण पांढऱ्याकोडानें ग्रासल्यामुळें सर्वस्वी काकळ, अधू, व दीन झालेल्या **भाऊराव खांडेकरांवर**हि दया न दाखविणाऱ्या **अत्र्यां**-सारख्या पठ्ठ्याला त्या लेखांची फराणी सरळ सरकारदरबारी पाठवील, अशी तेव्हां फार थोड्यांची कल्पना होती ! वास्तविक पाहतां आपल्या कांटेरी वाणीच्या व बेफाम लेखणीच्या फटक्यांनीं **अत्रे** आजवर अनेकांस घायाळ करीत आलें, व त्या वीरकृत्यांचा त्यांनीं गर्वोद्धत पंचमांत अथक उच्चार केला. कांहीं लेखांकांत फडक्यांचा संपूर्ण " बोऱ्या वाजविल्याविषयीं " **अत्र्यांना** जवळपास उन्मादवायू झाला होता! एका विशिष्ट प्रकारचे भाषण व एका विशिष्ट प्रकारचे लेखन ही त्यांना अभिमानाची बाब झाली होती. ह्या दोहोंचा सर्रास उपयोग **करून अत्र्यांनीं** अनेक दीन, दुबळे व संभावित नाडले, आणि आपल्या जवाल पीडा तंत्राचा सदैव अभिमान बाळगिला.

अशा अवस्थेत साहित्यसृष्टींत व वृत्तप्रांतांत मोकाट सुटलेल्या अत्र्यांच्या उन्मत्त वारूस जेरबंद घालून त्यावर पोलादी स्वारी करण्याचे कसब "आदेश" नें दाखविलें ! अत्र्यांच्या हत्यारांनींच "आदेशने" अत्र्यांस जेरीस आणलें व अखेर चीत केलें. भेद इतकाच, कीं अत्र्यांशीं मुकाबला घेण्यांत "आदेश" चे उद्देश स्वार्थाचे, रामोशिगिरीचे अथवा नसत्या घमेंडीचे नव्हते. आणि "आदेश"ची निरपवाद भूमिका हीच "आदेश" ची ह्या दीर्घकालीन द्वंद्वातील एकमेव रक्षक व प्रेरक शक्ती होती. एरवी लेखनपाटवाची बाब वजा केल्यास ह्या खटल्यांतील फिर्यादी श्री. अत्रे ह्यांस उपलब्ध असणारी कोणतीहि साधन सामग्री "आदेश" ला कधींच उपलब्ध नव्हती. अत्रे ह्यांचेपाशीं दर्शनी व चलनी हुंड्यांची वाण नव्हती, एका संपन्न व संघटित पक्षाचा त्यांस आसरा होता व आपल्या शीलाची सार्वजनिक धुलाई त्यांना मंबापुरीच्या स्थानिक न्यायालयांतच करून घ्यावयाची होती—त्यासाठीं पांचशे मैलांचे अंतर तोडत येण्याची आपत्ती त्यांच्यावर येणार नव्हती.

आणि म्हणून आपल्याच खेळांत आपणावर कडी करणाऱ्या विपक्षियाचे मनमोकळया व अभिजात खेळाडूपणें अभिनंदन करण्याऐवजीं "आदेश" च्या अडचणींचा व मर्यादांचा हिशेब करून एका प्रस्फूर्त क्षणांत अत्रेमहाशयांनी त्या पत्रावर फिर्याद गुदरून टाकली. ज्या वृत्तपत्री लेखनाच्या अघाडीवर फडके ह्यांचा बोऱ्या वाजविल्याविषयीं अत्र्यांनी जयनाद केले, त्याच लेखनाच्या आघाडीवर स्वतःचा संपूर्ण बाजा वाजविल्याविषयीं व आपलें पाय "आदेश" करवीं नीटसपणें कटिप्रांताला टेकल्याविषयीं अत्र्यांची ही सपशेल मान्यता होती. शब्दबंबाळ अत्र्यांनी स्वतःच सुरू केलेला खेळ पुरता करण्याऐवजीं खेळाडूपणाचें सर्व नियम व स्वतःची दिग्विजयी परंपरा काखोटीस मारून सरळ न्यायालयाच्या दिशेनें धूम ठोकावी, ह्याचा दुसरा कोणताहि अर्थ शक्य नव्हता. अत्रे-विरूद्ध आदेश ह्या द्वंद्वाच्या पहिल्या लेखनविषयक फेरांत अत्र्यांचा पार फज्जा उडाला होता !

पण जें होणार होतें, तें जें झालें, त्यामानानें फारच भयंकर होते! अत्र्यांच्या झोंड लेखनशैलीचा दिमाख "आदेश"नें उतरवून ठेवावा, अत्र्यांची शद्बमात्र असणारी शक्ती "आदेश"नें कुटून काढावी अत्र्यांच्या शिवराळ सामर्थ्याचा बडिवार "आदेश"नें छिनावून घ्यावा; हे रामोशीगिरीच्या कीर्तीचे उपयुक्त भांडवल करणाऱ्या लेखकास हानीकारक होतें ह्यांत संशय नाहीं, आणि कदाचित् म्हणूनच आपणांस पुरून उरणाऱ्या "आदेश"चा पक्का "बंडोबस्ट" करण्यासाठीं प्रल्हादपंत अत्रे न्यायालयाच्या निसरड्या पायरीवर घाईघाईनें पदार्पण करते झाले! एरवी एक तथाकथित खेळाडू व निष्ठावन्त गांधीजन ह्या दोन्ही परींनीं सरकारी न्यायालयें त्यांस वर्ज्य होतीं. येवढेंच काय पण न्यायालयांचा व क्षमायाचनांचा कांहीं थोडा अनुभवहि अत्र्यांच्या संग्रहि होता. आणि तरीहि त्यांच्या हातून होऊं नयें ती गोष्ट पुन्हां एकदां झाली.

कांचघरांत वसतीस असणाऱ्या भाग्यशाली प्राण्यांस देखील पराया घरावरील दगडफेंकीचा खेळ सहसा परवडत नाहीं. मग श्री. अत्रे तर काय बिचारे अगदीं उघड्यावर व उघड्यानें बसले होते! त्यांच्या ह्या स्वरूपाची दिक् वाटूनच आजवर कित्येकांनीं त्यांचा परामर्ष घ्यावयाचें मनांत आणलें नसेल इतकेंच! पण स्वतःच्या व आपल्या अनेक लफड्यांच्या भोंवतीं पारदर्शक व ठिसूळ कांचेचेंहि आवरण नसतां, इतरांच्या नागरतेवर व कातरतेवर नितांत विश्वास ठेऊन अत्र्यांनीं गोटमारीचा एक यशस्वी खेळ कांहीं काळ खेळून दाखविला व यथावकाश त्या खेळांत त्यांस अधिक जिद्दीचा व निष्ठेचा प्रतिपक्षी अपरिहार्यतेनें भेटून त्याचें सारें आंग त्या खेळांत ठेंचून निघालें! जें शोधूं नये, असे नदीचें मूळ व आचार्यांचें कूळ पूर्णांशानें शोधलें गेलें व स. प महाविद्यालयांत झाली नसेल येवढी अत्र्यांची बदनक्कर पुन्हां एकदां सार्वजनिक रित्या झाली! आदेश-अत्रे खटल्याच्या निमित्तानें भयानक प्रसिद्धीचे येवढे असह्य व विदारक झोत आचार्यांच्या अज्ञात व अंधाऱ्या आयुष्यखंडावर पडूं लागले, कीं सामान्यतः प्रसिद्धीचा विलक्षण हपाप बाळगणाऱ्या आचार्यांना देखील त्या प्रखर प्रसिद्धीपासून पळवाट शोधण्यासाठीं समेटाची कवाडे जीवाच्या होडीनें ठोठावणें अवश्य

वाटलें ! गंजबसवड्याचा रोमांचकारी इतिहास, मे १९३९ मधील एक भाग्यशाली जन्मदिवस, सासवड येथें झालेले एक विशिष्ट शूटिंग, इत्यादींचा रोमहर्षक परिचय जनतेला होण्याच्या सुमारासच अत्रे ह्यांच्यांतील आतांपर्यंत सूडाच्या वेष्टनांत सूप्त असणारा खेळाडू जागा झाला व सहास्य मुद्रेने त्यानें आदेश-अत्रे खटल्यावर पश्चात्तापपूर्वक पडदा टाकून समेट घडवून आणला ! ज्या घाईनें अत्रे "आदेश" चे पारिपत्य करावयास धाऊन गेले, त्यापेक्षां कितीतरी अधिक घाईनें ते रंगणांतून पळत सुटले ! कोणताहि शूर शिकारी ह्यापूर्वी इतक्या करुणास्पद रीतीने स्वतःच शिकार बनला नसेल ! फिर्यादीनें आरोपीच्या मागें हातरुमाल घेऊन क्षमायाचनेसाठीं स्फुंदत धांवण्याचीहि बहुधा ही पहिलीच वेळ असेल !

"बाबूराव, समेट कसा झाला ?" ह्या जिव्हारी जाणाऱ्या प्रश्नाला— "आदेशचे लोक हातापाया पडूं लागले,-म्हटलं जाऊं द्या !" असें स्पष्टीकरणात्मक उत्तर अत्र्यांनी पोटांतल्या कळा कष्टानें दाबून दिल्याचें ऐकिवांत आहे. वस्तुस्थिती बरोबर उलटी फिरवून सांगणाऱ्या अत्र्यांच्या विनोद बुद्धीचें कौतुक केलें पाहिजे. कारण खटला ऐनरंगांत चढला असतां व "आदेश" च्या वतीनें माघार सुरूं होण्याचे किंचितहि कारण नसतां, अत्र्यांच्या स्वास्थ्यदृष्टीनें खटल्याला एकाएकी समेटाची आनंदपर्यवसायी डूब खरोखरच कशी मिळाली, हा प्रश्न आजहि अनेकांना सतावीत आहे.

पण ह्या प्रश्नाचें उत्तर अत्र्यांच्या वतीनें समेटासाठीं दौडधूप करणाऱ्या त्यांच्या दोस्तांना, दासांना व दूतांना विचारलें पाहिजे. तसेंच ह्या बोधप्रद व मनोरंजक कूटप्रश्नाचें उत्तर अत्र्यांना सुधारणेची आणखी एक संधि देऊं इच्छिणाऱ्या दयाघनांना व मानवतामूलक आणि इतर जुजबी सद्हेतूंनीं प्रेरित झालेल्या कांहीं उदारहृदय हिंदुत्वनिष्ठ महाभागांना देखील विचारलें पाहिजे. ऐन बिडतीच्या प्रसंगीं अकस्मात अवतरून त्यांनीं अत्र्यांस अभयपूर्वक रक्षिलें व हिंदूंच्या परंपरागत क्षमावृत्तीचें ब्रीद राखलें. परग्रामांत चाललेल्या खटल्यापायीं ज्यांनीं "आदेश" साठीं थोडे अथवा बहुत श्रम केलें, त्यांनीं सकारण वा अकारण दाखविलेली दयाहि "आदेश" नें मान्य करून घेणें व बंधनकारक समजणें प्राप्त होतें. त्या ममतामय महात्म्यांचा

संरक्षक हात आडवा आला नसता, तर खटल्याच्या समाप्तीविषयीं व समेटाच्या तर्जुम्याविषयीं अव्वल दर्जाची आणखी कांहीं असत्यें प्रसृत करण्याची संधि प्रल्हादरावांस खचित मिळाली नसती ! कारण श्री. अत्रे हे बहुधा खेळाडू नाहींत, व निश्चितच दुराराध्य आहेत, अशीच आदेशची त्यांच्या-विषयीं भावना होती व आहे.

"अत्रे-आदेश" खटला मुंबापुरींत जवळपास वर्षभर चालला व कित्येक महिनें गाजला. अत्रे-कृत चित्रांना जेवढे प्रेक्षक व श्रोते लाभले नसतील तेवढे प्रेक्षक व श्रोते ह्या खटल्यासाठीं न्यायालयांत गर्दी करून सोडीत. मूळच्या काळ्या वर्णावर वारंवार मात करून क्षणोक्षणीं गोऱ्यामोऱ्या पडणाऱ्या व गलितधैर्य होणाऱ्या अत्र्यांचे अपरिचित चित्र अनेकांनीं त्यावेळीं डोळाभर पाहिलें आहे. अत्र्यांनी स्वतःविषयीं कौशल्यानें पसरविलेले कित्येक गैरसमज अत्र्यांच्या त्या अभिनव दर्शनानें कायमचे नष्ट झाले. श्री. अत्रे हे खरोखरच फारसे शूर नाहींत, अचाट बुद्धिमत्तेचे नाहींत अथवा विशेष प्रसंगावधानी नाहींत. ज्या पद्धतीनें अत्र्यांनी आपला "अ"कार "आदेश" च्या "आ"काराशीं लढविण्याचा प्रयत्न केला, ती तऱ्हा कांहीं त्यांच्या बुद्धीमत्तेची निदर्शक नव्हे. स प कॉलेजांत व इतर अनेक मामल्यांत त्यांचे शौर्यहि उत्तम प्रकारें कसास लागलें आहे. शौर्यापेक्षां दूरदर्शीपणाशींच अत्र्यांचा परिचय अधिक घनिष्ठ आहे आणि अत्र्यांच्या प्रसंगावधानाविषयीं म्हणाल तर ह्या पुस्तकाच्या पानोपानीं त्या गुणविशेषाचे भग्न अवशेष वाचकांच्या नेत्रांचें पारणें फेडतील ! अत्र्यांनी स्वतःच्या शौर्याचे व बुद्धीमत्तेचे धुरंदळ निर्माण करून मराठी जनतेस चकविलें असेल, तर त्यांत अत्र्यांची महत्तमता सिद्ध होण्याऐवजीं सुशिक्षित मराठी समाजाची पतितावस्था व सामान्य पातळी मात्र उत्तम प्रकारें सिद्ध होत आहे. श्री. फडके अथवा श्री. अत्रे ह्यांसारख्या सज्जनांना आपल्या अपकृत्यांचे अलंकार सार्वजनिक रीत्या परिधान करून समाजांत अग्रस्थानी वावरतां यावे, ही गोष्ट समाजाच्या सजीवतेस व सामर्थ्यास फारशी भूषणावह नव्हे. विशेषतः प्रामाणिकपणाचा वा तत्वनिष्ठेचा लेशहि अंगी नसणारे हे गृहस्थ जेव्हां संधिसाधू स्वार्थासाठीं पवित्र मूल्यें व त्यागी नेते ह्यांवरहि लीलेनें चिखल फेकावयास सरसावतात, तेव्हां त्यांचें शासन करणें अवश्य होऊन बसतें.

हिंदुमहासभा किंवा **वीर सावरकर**, प्रामाणिक टीकेचे विषय अवश्य होऊं शकतील, पण ती टीका तरी प्रामाणिक पाहिजे किंवा तो टीकाकार तरी प्रामाणिक पाहिजे. श्री. **अत्रे** ह्यांच्यासारख्या उनाड लपोटशंखाचे ते काम नव्हते. अत्रे व त्यांचे समव्यवसायी ह्यांचा कोठें तरी प्रतिरोध करणें अत्यावश्यक होते. एरवीं महासभा व **सावरकर** ह्यांवरील सवंग टीकेची ही भाडोत्री साथ अनंतकाल अशीच पसरत राहिली असती. त्यांत खेदाची गोष्ट इतकीच कीं, **अत्र्यांचा** परिणामकारक परामर्ष घेण्यासाठीं प्रतिकारकाला जवळपास **अत्र्यांच्याच** पातळीवर उतरावे लागते. पण त्याला खरोखरच कांहीं इलाज नाहीं.

**आदेश** अत्रे खटल्याच्या समारोपाविषयीं अग्रलेख लिहितांना मुंबईच्या एका दैनिकानें " ह्या खटल्यानें अत्र्यांचे सार्वजनिक आयुष्य समाप्त झालें " असें म्हणणाऱ्यांस अत्र्यांच्या सामर्थ्याची जाणीव देऊन त्यांचेविषयीं अनेक गोड अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. **अत्रे** ह्यांस सर्वस्वी " खलास " करावे. असा " आदेश " चाहि उद्देश नव्हता. " **करडईला कीडा नाहीं व वकट्याला पीडा नाहीं !** " ह्या वऱ्हाडी म्हणींतील सत्यास अनुसरून **अत्र्यांनीं** कदाचित् " **खलास** " होण्याचीहि सर्व शक्ती गमावली असेल. " खलास " होण्याची होकारार्थी (Positive) व धन क्रिया घडण्याइतका ऐवज कदाचित् त्यांचेपाशीं आतां शिल्लक नसेल ! परंतु **अत्र्यांस** अगदीं 'खलास" करावें असा " **आदेश** " चा हेतू नव्हता ! **अत्र्यांची** डंख करीत जाणारी नांगी तेवढी ठेचून टाकावी इतकेंच काय ते " **आदेश** " चें उद्दिष्ट होते. " **अत्र्यांनीं** पहिल्या प्रतीची आणखी कांहीं विडंबनें लिहिली, किंवा **वुडहाऊस** व **मोलियेर** ह्यांचे माफक सहाय्य घेऊन त्यांनीं दुसऱ्या दर्जाच्या आणखी कांहीं कथा व नाटकांचे मुईणपण पत्करलें अथवा तिसऱ्या प्रतीच्या उदंड पटकथा त्यांनीं बठविल्या किंवा " एका वर्षांत मॅट्रिक व पाव वर्षांत टी. डी " बनविण्याचा एखादा भला थोरला कारखाना त्यांनीं काढला, तर त्यांत कोणाचें काय खर्च व्हावयाचे आहे ? सहृदय सामान्याची ह्यापुढें **अत्र्यांना** जीव तोडून येवढीच विनंती असणार कीं:-कृपा करा व शौर्याचा, राजकारणाचा अथवा तत्त्वनिष्ठेचा प्रांत आतांतरी आपल्या अस्तित्वानें डागळूं नका ! तें तुमचें स्थान नाहीं ! **संत तुकाराम**, अधिक **संभाजी**, अधिक **डेमॉस्थनीज** अधिक **कालीदास** ह्यांच्या उत्कृष्ट गुणांचें संयुक्त कलम आपल्याठायीं **वठलें**

आहे, असा अविर्भाव कृपा करून आपण आणूं नका! लघुकथेचें नाटक नाटकाची पटकथा, पटकथेचा चुटका, चुटक्याचे विडंबन व त्या साऱ्यांचा अग्रलेख असा आपला आज दरिद्री साहित्यसंसार सजत आहे! आपणांस शक्यच असेल, तर हा कंगाल डोंबारीखेळ अद्याप आवरता घ्या, व कांहीं मौलिक वाङ्मय निर्माण करण्याचा प्रयत्न करा! वास्तविक-- पाहतां अनेक अनुभवांनीं, रसांनीं व रंगांनीं माखलेल्या आयुष्यभूमींत साहित्याचें उत्कृष्ट पीक निर्माण व्हावयास पाहिजे पण दुर्दैवानें आपण केवळ आर्थिकच नव्हे तर बौद्धिक दिवाळखोरीचीहि सर्व चिन्हें स्पष्टपणें दाखवित आहांत! जा—पुन्हां प्रयत्न करा! आयुष्याचा ग्रंथ प्रणामपूर्वक पुनश्च नव्यानें उघडा! आपण माणुसकीस व चांगुलपणांस सर्वस्वी पारखे असाल, असें अद्यापहि आम्हीं समजत नाहीं. कदाचित एकेकाळीं आपणांत सरलतेचा व कोमलतेचा बराच अंश असेलहि! पण आज मात्र आपण एका पापवर्तुळांत अधिकाधिक दृढतेने मग्न होत आहांत! विरोधाभासांचा चमत्कारिक जंजाळ आपल्या मानसिक बनावटींस वेढून टाकीत आहे! मनुष्यमात्रास प्रसंगोपात् खालीं खेचणाऱ्या पापमय मोहांनीं आपल्या विषयांत मात्र आतां एखाद्या जुनाट संवयीचे घोटीव स्वरूप धारण केलें आहे! पाप आणि पुण्य ह्यांची ओळख काढणें आपणांस आतां दुष्कर झालें आहे! आपल्या उद्धाराची बाब आज तितकीशी सुलभ राहिली नाहीं, तरी पण ती अद्याप असाध्यहि नाही! म्हणून एखाद्या भविष्यवाद्याच्या सात्साहिक सुरांत आम्हीं तुम्हांस ओरडून सांगतो कीं, सावध व्हा—अद्याप सावध व्हा-! ईश्वर तुमचें रक्षण करो! व तो जगन्नियंता तुम्हांस ह्यापुढें तरी सद्बुद्धी देवो!

* * *

आदेश-आणि अत्रे ह्यांचेविषयीं येवढें प्रास्ताविक निरूपण केल्यावरहि सामान्य माहितीसाठीं अधिक कांहीं गोष्टींचा उल्लेख करणें अवश्यक आहे. प्रस्तुत द्वंद्वांतील यशाचें सारे श्रेय "आदेश" लाच देण्याची जी एक प्रवृत्ति आढळून येते, ती न्यायाची नव्हे. अत्रे ह्यांचेवरील परिणामकारक मोहिम केवळ "आदेश"नें उघडली, पांचशे मैलावरून मुंबईस अनेकदां येण्यासाठीं आरोपींना अनेक प्रकारचे श्रम पडले, साधनसामुग्री व सहाय्य ह्यांची वाण ग्राहित धरूनच परिणाम झेलण्याची मानसिक सिद्धता प्रथमपासूनच आरोपींनीं ठेवली

हें खरें असलें, तरी तसा निर्वाणीचा प्रसंग अनेक पक्षपात्यांच्या, हितचिंतकांच्या व मित्रांच्या कृपेनें "आदेश" वर आला नाहीं. ह्याविषयांत आरोपींचे वकील श्री. भेंडे व हेळेकर ह्यांचा उल्लेख प्रामुख्यानें केला पाहिजे.

आदेश-अत्रे खटल्याच्या समेटाचे सूर वाजतें न वाजतें तोंच मुंबईच्या "इव्हिनिंग न्यूज" मध्यें समेटाचा अत्र्यांस सोईस्कर असा चुकीचा तर्जुमा छापविला गेला व "आदेश" चे वकील श्री. भेंडे ह्यांना त्या तर्जुम्याचा तत्काळ इनकार करावा लागला. मुंबईच्या कांहीं कांग्रेस दैनिकांनींहि अत्र्यांचे शेंकलेले मस्तक उजळ राखण्यासाठीं ह्याच मार्गाचें अवलंबन करून "Though Vanquished argues still" ह्या अत्रेयबाण्याची पाठ राखली.

त्यांतील खरी गोष्ट अशी कीं, समेटाच्या तर्जुम्यान्वयें अत्र्यांनीं आपल्या सावरकर विषयक लिखाणाबद्दल सशर्त दिलगिरी प्रदर्शित करून ते परत घेतलें. आणि आरोपींनीं दिलगिरीचें अक्षरहि न बोलतां तडजोडीसाठीं आपली वनमाला विषयक विधानें परत घेतलीं. आरोपींनीं आपली वनमाला विषयक विधानें परत घेतलीं ती केवळ तडजोडीसाठीं परत घेतलीं असल्याचा स्पष्ट व अविवाद्य उल्लेख समेटाच्या तर्जुम्यांत आहे. सात्त्विक संतापानें प्रारंभीं फणफणलेल्या अत्र्यांनीं समेटाच्या मामल्यांत अखेर आतुर पुढाकार घेऊन आपली सावरकर विषयक विधानें दिलगिरीपूर्वक परत घ्यावीत, व आरोपींनीं मात्र तडजोडीसाठीं वनमाला विषयक वाङ्‌मय माघारीं घ्यावें, ह्याचा अर्थ मार्मिक रसज्ञांना सहज लावतां येईल.

अशा रीतीनें जें अगदीं जीवावरच बेतलें होतें, तें अत्र्यांनीं कांहीं सज्जनांच्या वरदानानें शेंपटावर निभावून नेलें! अर्थात् त्या शारीरिक विशेषाची अनुपस्थिती श्री. अत्रे ह्यांस दीर्घकाल अनुभवावी लागणार नाहीं, ह्याविषयीं शंका नको. सार्वत्रिक नामोष्की व क्षमायाचना ही कोणत्याहि मानधनास असह्य वाटणारी असली, तरी श्री. अत्रे ह्यांस ती तशी वाटण्याचें कांहींच कारण नाहीं!

"फाल्गुन" कृत अत्रेविषयक लेखमाला समाविष्ट असणाऱ्या 'आदेश"च्या अंकास सतत दोन वर्षें अखंड मागणी आहे. एक तुच्छ विषय हाताळतांना देखील प्रस्तुत लेखांकांच्या कर्त्यानें भाषेचा विलक्षण

जोमदारपणा व घोटीवपणा, कल्पनेची कौतुकास्पद फेंक, उपहासाची मर्मांतक धार व अत्र्यांसारख्यांस आश्चर्यानें थक्क करूं शकेल अशा प्रतीची मातबर लेखनशक्ती व्यक्त केल्याचें कित्येक पत्रें सांगतात! अत्र्यांना येणारी गौरवपर डाक जितकी सचोटीची असेल, निदान तितकी तरी सचोटीची ही डाक अवश्य असली पाहिजे. अत्रे फडके आदि मुखंडांनीं निर्माण केलेली वादपद्धति लक्षांत घेतां, त्या विरोधानें "आदेश"ची पायाशुद्ध प्रतिकारात्मक भूमिका व "फाल्गुन" कृत ललितरम्य लिखाण वाचकांस परमपवित्र व परम आल्हादकारक वाटल्यास त्यात फारसें नवल नाहीं. दशकांनीं आलेल्या (व "आदेश"च्या दप्तरीं दाखल असलेल्या) त्या अभिनंदनपर पत्रांतील स्तुतीवर शालीनतेची व अवांतर अडत भरपूर प्रमाणांत कापून दिल्यावर देखील, केवळ त्या संपुटांत आलेल्या विशिष्ट अंकांची मागणी थांबविण्यासाठीं, प्रस्तुत पुस्तकाचें प्रकाशन करणें अवश्यक झालें होते!

ह्याखेरीज सदरहू मनोरंजक पण बोधप्रद ग्रंथास प्रकाश दाखविण्याविषयीं इतर उच्च उद्देशहि कारणीभूत झालें. महाराष्ट्रांतील यच्चयावत् मूर्ख, मंद, मद्यपी, मस्तवाल, ढोंगी, साहित्यिक रामोशी, लैंगिक साहसिक, पवित्र गुन्हेगार, धंदेवाईक देशभक्त, कसाबवृत्ति कलाकार, धवकडीबाज धर्मलंड सोदे समाजसुधारक, बाष्कळ बाईलवेडे, दैनंदिन दिवाळखोर उखडेल उडाणटप्पू, त्याचप्रमाणें बहकलेल्या बायका, नटी बनलेल्या मास्तरणी पत्नीकर्तव्यास चुकलेल्या कृत्या, बौद्धिक सहचारिणी, सुशिक्षित पण सुखार्थी कलावंतिणी, तसेंच टाकलेल्या व टाकणाऱ्या कैकाडणी, अडले काम करणाऱ्या सुईणी व स्त्रीवैद्य इत्यादि आजच्या समाजांत वाढत्या संख्येनें वावरणाऱ्या मंडळीस पाप व पुण्य आणि त्याहिपेक्षां पाप व प्रायश्चित्त ह्यांचें अनिवार्य संबंध स्पष्टतेनें दिग्दर्शित करण्यासाठीं दीपस्तंभादाखल, कांहीं सजीव पापांच्या स्मशानभूमीवर ह्या ग्रंथाचे स्मारक सद्हेतूपूर्वक खडे केलें आहे!

सितावर्डी—नागपूर.
होळीपौर्णिमा ९ मार्च १९४४ } पुरुषोत्तम भास्कर भावे

पुनश्च:—येथें समाविष्ट केलेल्या लेखमालेपैकीं सर्वच लेख श्री. अत्रे ह्यांस बदनामीकारक वाटलें नव्हतें. त्यांस विशेष झोंबलेले लेख कोणतें, हें उलटतपासणीवरून वाचकांच्या सहज ध्यानांत येण्यासारखे आहे.

# सत्याचे प्रयोग व सट्टयाचे प्रयोग !
## लक्ष्मीधर अत्रे व विलोल वनमाला !!

सर्व अधिकार रक्षित

( लेखांक: १ ) —“ फाल्गुन ” १९४१

[ वैयक्तिक टीकेपासून अलिप्त रहाण्याचें आमचें नेहमीचें धोरण असून कठोर वाक्प्रहार करण्याचें आम्ही शक्यतोंवर टाळतो. पण संभावित माणसें आपल्यासारखा नंगेपणा करूं शकणार नाहींत, या जाणिवेमुळें निर्धास्त असणाऱ्या समाजकंटकास उतार देण्यास आपद्धर्म म्हणून आम्हांस दिवसें-दिवस जास्त भडकत जाणाऱ्या अत्र्यांच्या विपारी लेखणीस तसलाच जलाल उतारा देणें सामाजिक आरोग्याच्या दृष्टीनें आवश्यक वाटते आणि म्हणूनच अत्र्यांचा समंध सशरीर पुरून टाकीपर्यंत ‘‘फाल्गुनां’’चीं लेखमाला ‘‘आदेश’’ मध्यें येत राहील. कारण समर्थांनी म्हटलेंच आहे—

घटासि आणावा घट । उद्धटासि आणावा उद्धट ।
खटनटासि खटनट । आणिला पाहिजे ॥

संपादक. ]

प्रल्हाद वल्द केशव ह्या नांवानें अखिल महाराष्ट्रांत बदनाम असणाऱ्या जिवाणूची पहेचान निदान नागपूरकरांस तरी करून देण्याची अवश्यकता नाहीं. येथें झालेल्या एका सार्वजनिक सभेत अत्र्यांच्या आडमाप शरीराची कणिक नागपूरकरांनीं यथास्थित तिंबली आहे. त्याच्या मद्यमलिन मुखाच्या दुर्गंधी बाटलीवर नागपूरकरांच्या हस्तप्रसादाची रंगीबेरंगी मोहोर झाली आहे. त्याच्या विपयत्रस्त मस्तकांत नागपूरकरांनीं मोजून खेटरें लगावली आहेत.

बेफाम भुंकणाऱ्या ह्या उठवळ गाढवाचे नरडें दाबून नागपूरकरांनीं त्यास चौखूर पळावयास लावलें आहे.

मद्यपानाच्या अतिरेकानें कधींही पडला नसेल असा शोष नागपूरकरांनीं ह्या नरकासूराच्या मुजोर मुखास पाडला आहे. ह्याच्या साऱ्या लिखाणांत जेवढी धूळ नसेल तेवढी नागपूरकरांनीं ह्याच्या मस्तकांत घातली आहे. तुरुंगाचे गज डोळ्यांसमोर दिसूं लागल्यावर ह्या गुन्हेगाराचा जेवढा थरकांप उडाला नसेल तेवढा थरकांप नागपूरी श्रोतृवर्गांतील अकाळ विक्राळ पुरुषांच्या दर्शनानें ह्याचा उडालेला आहे. ह्या लाथाळ खेचरावर नागपूरकरांनीं स्वारी केली आहे, ह्याच्या फुरफुरणाऱ्या तोंडांत कांटेरी लगाम घातला आहे, व ह्याची उतास जाणारी मस्ती जिरवून टाकली आहे.

नशाबाज नेत्रांसही कधीं दिसणार नाहीं, असा काजव्यांचा थवा ह्याच्या डोळ्यांसमोर उभा करून नागपूरकरांनीं ह्याचा असा कांहीं जोशीला "सत्कार समारंभ" केला आहे, कीं त्याची आठवण ह्याला जन्मभर राहील. जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, मद्यालयांत, स्टुडिओंत, व्हिस्कीच्या पेल्यांत, वनमालेच्या एकांत सहवासांत, उसनवट रंगेलपणाच्या ऐन भरांत, रटगोल नागपूरकरांची याद येऊन ह्याचा विरस होत असेल, ह्याची गात्रें शिथील पडत असतील, स्वतःच्या जिव्हाशूर नेभळेपणाची जाणीव होऊन शरमेनें हा चूर होऊन जात असेल.

फडक्यासारख्या कमकुवत मच्छरावर वार करून स्वतःच्या शौर्याचा डिंग मारणाऱ्या ह्या शिखंडीच्या मर्दुमकीचा मुखवटा नागपूरकरांनीं ओढून फेंकला आहे. ह्याच्या तुमानीस नागपूरकरांनीं धोब्याचें घर दाखविलें आहे. ह्याच्या गळ्यातील विलोल **वनमाला** नागपूरकरांनीं हिसकावून घेतली व शूराचे रास्त विजयचिन्ह म्हणून ती लीलेनें धारण केली.

शेळीमेंढीसारख्या गोरगरीब कवी लोकांचा काळ बनून राहिलेल्या ह्या हिंदुद्रोही लांडग्याची नागपूरकरांनीं शिकार केली आहे. ह्याच्या पापमय आयुष्यांतील एकच एक मोक्ष क्षण नागपूरकरांच्या कृपेनें ह्यास प्राप्त झाला. ह्याच्या विद्रोही, मुख-लिंपित, शराबी व शिंदळ शरीरावर ज्या क्षणी हिंदुत्वनिष्ठ

नागपूरकरांचे पवित्र पैजार पडले, तो क्षण ह्या हतभाग्याच्या आयुष्यांतील अत्यंत अभिमानाचा, महत्तम मानाचा, परम यशाचा, व दुर्मिळ आत्मोन्नतीचा होय.

आत्मनिरीक्षणाचा दुर्मिळ योग नागपूरकरांनीं त्याला दिला. सिंहावलोकनाची सुवर्णसंधि फणींद्रपुरानें ह्याला दिली. नम्रतेचा उत्तम गुण नागपूरनें ह्याला शिकविला. आध्यात्मिक कल्याणाची दिव्य कवाडे नागपूरने ह्याच्यासाठीं ठोठावली. ह्याला समजेल व पटेल अशी भाषा नागपूरने ह्याला सुनावली. व ह्या पारमार्थिक दिवाळखोरास नागपूरने कांहीं काळ अंतर्मुख व चिंतनशील करून सोडलें.

आधिभौतिक जडतेनें पछाडलेल्या, उच्चतर उद्देशांस मुकलेल्या, नैतिक मूल्यांस पारख्या झालेल्या, ह्या पंककीटकास नागपूरनें कांहीं काळ प्रकाश दाखविला व शक्तीमान् नीतिमत्तेच्या प्रकाशानें दिपलेला हा जीव नागपूरच्या वारी नंतर "बेशरम-झाड-सावली" न्यायानें गुरुस्थानीं झालेल्या नागपूरची अमूप स्तुति करीत सुटला. पादत्राण मंत्रेच्या प्रभावे करून ह्यानें हिंदुसभेच्या छेडकाण्या काढणे बंद केले, सावरकरांवरील कुत्तेभुंक आवरती घेतली, व हिंदुधर्माशीं प्रत्यक्ष झटके घेण्याचे हा टाळूं लागला. आम्हांस वाटलें हा मुरलेला पापी मोक्षाचा अर्धा मार्ग चालून गेला !

—पण जित्याची खोड त्याचा कुणीतरी मुडदा पाडीपर्यंत जात नसते. प्रेमाचे मंजुळ मार्जारनाद करणारी फडक्यांची मित्री भाटीही अति झाल्यावर ह्याच्यावर उलटली व दांत आणि नखें दाखवून तिनें ह्यांस बेजार केले. फडक्यानें काढलेल्या चिडखोर वाभाड्यामुळें हा त्रस्त झाला, बेचैन झाला, ह्याला वेडाची नवी लहर आली व "नवयुगा" च्या दि. ७-९-४१ च्या अंकांत ह्यानें परत सावरकर व हिंदुसभा ह्यांच्याशी झटे घ्यावयास सुरवात केली. "सावरकर व गांधी" ह्यांची तात्याराव केळकरांनी केलेली तुलना ह्यांस फारच झोंबली, व सावरकरांच्या नांवानें मनगटें चावावयास ह्याने आरंभ केला. सावरकर हे मूठभर ब्राम्हणांचे पुढारी आहेत, ते पेन्शनरांचे पुढारी आहेत, ते लांड्या विजारी घालणाऱ्या पोरांचे पुढारी आहेत (लांड्या विजारींचा येवढा धसका अन्यास कधींपासून बसला बरें !.) इत्यादि झिंगलेली विधानें प्रल्हादजी केशवाने "नवयुगांत" नुकतीच केली आहेत. लांड्या विजारींची

विशेष धास्ती ठेवणाऱ्या व सावरकर-गांधी तुलनेच्या बाबतींत नाकावर माशी बसूं न देणाऱ्या, ह्या महाराष्ट्राच्या महान् विदुषकाचा, ह्या बंठेल वनमालेच्या लक्ष्मीधराचा, सारा साज शृंगार क्रमशः उतरवून ठेवण्याचा आमचा मानस आहे. तत्पूर्वी इसाऱ्याची सुपारी म्हणून, यज्ञपशूंस अर्पण केलेली वधमाला म्हणून, (वनमाला नव्हे!) ह्या उतास गेलेल्या बोकडाने पुढील तुलनेचा चारापाणी घेवून तुष्ट व्हावे !

# गांधी आणि अत्रे

(एक उद्बोधक तुलना)

(१) गांधी हा तोकडे कपडे घालणारा अर्धनागडा फकीर आहे. अत्रे मात्र नखशिखांत सूट घालूनही पूर्ण नंगा आहे.

(२) गांधी हा देशसेवेचे नाटक करतो तर अत्रे हा नाटकांतून देश-सेवा करतो.

(३) गांधी हा नटीसारख्या देशसेविका बाळगून बहुजनसमाजाची सेवा करतो, तर अत्रे हा देशसेविकेसारख्या नटींकरवी समाजाच्या उपयोगीं पडतो.

(४) फंड जमवितांना गांधीच्या शिष्या देहाची पर्वा करीत नाहीत, तर भांडवल जमवितांना अत्र्याच्या नटी देहभान विसरतात.

(५) गांधी सुताच्या माळा घालतो, तर अत्रे वनमाला पहेनतो.

(६) गांधी-आश्रमांत जाण्यासाठीं स्त्रिया वैवाहिक पाश तोडतात, तर अत्रे आश्रमांत जाण्यासाटीं स्त्रिया तेच करतात.

(७) अत्रे हा शब्दशूर नाहीं. तो ब्रॅण्डीच्या बाटलीविषयीं लिहितो येवढेंच नव्हे तर ब्रॅण्डीची बाटली पितोही ! पागल गांधी फक्त नियमानें असूर्यंपश्या निरा झोकतो !

(८) गांधी बकरी पाळतो तर अत्रे बकरी खातो. गांधी वजनदार पुढारी आहे, पण अत्र्यानेही कांहीं कमी वजनकांटे खिळखिळे केले नाहींत. गांधीनें नागपूरच्या सभेंत सडकीं अंडी खाल्लीं असली तर अत्र्यानें खेटरें खाल्लीं आहेत !

(९) गांधी कायदेभंग करून तुरुंगांत जातो तर अत्रेही फौजदारी कायद्यांच्या रूपानें तुरुंगाशीं ओळख ठेवतो.

(१०) पब्लीसिटीच्या जोरावर गांधीनें आपल्या साधुत्वाचा डोलारा उभारला असला, तर बेशरम प्रसिद्धीच्या जोरावर अत्र्यानें आपल्या विनोदाचा शिराळशेट उभा केला आहे.

(११) गांधींचे अर्धनग्न नवल पहावयास दूर देशाहून लोक लोटत असले तर अत्र्याच्या नागड्या मर्कटचेष्टा पहावयासहि "ही" गर्दी जमते !

(१२) गांधींनी "प्रसाद दीक्षा" काढली तर अत्र्यानें "नग्नयुग" काढलें.

(१३) सत्याच्या प्रयोगासाठीं गांधीनें राष्ट्रसेवा आरंभली असली तर "सट्टयाच्या प्रयोगा"साठीं अत्र्यानें देशभक्तीचा विडा उचलला आहे.

१३-९-४१

# मोहनबाबांचा " भक्त प्रल्हाद !
## शीखाची दाढी व अत्र्याचा कंगवा !

———※———

( लेखांक २. सर्व अधिकार स्वाधीन. )

[ संत सज्जनांचे आम्ही पाईक आहोंत. बुद्धिवादाशी बुद्धिवादानें झुंज घेणें हें आमचें ब्रीद आहे. पण अत्र्यांसारख्या नादानांशी गांठ पडली म्हणजे तुकोबारायांनी म्हटल्याप्रमाणें—

भलें तरी देऊं कासेची लंगोटी ।
नाठाळाचे काठी देऊं माथा ॥

या प्रमाणेंच वर्तन करावे लागते, त्याला नाईलाज आहे.

—संपादक. ]

" सशस्त्र युद्ध सुरू झालें तर मी पहिला पाईक होईन--हे सावरकरांचें म्हणणें आज बोलायला ठीक आहे ! १९०८ चे सावरकर असें छातीठोकपणें खास म्हणू शकलें असते, पण चोवीस तास एक शीख शरीरसंरक्षक घेवून मगच बाहेर पडणाऱ्या १९४०-४१ च्या भेकड सावरकरांच्या तोंडीं मात्र ही भाषा कशीशीच दिसते ! "

--केशवपुत्र प्रल्हाद , " नवयुग "
दि. १४ सप्टेंबर ४१

असुरपुत्र प्रल्हादाच्या अकलेविषयीं व तर्कशास्त्राविषयीं आम्हांस कधींच शंका नव्हती. पण सावरकरांवरील आपल्या दुसऱ्या लेखांकांत ह्या भ्रष्टबुद्धी काळ्या पहाडानें बेअकलीपणाचा जो सडा पाडला आहे, तो पाहून मन

विस्मयानें थक्क होते. " टाक माझा दीड पैसा " म्हणून भरल्या बाजारांत रिंगण घालून पोट जाळणाऱ्या एखाद्या अर्धनारीनटेश्वरानें सावरकरांच्या नांवाने बोटे मोडून त्यांच्यावर भेकडपणाचा आरोप केला असता तरी आम्हांस जास्त आश्चर्य वाटलें नसतें! अत्र्यानें सावरकरांस भेकडपणाविषयीं हिणविणें म्हणजें कर्दमांतील गांडूळानें फणीधरासमोर वीरश्रीयुक्त वळवळ करणें होय. जनान्यांतील कंचुकीनें अनेक समरप्रसंग गाजविणाऱ्या शूरांस युद्धशास्त्रावर धडे देणें होय, पांचव्या प्रतीचीं सिनेमा कथानकें लिहिणाऱ्या दरिद्री खर्डेघाशानें कालिदासाच्या प्रतिभेस वांकुल्या दाखविणें होय!

* * *

अत्र्यांनी सावरकरांस " भेकड " म्हणण्यांत जे अलोट धैर्य दाखविलें आहे, त्या धैर्याच्या प्रकारास "डच धैर्य" (Dutch courage) असें आंग्ल नामाभिधान आहे. दुसऱ्याच्या बायका पळविण्यास जे धैर्य लागतें, सार्वजनिक विद्यालयांत छपरी पलंग टाकून त्याचा रंगमहाल बनविण्यास जें धैर्य लागतें, स्वतःच्या बायका परक्या घरीं लोटावयास जे धैर्य लागते, त्याच जातीचे धैर्य सावरकरांसारख्या नरशार्दूलावर भीरुतेचा आरोप करावयास लागतें.

चोरट्या प्रणयाच्या अंधाऱ्या खोलीनें अंदमानांतील तुरुंगाच्या अंधाऱ्या खोलीस खिजवावे, आलोचन षंढ विलासांनीं रंगलेली शरीरें मार्जित करणाऱ्या टर्किश टबानें महासागराची पायमल्ली करण्यास सरसावावे, किंवा गहाण पडलेल्या एखाद्या चित्रमंदिरांतील नकली पिस्तुलाने २८ ब्राउनिंग पिस्तोलाची खिल्ली करण्यास धजावे, तशांतला प्रकार अत्रे ह्यानें सावरकरांस " भेकड " म्हणून केला आहे.

वास्तविक पाहतां अनंत गद्रे ह्यांनी फेकलेलें झुणका भाकरीचें ( व प्रसिद्धीचें ) तुकडे मोडण्यांत आणि आपले रुद्राक्षासारखे लांगूलचालक व लूतभरलें शरीर, परान्नावर पुष्ट करण्यांत अत्र्याच्या कर्तबगारीचा पूर्वार्ध खर्ची पडला. अत्र्याच्या गालफाडांचे जेव्हां द्रोण होते, शरीराच्या जेव्हां पत्रावळी होत्या, व हाडाच्या जेव्हां चोयट्या होत्या, तो काळ फार दूरचा नाहीं. त्या काळीं आपल्या काटकुळ्या शरीराचा " S " करून मोहनगांधीचा हा भक्त प्रल्हाद आपली देहयष्टी कुठल्यातरी उकीरड्यावर भिरकावून देत असे. त्या

काळीं इस्तरीदार कपडे ही ह्यास अज्ञात चीज होती, तेलाचे दर्शन ह्यास नरकचतुर्दशीच्या दिवशीच काय तें घडत असे, बीअरच्या बाटल्या ह्यास घासलेटच्या बाटल्यांच्या रुपानें दिसत व नटींचे दर्शन हा ह्याच्या मत्कुणत्रस्त निद्रेचा एकमात्र विरंगुळा होता !

* * *

मान मोडेपर्यंत पोरट्यांच्या गिचमीड वह्या तपासाव्यात, आठवडी परिक्षेचे पेपर नियमाने काढावेत, मंडईतून मेथीच्या चार जुड्या आणाव्यात मळून मळून "वॉटरप्रुफ" झालेले धोतर कंबरेभोंवतीं गुंडाळून घाईघाईनें शाळेकडें पळावे, व ऐतिहासिक काळीं वाढदिवसानिमित्त केलेला कोट आतां आपल्या अंगास "फिट" बसत नाहीं म्हणून सुस्कारे सोडावेत, असा ह्या गरीब मास्तरचा एकेकाळीं निरागस व करुणास्पद कार्यक्रम होता.

धोतरजोडीवर खुषकिस्मतीनें आलेल्या रंभेचे चित्र मोठ्या हिफाजतीनें ट्रंकेच्या तळाशीं पुरावे, सार्वजनिक वाचनालयांतलें एखादे पिवळें पुस्तक सफाईनें मारून त्याची आपल्या ग्रंथभांडारांत भर घालावी, "आर्यन्" सिनेमाच्या द्वारपालानें कृपाकटाक्षाची खैरात केल्यास हर्षोत्फुल्ल व्हावें, "विदाऊट लाईट" जाण्याविषयीं पिवळ्या बागुलबोवानें दरडाविल्यास घामाझोकल व्हावें आणि क्रमिक पुस्तकांतील थोर पुरुषांच्या चरित्रांतून स्फूर्तीच्या ओंजळी भरून घेत स्वतःच्या मोठेपणाची दिवास्वप्नें पाहावींत, अशी तेव्हां याच्या इवल्याश्या जीवनांतलि मुग्ध सुख दुःखें होती !

* * *

आणि त्यानंतर आत्मकरुणेच्या अशाच एका भरांत ह्यानें अनंत हरी गद्रे ह्यांच्याकडे झुणकाभाकरीचे वार लावले. त्या हिंदुत्वनिष्ट ब्राह्मणाचें मीठ ह्या बुभुक्षित अनायास चांगलेंच मानवले. ह्याच्या अंगावर दिवसांमासांनीं चरबी वाढूं लागली. आपले मळके धोतर फेडून हा हाफपॅण्ट घालूं लागला ! ह्याच्या रांकट व मलिन केसास फणीचा संस्कार होताच ह्याचें केस व काळीज उलटे फिरूं लागले ! रफू केलेला सद्रा आणि मानेवर उसवलेला कोट मिळाला तर बेहत्तर झाली, असे समजणाऱ्या ह्या कंगालास इस्तरीदार कपड्यांचा आतां शौक लागूं लागला ! "निर्भिड"मधील प्रसिद्धीच्या बालामृताची ऊब मिळतांच

हा आंगठे चोखण्याऐवजीं धीटपणें स्त्रियांकडे पाहूं लागला! हिंदुत्वनिष्ठ गद्रे कुलावतंसानें ह्यास "अनंत हस्ते" प्रसिद्धी पाजतांच ह्याच्या हाडांत सुप्त असलेला फटेलपणा उसळून आला व ह्यास "मामा"चे वेड लागलें!

* * *

सावरकरांचा शरीरसंरक्षक असणाऱ्या ज्या धिप्पाड शीखाचे आज अऱ्यास नेत्रशल्य झाले आहे, त्या शीखाचा त्या काळीं अऱ्यास सवतीमत्सर वाटत असे! आपणांस सावरकरांची खिदमतगारी करावयास मिळावी, त्यांची पायतणे पुसावयाचा मान आपणांस लाभावा, त्यांचे कपडे आपण साफसूफ करावे, त्यांच्यावर चवऱ्या आपण ढाळाव्या, त्यांचा हुजरेपणा आपण पत्करावा व त्यांची पिकदाणी आपण उचलावी, त्यांच्या तेजःपुंज प्रकाशांत खालच्या मानेनें वावरल्यामुळें मिळणारे प्रसिद्धीचें कडें व शिलेंगणाच्या इनामाचे उमरेडी पान आपल्या पदरांत पडावे, अशी त्याकाळीं दास प्रल्हादाची एकच इर्षा, एकच इच्छा, एकच आस होती! सावरकरांच्या देवडीवर त्यांच्या भृत्यवर्गाच्या मांडीस मांडी लावून बसण्याचें भाग्य आपणास लाभावें म्हणून अऱ्याने त्याकाळीं शर्थीचे प्रयत्न केले, कमालीची मिन्नतवारी केली, निकराचे वशिले लावले, व अनंत हरी गद्र्यांच्या कृपेने त्यास त्यांत कांहींसे यश मिळाले!

झुणका-भाकर सह भोजन समयीं रांगोळ्या घालणें, उष्टी सावडणें, सावरकर वाङ्मयाची प्रुफे तपासणें, सभेच्या समयीं जाजम झटकणें, सावरकरांच्या शीखाची दाढी विंचरून देणे व कधींमधीं त्या शीख शरीर संरक्षकास बदली म्हणून राहणे, इत्यादि मानाची कामें त्याकाळीं अऱ्याच्या वाट्यास येत असत

* * *

अकिंचनता, अप्रसिद्धी, शरीरपीडा, इत्यादि आधिव्याधींनी गांजलेल्या ह्या कवड्या सापावर त्या काळांत हिंदुसभेनें व सावरकरांनीं आपुलकीची, प्रेमाची व प्रसिद्धीची पाखर घातली. हिंदुत्वनिष्ठांच्या उबेने हा गारठलेला मरणोन्मुख सर्प चलनवलन करूं लागला, तरारू लागला, फुशारूं लागला.

हिंदुसभा ही त्यास त्याकाळीं प्रतिगामी वाटत नव्हती, जातीय वाटत नव्हती, संकुचित वाटत नव्हती. सावरकर हे त्यास त्याकाळीं भेकड वाटत

नव्हते, भिरू वाटत नव्हते, भित्रे वाटत नव्हते. ह्या असुरकुलोत्पन्न भक्त प्रल्हादानें त्या काळीं मोहन चरणीं मिठी मारली नव्हती. सावरकर हेंच त्याचें त्या काळचे दैवत होते. आसव व अप्सरा ह्याविषयींची ह्याची कमजोरी दिनेदिने अधिकाधिक सुस्पष्ट होत चालली असली, तरी मादक दर्पांचा व त्याहूनहि मादक कटाक्षांचा मोह, ह्यास अखेर पक्षद्रोहाच्या खोल गर्तेत लोटून देईल, हा आपले इमान विकून खाईल, हा चांडाळ अखेर आप्तजनांचे गळे कापून आपल्या गलिच्छ भोगप्रियतेचे चोज पुरविण्याइतका पतित होईल असे तेव्हां कोणाच्या स्वप्नांतही आले नव्हते.

परंतु अखेर हे विश्वासघातकी जनावर जातीवर गेले, हा सर्प उलटला, ह्या फुरशानें त्यास गोंजारणाऱ्या हातांचा कृतघ्न चावा घेतला ! –सावरकरांस "भेकड" म्हणून संबोधण्यापर्यंत ह्याच्या निरर्गल नीचतेची मजल गेली !

* * *

वास्तविक पाहतां उसन्या दिमाखाच्या अवसानांत मुसलमान मुजोरी करून गेल्यावर परिणामांच्या भयाने कांपरे भरून, क्षात्रवृत्तीचा आव आणणाऱ्या ह्या कमअस्सल क्लीबाने कित्येकदां लत्ताप्रहार करणाऱ्या बलिष्ठासमोर नाक घांसले आहे. जबरदस्ताचा सोटा कटिप्रांतावर बसतांच गांधीप्रणीत सत्यवादित्वाचे सोईस्कर स्मरण करून, नम्र क्षमा याचना करण्यांत ह्याची अवघी हयात खर्ची पडली आहे.

२०-९-४१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा

# होलिकाचार्य प्र. के. अत्रे !

## फोरासरोडवासिनींची वटपूजा !!

महाराष्ट्राचे महशूर खुषमस्करे मास्टर प्रल्हाद ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी आपली विदूषकी कानटोपी उडवत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर भेकडपणाचा आरोप केला. " अमूक माणूस भेकड आहे "— " तमक्याला मी भर बुधवारांत जोडे मारीन "— अशा वीरश्रीयुक्त किंकाळ्या छाती पिटून मारणाऱ्या ह्या नरपुंगवाचा " वनमाला क्रॉस " वर कितपत अधिकार आहे, हें पाहण्याचा प्रसंग, परशुराम कॉलेजांत नुकताच येऊन गेला. त्या प्रसंगांतील मारणारे मेल्यावर व मार खाणारा अमरपद पावल्यावर, पळपुटा वीर ठरल्यावर, व पाठ पुरवणारे नामर्द ठरल्यावर, मुडदा जीवंत ठरल्यावर व जिवंत मुडदा ठरल्यावर, एक अद्‌भूत घडलें— एक नवल वर्तलें — एक आश्चर्य जाहले ! पराक्रमांत पोरसावर कडी करणारे, शरीरबलांत बुरुड पहेलवानावर मात करणारे, आत्मबलांत गांधींना लज्जा आणणारे, अहिंसाबलांत खिस्तास मुंडी खालीं घालावयास लावणारे, मद्यबलांत कोणत्याही दहा अव्वल मद्यप्यांच्या बेरजेस चीत मारणारे, पुरुषबलांत छेलबटावूच्या गुरुस्थानीं असणारे, जिव्हाबलांत पैगंबरपुत्रांचे पीर शोभणारे, होलिकाचार्य प्र. के. अत्रे, बी. ए. बी. टी. टी. डी. ( लंडन ) हे एकाएकी धर्म आठवूं लागलें, नीतिमत्ता बोलूं लागलें, वृत्त व्यवसायिकांतील बंधुभाव स्मरूं लागलें आणि ज्ञानाचे पावित्र्य, कॉलेजांतील शिस्त, गुंडगिरींतील भीरुता ह्यांच्या नांवानें मणी ओढूं लागलें !

*　　　*　　　*

—सैतान वेदघोष करूं लागला ! फोरासरोडवरील बया वटपूजन करावयास निघाली ! लग्नबंधनाची बेडी तोडून एका भ्रमाच्या भोपळ्याबरोबर

तरंगत जाणारी स्त्री गृहसंस्थेवर पटकथा लिहूं लागली ! सदैव गटारांत बुचकाळलेली लेखणी गंगामहात्म्य आठवून अमृताशीं पैजा जिंकण्याचा आव आणूं लागली ! फडक्यांच्या आईबापांचा नीचपणें उल्लेख करणारे व सावरकरांस भेकड म्हणणारे अत्रे " चांगल्या वर्तनाविषयीं दहा नियम " — सांगूं लागलें ! !

सडक्या अंड्यांनीं व टमाट्यांनीं शरीरशोभा झाल्यामुळें एखाद्या 'फौल' खानसाम्याची कळा अंगावर आली असतांही केशराचें विलेपन झाल्याचा आव आज अत्रे आणीत आहेत. धडोतींची वस्त्रे छिनावली गेल्यावर अमरपदरुपी दिग्वस्त्रांचा अलभ्य लाभ झाल्याविषयीं हर्षाकूल असल्याचें सोंग ते दाखवीत आहेत! अंगावर खेटरें पडल्यामुळें त्या भांडवलावर निदान जोड्याचें दुकान थाटावयास हरकत नाहीं असा सूज्ञ व सात्विक विचार ते आतां करीत आहेत !

* * *

आणि ह्या पारमार्थिक विचाराचा विशेष जोर झाल्यामुळेंच हौतात्म्याच्या आनंदसमाधींत निःशब्दपणें मग्न होऊन इतिहासास आपलें कार्य करूं देण्याऐवजीं एखाद्या झोडपलेल्या सारमेयाप्रमाणें श्री. अत्रे हे केंकाकटत सुटले आहेत !

" अहो मी हुतात्मा झालो, अहो मी अमर झालों—अहो मी अहिंसा व्रताचें पालन करीत असतां Martyr बनलों " इत्यादि वाक्यांची तुळशीपत्रें वाहून शिवराळ शिव्यांची साप्ताहिक हाडकें श्री. अत्रे हे न दमतां पावन करून घेत आहेत.

क्रूसावर हौतात्म्य पावलेल्या ख्रिस्तानें वारंवार आपल्या थडग्यांतून डोकें उंचावून " लोकहो, मी हुतात्मा झालो ! " म्हणून ओरडावें व पिलाताला ( Pilate ) "च्य" कारांत शिव्या देत पचापच थुंकावें, तशांतलाच प्रकार आचार्यांनीं आज आरंभला आहे !

बऱ्या बोलानें आपल्या थडग्यांत मुकाट पडून रहावयास अत्रे मास्तर सिद्ध असते तर त्यांचें हौतात्म्य मान्य करावयास फारशी चिंता नव्हती व त्यांचें अमरपदही कुणी छिनावावयास येत नव्हते !

* * *

परंतु अतृप्त वासना राहिलेल्या माणसानें चिताभूमीवर भूतरूपानें नाचत आपल्या नांवाचा फक्कड दगड तेथें लावण्याविषयीं आग्रह धरावा, किंवा आपल्या मरणाची नीट "पब्लिसीटी" करण्याविषयीं गर्गशा मांडावा, तशांतला प्रकार अत्रे महाशयानीं आरंभला आहे !

—वास्तविक ही हुतात्म्यांची रीत नव्हे! आपल्या नांवाचे नाटक लिहिलें गेले आहे किंवा नाहीं, हे पहावयास **जोन ऑफ आर्क** आली नव्हती! आपल्या नांवानें "पार्कें" व "नगरें" निर्माण व्हावीत असा हट्ट **श्रद्धानंदांनीं** धरला नव्हता ! आपल्या पुण्यतिथीवरील दिलतोड अग्रलेख लिहून घेण्याची धडपड **संभाजी राजांनीं** केली नव्हती !

—परंतु हुतात्मा अत्र्यांची मात्र गोष्टच न्यारी आहे ! प्रसिद्धीची तृषा प्रसिद्धीनें जिरवून ह्या त्रस्त समंधास शांत करण्यासाठीं आम्हीं त्यांचे लिखाण उद्धृत करून आमच्या टिप्पणींच्या ओंजळी त्यांच्या शुष्क मुखांत सोडीत आहोत !—त्या त्यांनी गोड मानून घ्याव्यात, अशी आमची ह्या तृषित हुतात्म्यास प्रार्थना आहे.

* * *

" अशा मारामारीच्या गर्दीत मी कसाबसा व्यासपीठाच्या दरवाजापर्यंत पोंहोंचलों ! "

( नवयुग ५-९-४१ )

सिनेमांतील सेनासारंगा ! " कसेबसे व्यासपीठाच्या दरवाजापर्यंत " पळत जाणें हे तुझ्यासारख्या वीरपुंगवास शोभले काय ?

"...मी माझें बळ एकवटून पुढें चाललों व कॉलेजच्या पटांगणांत आलों.......पोर्चमध्यें गेल्यानंतर लोखंडी गजांचा सरकता दरवाजा कुणीतरी अर्धवट उघडला. मी आंतमध्यें गेलों.—"

( कित्ता )

—जीवाचाड माघार घेत लोखंडी गजाच्या दरवाजाआड छपण्याचा प्रयत्न करणें, हें सत्याग्रही वीरा—! तुला शोभलें काय ?

" रविवार असल्यानें प्रत्येक वर्ग आणि कॉमनरूम कुलुपबंद होती. कॉमनरूमच्या कोपऱ्यांत आलो आणि तेथें माझा मार्ग खुंटला. तेथून परतहि फिरतां येईना व पुढेंहि जातां येईना."

—पूज्य आचार्य ! अमरतेवर अधिकार सांगणारा कोणता हुतात्मा आजपर्यंत कॉमनरूमचें कोपरे धुंडाळत धांवला होता बरें ?

" माझ्यावर हल्ला केल्याबद्दल मी विद्यार्थ्यांना दोष देत नाहीं. आपल्या अंगांतील चैतन्य त्यांनीं दाखविलें."

—मरणाआधीं मेलेल्या भेकडाच्या अंगांतही चैतन्य होते काय ?

" माझ्यावर हल्ला करणाऱ्या मंडळींत बाहेरचे पांचदहा इसम होते. सदर इसम हिंदुत्वनिष्ठ सावरकरपंथी होते."

—" टेक्स्ट बुकांत " गुंडाळलेली आपली नकली कॉंग्रेसनिष्ठा ओळखणारे व हिंदुत्वनिष्ठांच्या नांवावर आपला सूड काढून घेऊं इच्छिणारे ते छद्मवेषांतील गांधीजनच होते, ते जास्त शक्य नाहीं काय ?

" विद्यार्थ्यांना चिथावणी देण्याच्या कामीं गांवांतील कांहीं हिंदुसभेचे गुंड, कांहीं रा. स्व. संघाचे बेजबाबदार सभासद आणि इतर माझे वैयक्तिक शत्रू आहेत."

प्रिय आचार्य, खुणेची गोष्ट विचारतो ! " जुन्या " नगरकर प्रकरणाचा हिशेब चुकता करूं इच्छिणारे तर ते कुणी खवीस नव्हते ना ?

"ज्या कॉलेजच्या प्राकारांत दोनशे विद्यार्थी एक तासभर दिवसा ढवळ्या माझा प्राण घेण्याचा प्रयत्न करतात, त्या कॉलेजांतील शिस्त, सभ्यता, ज्ञानाचे पावित्र्य इ. गोष्टी काय दर्जाच्या असाव्यात ह्याचा जनतेनें शांत मनानें विचार करावा ! "

—निर्लज्ज माणसा ! शिस्त, सभ्यता, व ज्ञानाचे पावित्र्य, हे शब्द तुझ्या तोंडांत शोभत नाहींत ! नाशिक येथें पाहुणा म्हणून बिनाटिकीट दुसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या, बेहोष स्थितींत दारूच्या बाटल्या हातांत घेवून लळत लोंबत फलाटावर उतरणाऱ्या बेशरम जनावरास तूं काय म्हणशील ! मुलींच्या शाळेंत ठेवलेल्या पलंगांचा खुलासा Inspectress बाईला न देवू

शकणाऱ्या हैवानाला शिस्त, सभ्यता, व ज्ञानाचें पावित्र्य हीं कळली आहेत काय, ह्याचा तूंच निशापाणी न करतां विचार कर !

—आणि तुझ्यामागें महाराष्ट्रांतील आम युवकवर्ग असल्याचा बाडिवार तूं काय म्हणून मारतोस ? तुझी शोभा होत असतां एकानेंही तुझ्या सहाय्यास येवूं नये, हा त्यांच्या भीरूतेचा पुरावा आहे कीं तुझ्या लोकप्रियतेचा ?

"...ह्या संस्थेला महाराष्ट्रांतल्या जनतेनें कितपत आर्थिक मदत करावी किंवा ह्या संस्थेमध्यें शिक्षण घेण्यासाठीं आपली मुलें पाठवावीत कीं नाही, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. संस्थेचे सध्याचे चालक ह्यांनीं ह्याबद्दल जनतेला, ताबडतोब जाहिर अश्वासन दिले तरच जनतेचा ह्या संस्थेवर विश्वास बसेल !"

—ही "जनता" कोण ? पूर्वी एका "फुग्गा" (Bogus) कंपनीचे शेअर्स घेवून आचार्यांस "फौजदारीचा" प्राथमिक परिचय करून देणारी काय ?

—आणि स. प. कॉलेजविषयीं आचार्यांची स्वच्छ व स्पष्ट सदिच्छा तरी काय आहे ? त्या कॉलेजचे बेहोष मद्यालय व्हावे कीं रंगेल स्टुडिओ व्हावा ? त्यांत गुंड धैर्यधर निर्माण व्हावेत कीं विनोदमूर्ति लक्ष्मीधर ? धैर्यधरांच्या जादा निर्मीतीमुळें वनमाला चळेल, अशी तर धास्ती आचार्यांस वाटत नाहीं ना ?

"गुंडगिरी म्हणजे पराक्रम नव्हे !...तुम्हीं आपल्या खोलींत आरशा-समोर हातांत वहाण, सोड्याची बाटली, घेवून तुमचे पराक्रमी स्वरूप कसे दिसते ते क्षणभर पहा ! किंवा अशा तऱ्हेचा एखादा फोटो काढून घ्या."

—प्रिय आचार्य ! वहाण किंवा सोड्याची बाटली ह्यांचे लक्ष्य (Target) होणाऱ्या माणसांचें स्वरूप कसे दिसतें ते आपण आरशांत पाहिलेंच असेल ! आतां हातांत "जॉनी वॉकरची" बाटली व गळ्यांत छबेली वनमाला "ठेवणाऱ्या" पराक्रमी पुरुषाची प्रतिमा-किंवा प्रतिबिंब कसें दिसते ह्याचा आपण प्रयोग करून पहा !

" तुम्हीं मला मारण्याचा प्रयत्न केलांत, पण तुम्हीं स्वतः त्याच क्षणीं मेलांत ! तुमचें नांवही मागें शिल्लक राहणार नाहीं ! मी अजून जिवंत आहे ! "

--" निष्क्रीय चिरंजीवन तें, जे दगडालाही मिळते, धिक् तया ! "

" मला मारले असे जाहीरपणें जगाला सांगण्यांत मला केव्हांही अभिमान वाटेल ! आणि अत्रे ह्यांना आम्हीं मारलें असे उघडपणें कबूल करण्यांत ह्या भ्याड गुंडांना मरेपर्यंत शरम वाटेल ! "

--मारणारे मेले !

--मरणारा अमर झाला !

--मारणाऱ्यांना शरम वाटेल !!

--मार खाणाऱ्याला वाटणार नाहीं !

--मार खाणारा झिंदाबाद !

# ग्वालेरकरणीच्या तमाशांतील सोंगाड्या !
# मोदक, याकुती आणि आचार्य अत्रे !

## " कां न भक्षिसी गोमय ताजे,
## जठरानल शमवाया नीचा !! "

अत्रे मास्तरांवर बेहद्द फिदा असणाऱ्या कांहीं तरुणांनीं प्रसन्नतेच्या ऐनभरांत नुकतेच त्यांना हौतात्म्यपदीं नेवून बसविलें. परंतु यथास्थित खेटर-पूजेची सत्वपरिक्षा झाल्यावर महत्प्रयासानें लाभलेल्या ह्या अमरपदाचा वंशपरंपरा उपभोग घेत बसण्याऐवजीं विसाव्या शतकांतील हा कृतघ्न भक्त प्रल्हाद निष्कारण हिंदुत्वनिष्ठ नारसिंहाची आयाळ खाजवित बसला आहे. तप्त तेलांतील सोहळा, पहाडावरून कडेलोट, टमाट्यांचा वर्षाव, ह्या क्रमानें अखेर जनजनार्दनाच्या धूलिकामय चरणारविंदांचा लाभ होईपर्यंत सर्व टप्पे सुखैनैव आक्रमण करणाऱ्या ह्या दुरंगी दोगल्याचें साप्ताहिक विव्हळणें अजूनही संपलें नाहीं. आज " काळ "कर्त्यांच्या कंबरेला मिठी मार, तर उद्या **अण्णाराव भोपटकरांचा** तुमानखिसा चांचप, असा ह्याचा उद्योग सारखा चालला आहे. अलभ्य अमरपदाचा लाभ झाल्यामुळें ह्या छटेल प्रल्हादाची बरीच आत्मिक उन्नती झाली असली, तरी देहयातनांपासून अजूनही त्या जीवाची सुटका न झाल्यामुळें त्याच्या आक्रोशास खळ पडूं नये हे साहजिक आहे. " **नवयुगा** "ची पानें आपल्या अश्रूंनी डागळत बसण्याची ह्यास फारशी गरज पडूं नये, म्हणून ह्या दर्दभरल्या मरीजास आम्ही सांत्वनपर टिप्पणींचे आग करणारे, पण हितपरिणामी (कित्येक रोगग्रस्तांनी नांवाजलेले!) असे गंधक मलम कांहीं आठवडे नियमित चोळणार आहोंत. हा लूतभरला

इसम पूर्ण बरा होवून आरोग्याची किमान लक्षणें दाखवीपर्यंत आमची "ट्रीटमेंट" अशीच चालू ठेवणें, हें आमचें त्रासदायक पण पवित्र कर्तव्य होय !

* * *

"प्राणघातक हल्ल्यामधून मी सहीसलामत वाचलों म्हणून माझें अभिनंदन करणारी आणि माझ्यावर हल्ला करणाऱ्या भ्याड गुंडांचा तीव्र शब्दांत निषेध करणारीं शेंकडो पत्रें हिंदुस्थानांतून आणि विशेषत: महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून प्रत्येक डाकेनें गेले दोन आठवडे एकसारखी माझ्या हातीं येत आहेत."

"नवयुग" १२-१०-४१.

—"तेवढेंच आपलें नांव छापून आलें" ह्या उच्च उद्देशानें प्रेरित होवून आलेली चार दोन नाटपेडे वगळली, तर पोस्टमनचें कंबरडे मोडील येवढ्या वजनाची अभिनंदनपर डाक खरोखरच तुम्हांस आली काय ?

—आणि हातांत जानवें, नव्हे वनमाला धरून सांगा प्रल्हादराव, कीं अभिनंदनाखेरीज इतर जातीचा Serve you right, you cur (कुतरड्या, झालें ते ठीक झालें !) ह्या आशयाचा मजकूर असलेलीं किती पत्रें आपणांस आलीं ? आणि तीं छापण्याइतक खेळाडू नीतिधैर्य आपण दाखविलेंत काय ?

आणि अत्रे मास्तर, बनावट व नाटपेड पत्रांचा जर आपणांस इतका गर्व वाटावा, तर ज्या तरुणांनीं आपणांस यथेच्छ खेटरावलें, त्यांस गेलेल्या अभिनंदनपर पत्रांचा त्यांना किती अभिमान वाटावा बरें ! आणि तीं पत्रें आपणांस पायांपासून डोक्यापर्यंत गाडून टाकावयास पुरेशी पडतील, येवढ्या मोठ्या संख्येंत गेलीं, हें तुम्हांस माहित आहे काय ?

"कांग्रेसचे पुढारी आजमितीला कारागृहांत असले, कांग्रेसची सत्याग्रहाची चळवळ आज प्रचंड प्रमाणावर चाललेली नसली, कांग्रेसचे राजकारण आज प्रदर्शनीय स्वरूपाचें नसलें......"

नवयुग १२-१०-४१

[stamp]

—काँग्रेसचे लोक आज दारुबाजी करीत असले, गांधींचे गणंग आज परदारागमन करीत असले, काँग्रेसचे लोक आज आपली " टेक्स्ट पुस्तकें " शाळेंतून कशी लागतील ह्या विवंचनेंत चूर असले, व काँग्रेसच्या छाव्यांना आज गल्ल्यागल्ल्यांतून जोडे व फडे ह्यांचा आहेर होत असला--

--तरी " जनतेच्या अंतःकरणांत आज कांग्रेसच्याच प्रेमाचा झरा वहातो आहे "--नव्हे आचार्य ?

" मी स्वतःला कांग्रेसचा एक अत्यंत नम्र सेवक समजतो. काँग्रेसची सेवा माझ्याहातून जेवढी व्हावयास पाहिजे होती तेवढी झालेली नाहीं."

—मी अजून पुरेशीं प्यालोलो नाहीं ! मला आ-आ-आणखी-प-प्पाहिजे आहे !!

" सावरकरांवर मी ह्यापेक्षां दुसरी कोणत्याही तऱ्हेची टीका केलेली नाहीं. "

—फडक्याचे आईबाप उद्धरणाऱ्या वीरा ! लोकांनीं तुला केवळ **खेटरां-खेरीज कशानेंही मारलेले नाहीं !**

" माझा जर काय गुन्हा असेल तर येवढाच ! "

—लोकांचा " जर काय " गुन्हा असेल तर तो तेवढाच !—त्यांना मद्यपी आवडत नाहींत, शिंदळांची चीड येते व विषारी विंचू सांपडतलि त्या खेटरांनीं ठेंचून टाकणें त्यांस आपलें पवित्र कर्तव्य वाटतें."

"केसरीपत्रानें ह्या बाबतींत धरलेलें मौन अधिक बोलके झालेले आहे—! "

--जोड्यानें मारण्यापेक्षां अनुल्लेखानें मारणें प्रसिद्धिपिपासू आचार्यास जास्त लागले व झोंबलें काय ?

" सावरकरी राजकारणाचे संरक्षण करण्यासाठीं मारेकऱ्यांची गरज लागावी, ह्यांतच त्या राजकारणाचा संपूर्ण पराभव झालेला आहे--! "

--आणि गांधीराजकारणाचे संरक्षण करण्यासाठीं केशरींतल्या बायका, व दारुडे ह्यांची आवश्यकता भासावी ह्यांतच त्या राजकारणाची महती आहे !

" हल्ला करणारे दीडशेच तरुण असले, तरी माझ्या मताचा पुरस्कार करणारे हजारो स्वातंत्र्यप्रेमी राष्ट्रीयवृत्तीचे तरुण महाराष्ट्रांत पसरलेले आहेत, हें मला माहित आहे ! "

—कारण महाराष्ट्रभर दारूचे गुत्ते आहेत ! हल्ल्याचे समयीं–ते "हजारों तरुण" कोठें बरें होते ? ते केवळ कागदोपत्रीं तरुण आहेत काय ?

"सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें माझ्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्यामधून--"

—प्राणघातक हल्ला ? प्रिय आचार्य, ह्या मोठ्या नांवाविषयीं आपला येवढा आग्रह कां ? शिकार सिंहाची करीत असतात, आणि कुत्र्यास फक्त लगुडप्रहार करून केंकाटत पाठवितात !

"राजकीय पक्षभेदामुळें साध्या माणुसकीला आणि सभ्यतेलाही माणसें कशी पारखी होतात—"

नवयुग २६–१०–४१

—ते मी सावरकरांस भेकड म्हणून व फडक्यांच्या मातापित्यांचा अधम संदर्भांत उल्लेख करून महाराष्ट्रास दाखवून दिले आहे !

"प्रत्येक पाण्याच्या घोटाला शिवाजी महाराजांच्या नांवाच्या आरोळ्या ठोकणाऱ्या सावरकरांचे हे अनुयायी इतके भ्याड आहेत कीं—"

(कित्ता)

—ते चार क्षणक्षणींत थोबाडांत बसतांच गलितगात्र होऊन "कॉमनरूमची" कवाडे घट्ट लावावयास सरसावतात किंवा वनमालेच्या पदराआड तोंड दडवून ओकसाबोकशीं रडूं लागतात !

"ह्यामध्यें एकही मायेचा पूत असा नाहीं जो छाती ठोकून पुढें येईल......".

—कोणाची छाती ठोकून ?

"आणि म्हणेल कीं–हो, मी अत्रे ह्यांच्यावर हल्ला केला !"

—ते "म्हणत" नाहींत, तर ते "करतात" !!!

"नुसत्या लांड्या विजारी घालून आणि हातांत बांबूच्या काठ्या घेवून छातीमध्यें वीरश्री आणि मर्दपणा निर्माण होत नाहीं--"

--तर ती विजार देखील न घालतां हातांत दारूची "बोतल" घेवून नाशिक स्टेशनवर नाचल्यामुळें होते !

"देशासाठीं फासावर चढावयास खुदीराम बोस, कान्हेरे ह्यांची छाती लागते, ती पराक्रमाची कामें बेडूं कौलगीच्या असल्या कमअस्सल अवला-दीच्या हातून होत नसतात !"

--कान्हेऱ्यास गुरुस्थानी असणाऱ्या सावरकरांस भेकड म्हणणाऱ्या अत्र्याच्या कमअस्सल अवलादीकडून तरी ती कामें होत असतात काय ? ती कामे करणे हे दारूची पिपे रिचविण्याइतके सुलभ आहे काय ?

"ह्या गुंडगिरीवर पांघरूण घालणारी माणसें मला जास्त तिरस्करणीय वाटतात !"

--आणि गांधीजनांच्या गुंडगिरीवर खादीचे उपरणें झांकणारी माणसें ?

"हल्ले करावयाला चिथावणी द्यायची आणि वर दडपून खोटे बोला-वयाचे, हें नाझी पक्षाचें धोरण ह्या लोकांनीं पत्करलेलें दिसत आहे."

--खऱ्यांच्या मृत्यूपत्राचा मसूदा करावयाचा, डॉ. खऱ्याचा खून करावयाचा, व "मी तर कधींच मसूदा लिहिला नव्हता" म्हणून शंख करावयाचा ह्या गांधी ढंगापेक्षाही सदरहू धोरण जास्त वाईट आहे काय ?

"जनमताचा कौल नांवाची एक कविता पेठे नांवाच्या एका इसमानें ह्या प्रकरणावर लिहिली ही कविता "काळा"नें छापली."

--"नवरस मंजिरी" पेक्षांही ती कविता अधिक वैयक्तिक होती काय ? कांचघराच्या रहिवाशा ! कुणावर दगडफेंक करतोस ? गुत्त्यांतल्या किड्या, कुणाला पिकेटिंगच्या गोष्टी सांगतोस !

"त्यांत ते ह्या कवितेचे समर्थन करतांना म्हणतात--ह्या कवितेतील विधानांची टोपी रा. अत्रे ह्यांना फिट बसते असे म्हटलें आहे, ती जर त्यांना बसत असेल तर ती त्यांनीं खुशाल बसवावी."

"टोप्या" "बसवण्याचा" व टोप्या "घालण्याचा" मक्ता कोणत्या सालच्या गांधी प्रणीत "आक्तान्वयें" केवळ आचार्यांस देण्यात आला आहे ?

"माझ्याविरुद्ध बदनामीकारक मजकूर छापून त्याबद्दल कोर्टात--"

--कोर्ट ! "पौष्टिक बलवीर्यजनक औषधें अनेक ती" सेवन करून वीररसाचा परिपोष करणाऱ्या अहिंसक मर्दा ! तूं कोर्टातही जातोस आं ?

तंगडी मोडण्याची कल्पना प्रत्यक्षांत उतरविण्याचा प्रयोग तुला फारच धाडसाचा वाटतो काय ?

—"कोर्टांत नाकदुऱ्या काढण्याचा "काळ"कर्त्यांचा हा कांहीं पहिलाच प्रसंग नाहीं."

—शेंडा झडेपर्यंत गुपचुप नाक घासून आपण कोर्टांतले किती मामले दाबून टाकले आहेत व नशेच्या भरांत बेफाट लिहून गेल्यावर प्रकट क्षमा मागून किती जगांच्या चरणारविंदावर लोळण घेतली आहे, तो विनोदी इतिहास कांग्रेसच्या गुळास डकलेला हा मुंगळा, पुन्हां एकदां सांगेल काय ?

"काळकर्त्यांच्या माणूसकीचे आणि अकलेचे कसें दिवाळे वाजले आहे—"

—माणसाच्या माणूसकीचे दिवाळे वाजण्याचा कांहीं संभव तरी आहे, पण हैवानाच्या ?

"ह्या आरोपांतला एक आरोप सिद्ध करून दाखवलात तर तुम्हीं द्याल ती शिक्षा भोगावयास मी तयार आहे, नाहींतर भर बुधवारांत मी तुमचें थोबाड रंगवीन असें मी रा. करंदीकरांना आव्हान दिलें !"

—ग्वालेकरणीच्या तमाशांतील विनोदी सोंगाड्या ! थोबाडावर होणारे रंगकाम जर तुला तत्वतः पसंत असेल, तर ते रंगकाम कोणत्या विशिष्ट थोबाडावर झाले, ह्याविषयीं इतका गर्गशा कां घालतोस ?

" ......देवलांचे एक काव्य मी त्यांच्या निदर्शनाला आणतो !

बल ज्याचे त्यास ते ! मंथन विष जग जाळित सुटले......"

—देवलांची दोन काव्यें आम्हीं पूज्य आचार्यांच्या बेहोष नजरेखालीं सरकावितो !

—"श्वानाहुनी अति नीच तुम्ही रे स्वार्थी मांजरसे टपतां !"

—"कां न भक्षिसी गोमय ताजें जठरानल शमवाया नीचा ! धनलोभानें वद आजवरीं ! किती नेणत्या मूक कुमारी ! त्वां दिधल्या रे ++++करीं ! खाटिक ही तव कृतीला लाजे !

"ज्याचें बळ त्याच्या जवळ असतें! जे तीव्र आघात शांतपणें सहन करून मी पचवूं शकलों त्याची कल्पना, अनाथ विद्यार्थीगृहाच्या इमारतींतील मधुकरीनें मिळालेल्या आरामशीर खुर्चीवर कशी येणार?"

—याकुती आणि मोदक ह्यांचे सारे दवाखानें फस्त करून बसलेल्या पुरुषर्षभा! त्याची कल्पना 'गुरुदक्षिणे''चे "नाटक" करून जमवलेल्या पै–पैशावर विलायतेचा परत प्रवास करणाऱ्या तीन दमडीच्या पदरधऱ्यास तरी कशी येणार?

"अत्रे ह्यांच्या हल्ल्याबद्दल आह्मांला आनंदही वाटत नाहीं आणि वाईटही वाटत नाहीं, असें काळकर्ते शेवटीं म्हणतात!"

Neither Accept Nor reject—न स्वीकार न धिःकारचें जातियनिर्णयाबाबत स्वीकारलेलें कांग्रेसी वाक्य "काळ" नें अत्र्यांस बहाल केलें तर त्यांत उसासे सोडण्यासारखें काय झालें?

'—ह्यामध्यें त्यांच्या अंतःकरणाच्या भौगोलिक प्रदेशाचा नकाशा स्पष्ट-पणें व्यक्त होण्यासारखा आहे!'

—अंतःकरणाच्या भौगोलिक प्रदेशाचा नकाशा–काय! भूगोलाच्या मास्तरा, आतां तूं एकवार त्रिभुज प्रदेशाविषयीं कांहींतरी बोल! आणि दिवसाची मध्यरात्र कोठें होते, खचलेली दरी (Rift Valley) म्हणजे काय, ऋतुमान कसें बदलतें, ह्याविषयींहि एकएक तास घे!

"आज मजवर हल्ला झाला तसा काळकर्त्यांवर होणार नाहीं, ह्याची त्यांना हमी देतां येईल काय?"

—अहिंसक चिथावणीचा हा सोवळा प्रकार आहे काय?

"काळकर्त्यांच्या कुटुंबांतलें एखादें माणूस मेलें आणि त्यांच्या विरोधी पक्षांतल्या पत्रानें असें लिहिलें कीं—"

—अत्रे महाशय मेले आहेत काय?—कीं मारणारे मेले?—"कीं त्यामुळें आम्हांला आनंद ही होत नाहीं नि वाईटही वाटत नाहीं, तर त्यांना कसें वाटेल?"

श्रद्धानंदाच्या हत्येचा उघड धिःकार करावयास जेव्हां गांधीजन शरमलें, तेव्हां त्यांच्या आप्तांस कसें वाटलें असेल? जातियनिर्णयाबाबत कांग्रेसनें हीच भाषा वापरली तेव्हां पटापट मारले जाणाऱ्या अत्याचारित हिंदूंस कसें वाटलें असेल, ह्याचा विचार–शुंभनिशुंभा–तूं कधींतरी केला आहेस काय?

८–११–४१.

# सेनाखासखेल, समशेरबहादूर प्र. के. अत्रे !

( सर्व अधिकार रक्षित : "फाल्गुन" १९४१ )

[ "—आणि म्हणून, कोणत्याही तऱ्हेचा वैयक्तिक हेवादावा नसतांही, सार्वजनिक व वृत्तव्यवसायिक नीतिमत्तेच्या नांवानें अन्यांच्या उन्मत्ततेस त्यांना समजेल अशा भाषेंत लगाम घालणें, हें आमचें कटु पण पवित्र कर्तव्य होवून बसलें"—कारण कीं म्हटलेंच आहे :—

खलानां कण्टकानांच द्विविधैव प्रतिक्रिया ।
उपानन्मुखभङ्गो वा दूरतो वा विसर्जनम् ॥ ]

आपल्या शालेपयोगी पुस्तकामुळें पोराटोरांसही अपरिहार्यतेनें परिचित झालेले व अनेक धंदे करून महाराष्ट्रांत विपुल नांवकमाई केलेले, पुण्याचे एकेकाळचे होतकरू मास्तर श्रीमंत प्रल्हादपंत अत्रे, हे अजूनही आपल्या लोकप्रिय, नीतिमान, पवित्र व धार्मिक साप्ताहिकांत परशुरामीय प्रलयाविषयीं प्रवचन करीत आहेत.

होनोलूलू, झांजिबार, ग्रीनलंड, आईसलंड, लॅपलंड, रीओडी जेनेरो पाराग्वे, युराग्वे, जावा, सुमात्रा, इत्यादि सुदूरवर्ती प्रदेशांतून हुतात्मा अत्रे ह्यांस येणारी डाक इतकी भरगच्च आहे कीं "तिकोटे" जमविण्याचा छंद असणाऱ्या बादशहासलामत ह्यांना देखील त्यांचा हेवा वाटावा !

सहानुभूतीपर पत्रांची शेकवाटली आपल्या ठणकणाऱ्या अंगावर फिरवि-णाऱ्या अत्रे मास्तरांस **गांधी ट्रेनिंग कॉलेज** मधील गुरुवृंदानें पाठविलेलें ताजें पत्र आह्मांस विशेष हृदयस्पर्शी वाटते. "**नवयुग**" ह्या क्रांतिकारक,

अहिंसक, सभ्य व सद् वर्तनी साप्ताहिकांत पुणें नगरपालिकेच्या कित्येक कचरा-पेट्यांस लाजवील अशा पत्रांचा जो ढीग पडला, त्यांत अत्रे मास्तरांच्या ह्या समव्यवसायिक धंदे बंधूंनीं पाठविलेलें पत्र " अहंविशेष " स्वरुपाचे आहे.

" दिपुटी " समोर चळचळा कांपणाऱ्या, बढतीसाठीं " गिली-सुकी " करणाऱ्या, मासिक वेतनास सावकारपुत्रांच्या " शिकवणी " चे ठिगळ लावणाऱ्या, ह्या गरीब बिचाऱ्या मास्तरांस आपल्यापैकीं एकानें मुलांना मार देण्यापासून तो मुलांचा मार खाण्यापर्यंत, मडक्यांतल्या पाण्यापासून तो " **ब्रँडीच्या बाटलीपर्यंत,** " मुंगीच्या डोक्यापासून तो मुंगळीच्या पायापर्यंत, प्रगति करावी ह्याविषयीं सादर सखेदाश्चर्य वाटलें, तर त्यांत आम्हांस मुळींच नवल वाटणार नाहीं !

* * *

अत्रे ह्यांच्या दुसऱ्या पाठीवर आपला स्नेहाळ हात फिरविणाऱ्या ह्या शिक्षकवृंदानें " आदेश " विषयीं अत्यंत आदरयुक्त व नम्र उल्लेख केला आहे.

मास्तर लोकांची नम्र व सादर वृत्ति पाहून आम्हांस अत्यंत समाधान वाटत आहे. त्यांना रीतभात विषयक प्रशस्तीपत्र द्यावयास आम्हीं कोणत्याही क्षणीं सिद्ध आहोत. " **नागपूर मधल्या आदेशपत्राला अतिनम्रतेनें बजावतो कीं—** " ह्या विनीत भाषाप्रयोगानें आम्हांस मोहित केल आहे, नामोहरम केलें आहे !

—परंतु नॉर्मल स्कूलादि गुरुकुलांत व्यासंगपूर्वक विद्यार्जन केल्यावर, नेमस्त मासिक वेतनावर संतोषानें विद्यादानाचें पवित्र कार्य करणाऱ्या ह्या गुरुजनांच्या ज्ञानांत अधिक अचूकता यावी म्हणून आम्हीं त्यांस पुढील सूचना करीत आहोत:—(१) " **आदेश** " चे वाचन नियमित चालू ठेवावे (२) " आदेश " मधील अत्रेविषयक लेखांकांचे पठण करावे, म्हणजे त्यांचे सामान्य ज्ञान व भाषा ह्यांस पुष्टि प्राप्त होईल. (३) जुनें अंक दुप्पट मोलानें विकावयाची प्रथा " आदेश " च्या करड्या व्यवस्थापकानें पाडली असली तरी सदरहू मास्तरमंडळींच्या सोयीसाठीं जुनें अंक त्यांस केवळ भर मूल्यानेंच पुरविण्यांत येतील. अर्थात् सोबत एखाद्या हिंदुत्वनिष्ठ गृहस्थाचे शिफारसपत्र जोडणें अवश्य आहे !

* * *

श्रीमान् प्रल्हादरावसाहेब अत्रे; सेनाखासखेल, समशेर बहादर, ह्यांस पाठविलेल्या पत्रांत मास्तर लोक म्हणतात:—

" काळ व केसरी या जातीय पत्रांत आपल्यावर होणाऱ्या टीका पुनः पुनः वाचूनही आह्मां तरुणांचा आपल्या विषयींचा आदर वाढतच आहे ! "

—सर परशुराम कॉलेजांत अत्रे मास्तरांना धचोटपणें हाताळणारे युवक " आह्मां तरुणांच्यां " वर्गांत कां पडूं नयेत तेवढे मास्तरवृंदानें सांगावें. आणि अनादरणीय गुण कोणते व आदरणीय गुण कोणते त्याचेंही विवेचन करावें !

" ही विषारी वर्तमानपत्रें जोंपर्यंत आपली मनसोक्त शिवराळ निंदा करीत आहेत, तोंपर्यंत आपण शंभर टक्के राष्ट्रीय वृत्तीचे आहांत असे आम्हीं समजतो ! "

आणि ज्या क्षणीं ही पत्रें मास्तरांचें नांव टाकतील त्याक्षणीं मास्तरवृंद त्यांस काय समजेल ?

—मास्तर लोकांनीं अत्रेबोवास ओळखलें नाहीं !

अप्रसिद्धीपेक्षां कुप्रसिद्धी बरी, असे त्यांचे ह्या विषयांत स्पष्ट धोरण असल्यामुळेंच केसरीच्या तिरस्कारजन्य अनुल्लेखाची मिरची त्यांस विशेष झोंबली !

" आमच्या अंतःकरणाचा बराच मोठा भाग आपण व्यापला आहे."

--आणि उरलेला भाग ?

" प्रि. अत्रे ही व्यक्ती कोणाची खाजगी मालकीची नसून "—

—सार्वजनिक हातांच्या व सामुदायिक लाथांच्या मालकीची आहे ?

मास्तरमंडळींच्या ह्या दुखवट्याच्या पत्रांतील ' आदेश ' विषयक उल्लेख पुढील प्रमाणें आहे:—

" नागपूरमधल्या आदेश पत्राला अतिनम्रतेनें बजावतो कीं तुम्हीं अत्रे ह्यांचेवर चिडून जे बाष्कळ लिखाण लिहिता त्याचा अर्थ आह्मी हिंदी तरुण चांगलाच जाणतो. तुमचें चिडणे म्हणजे अत्र्यांचा प्रचंड विजय ! "

आमच्या विषयांत मास्तरगणांनी ' अतिनम्रता ' धारण केली नसती तरी आम्ही त्यांस क्षमाच केली असती. आधींच जर्जर अशा मास्तर लोकांस

निष्ठूरपणें वागवावयास आम्ही कांहीं कुणी "दिपुटी" किंवा "हेडमास्तर" लागून गेलो नाहीं! "बालादपि सुभाषितम् ग्राह्यम्" ह्या न्यायानें आमची वृत्ति त्यांच्याविषयीं सदैव क्षमेची व सदयतेचीच राहील! परंतु मास्तर मंडळींच्या कांहीं कल्पनांत सुधारणा व्हावी, त्यांची बौद्धिक पातळी वाढावी, नैतिक मूल्यें त्यांच्या आटोक्यांत यावी, खेटरांच्या माळेस त्यांनीं वनमाला म्हणून नावाजूं नये, व विजयमाला म्हणून तर नव्हेच नव्हे, बऱ्या वाईटाची त्यांस परिक्षा असावी, संभावित आणि बदमाष ह्यांतील भेद त्यांस कळावा, उद्देश आणि उद्देश ह्यांतील फरक त्यांनीं जाणावा; साध्य, साधन व हेतू ह्यांची संगति त्यांस लावतां यावी, अशी आमची हिंदुस्थानांतील शैक्षणिक दर्जाच्या नांवानें इच्छा असणें स्वाभाविक आहे.

श्री. प्र. के. अत्रे हे कांहीं आमचे कोणी वैयक्तिक शत्रू नाहींत. ते काळे आहेत, गोरे नाहींत, हे देखील आम्हांस केवळ तोंडीं वर्णनावरूनच कळलें. परंतु त्यांच्या अंतरंगाची ओळख मात्र आम्हांस त्यांच्या गलिच्छ लिखाणावरून झाली. एखाद्या उटवळ व बाजिंद्या बाईनें केवळ आपल्या फाटक्या तोंडाच्या व नागड्या हातवाऱ्यांच्या जोरावर साऱ्या आळीस जेर करून संभावितांची पांगापांग करावी व आपल्या पराक्रमावर बेहद्द खूष होवून स्वतःची पाठ थोपटून घेत सज्जनपीडेचा धंदा अधिक उत्साहानें पुढें चालूं ठेवावा तशांतला प्रकार श्री. अत्रे ह्यांनीं गेलीं कित्येक वर्षें चालविला आहे.

नंगेपणाला धैर्य, रामोशीगिरीला शौर्य, गुंडगिरीला पराक्रम, शिवराळपणाला वक्तृत्व, किळसवाण्या आत्मस्तुतीला प्रसिद्धी, नीच परनिंदेला निस्पृहता, निर्लज्जतेस खेळाडूपणा, अशी मूल्यांची व शब्दार्थांची उलटापालट करून श्री. अत्रे ह्यांनी आपली साहित्यिक व इतर पाळेगारी निरंकुशपणें सुरू केली!

* * *

--सज्जन, संभावित, वा दुबळे लोक जो जो त्यांना भिवूं लागले, जो जो त्यांच्या पासून जुगुप्सेनें दूर पळूं लागले, तो तो अत्र्यांच्या औद्धत्याला व मग्रूरीला नवे नवे बहर येऊं लागले! त्यांना स्वतःच्या मवालीगिरीचा

अभिमान वाटूं लागला ! त्यांना वाटलें, आतां आपला कोणी शास्ता नाहीं, त्यांना वाटलें आपला कोणी दापिता नाहीं ! घाणीच्या गाडीपासून ज्या घाईनें लोक दूर पळतात त्या घाईनें लोक आपल्यासमोर पळून जातात, हे पाहून त्यांना आपल्या नंगेपणाची उपयुक्तता पूर्णपणें पटली व त्या नंगेपणासच ते जगज्जेत्याची वीरवृत्ती म्हणून नावाजूं लागले !

--आणि मग त्यांच्या असभ्यतेला सीमा राहिल्या नाहींत, त्यांच्या अश्लीलतेला अटक उरली नाहीं, कोणाही भल्या माणसाची अब्रू त्यांच्या तडाख्यांत सुरक्षित राहिली नाहीं, साहित्यिक संभावितीची वा सामाजिक नीतिमत्तेची त्यांना चाड राहिली नाहीं !

एखाद्या माजलेल्या रेड्याप्रमाणें, वा पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें ते ज्याला त्याला इजा करीत चौखूर धावूं लागले !

* * *

—आणि म्हणून कोणत्याही तऱ्हेचा वैयक्तिक हेवादावा नसतांही, सार्वजनिक व वृत्तव्यवसायिक नीतिमत्तेच्या नांवानें अन्यांच्या उन्मत्ततेस त्यांना समजेल अशा भाषेंत लगाम घालणें, हें आमचें कठोर पण पवित्र कर्तव्य होवून बसलें.

[ २२-११-४१ ]

# हाय- हाय- बाबूराव ! हाय- हाय- अत्रे ! !

## संतांना भूतकाळ व पाप्याला भविष्यकाळ !

( नीतिमत्ता, सभ्यता व धर्म ह्यांच्या नांवानें अत्र्यांच्या अध्यात्मिक हितासाठीं मांडलेल्या सत्रांत आज अखेरची आहुती देऊन कर्तव्यमुक्त होतांना आह्मांस अमूप आनंद वाटत आहे ! )

**आचार्य प्र. के. अत्रे** ही वल्ली जेव्हां अहिंसेच्या अथवा सभ्यतेच्या बाता मारूं लागते तेव्हां आम्हांस मांसखंडाचे तुकडे करीत बुद्धगीता गाणाऱ्या खाटकाची, किंवा घाणींत यथास्थित अवगाहन करून आरोग्य शास्त्रावर प्रवचन देणाऱ्या " हरीजना "ची आठवण होते !

—डॉ. खरे, पुणें नगरपालिकेचे सहकारी सभासद व इतर ह्यांच्याशीं अत्रे ह्यांचे झालेलें वर्तन महशूर आहे. कित्येक कारणामुळें वैध किंवा अवांतर प्रतिकार करण्याइतकी मास्तर महाशयांची दखल घेऊं न चाहणाऱ्या **ना. सी. फडक्यांची** जी घृणास्पद छळणा अत्यंत अश्लाघ्य अशा भाषेंत **प्र. के. अत्र्यांनीं** केली, ती प्रो. फडक्यांच्या मार्गाशीं वा तत्त्वाशीं सहमत नसणाऱ्या व्यक्तीनांही चीड व तिरस्कार आणील अशी होती !

—आणि समाजनीतीवर, समाजसंकेतावर, सर्वमान्य शिष्टाचारावर जे उन्मत्त अत्याचार अत्र्यांनीं वारंवार केले, त्यांस यावयास नको होतें येवढें सार्वजनिक प्रकोपाचें फळ अखेर आले !

* * *

—अत्रे ह्यांच्या अविरत चाललेल्या अमानुष, असामाजिक, व तिरस्करणीय वर्तनानें उत्पन्न झालेला सात्त्विक संताप कालप्रभावेंकरून ओसरूं

लागला, म्हणजे निर्मळ मानव्यभाव, निरपेक्ष दयाबुद्धी, व केवळ करुणा ह्यांचा आमच्या मनांत उदय होतो, व अत्र्यांचे सारें ज्ञात चरित्र आठवून हृदय खेदानें व विषादानें कसें भरून जातें !

* * *

—ज्या पुण्याच्या परिसरांत अत्र्यांचा जन्म झाला, ज्या पुण्याच्या शिवेंत अत्र्यांची " बरी वाईट कर्तबगारी " घडली, ज्या पुण्याची कड घेऊन फाटक्या तोंडाच्या व माफक अकलेच्या मुंबईकर मामांशी अत्र्यांनीं दोन हात केले, त्या पुण्याच्या लोकांनीं अत्र्यांस सडकी अंडी मारावीत, त्या पुण्याच्या लोकांनीं अत्र्यांस कुजक्या भाज्या माराव्यात, त्या पुण्याच्या लोकांनीं अत्र्यांस फाटक्या पायतणांचा आहेर करावा हा दुष्ट दैवाचा केवढा दुर्विलास बरें !

* * *

—" प्रेषिताचा मान त्याच्या देशांत होत नाहीं " ही म्हण अत्र्यांच्या विषयांत खरी नव्हती ! अडाणी, शिवराळ, व संकुचित मामाच्या तोंडास परस्पर बूच बसवून टाकणाऱ्या अत्र्यांचें पुणेकरांनीं कौतुक केलें ! आपुलकीच्या नजरेनें अत्र्यांच्या लघुगुणांचे मेरूमांदार करून प्रेमळ पुणेकरांनीं त्यांस आपल्या हातांवर घेवून ऊंचावले ! थिल्लरपणाच्या रेषेपर्यंत पोहोंचणाऱ्या पण निरुपद्रवी मिस्कीलपणाच्या मर्यादा पाळूं इच्छिणाऱ्या अत्र्यांच्या पुरातन विडंबनात्मक विनोदाला पुणेकरांनीं टाळ्या दिल्या ! आजकालच्या कठीण परिस्थितीशीं झगडून आपलें नशीब काढूं इच्छिणाऱ्या ह्या होतकरू मास्तराला पुणेकरांनीं सर्वतोपरी सहाय्य दिले, सर्वस्वी आपंगिलें, आटोकाट उत्तेजन दिलें !

वार लावून " विद्या " करणाऱ्या, रातोरात सद्रा धुवून वाळविणाऱ्या, होतकरू पण खट्याळ विद्यार्थ्यांकडे ज्या आशापूर्ण क्षमादृष्टीनें पहावें, त्या दृष्टीनें पुणेकर व महाराष्ट्र तेव्हां अत्र्यांकडे पहात होता !

—अत्र्यांची अवखळ व उडाणटप्पू लेखणी वाढत्या वयाबरोबर व अनुभवाबरोबर अधिक प्रगल्भ होईल, अधिक फलवती होईल, अधिक रसवती होईल, अशा वेड्या आशा तेव्हां महाराष्ट्रानें अत्र्याविषयीं बाळगिल्या होत्या !

* * *

—पण हाय—हाय !

आईबापांस जेर करून घराबाहेर पडणारे सर्वच उडाणटप्पू रॉबर्ट क्लाईव्ह होत नाहींत ! आधारभूत फांदी कापीत सुटणारे सर्वच महानूख लाकुडतोडे कालिदास होत नाहींत ! डुकरांच्या चोऱ्या करणारे सर्वच मुरटे शेक्सपियर बनत नाहींत ! " हा मोठा वकील होईल " असे कौतुकाचे आशाळू उद्गार बालपणीं काढविणारी सर्वच मुजोर कारटी जयकरांच्या पदवीस पोंहोंचत नाहींत !

—अत्र्यांचेही तसेंच झालें ! अर्ध्या इळकुंडांत अत्रे पिवळे पडले ! अर्ध्या बाटलींत अत्रे " टेर " झालें ! कीर्तीच्या ओझरत्या प्रकाशानेंही अत्र्यांचे डोळे दिपून गेले. फिरून गेलें !

—आणि अधःपाताच्या कड्यावरून अत्रे भयानक वेगानें कोसळूं लागलें ! त्यांना जडवादाची धुंदी चढली ! नैतिक मूल्यांचा त्यांना विसर पडला ! वेषांतर, भाषांतर, व पक्षांतर, ही त्यांच्या खिसगणतींत उरली नाहींत ! सुखवादाच्या व आत्मनिष्ठेच्या घातकी चक्रव्यानें त्यांना पूर्णतया पछाडलें ! त्यांचे नैतिक आसन भंगून गेलें ! थोर लेखक म्हणून अत्र्यांचा अवतार सुरूं होण्यापूर्वींच संपला !

—तें दृश्य करुणास्पद होते, तो देखावा असह्य होता ! ते स्थिरपंतर मर्मभेद करणारें होतें ! एका होतकरू वाटणाऱ्या लेखकाचे व संभावित दिसणाऱ्या माणसाचें तें जिवंत मरण होतें ! पुणेकरांच्या व महाराष्ट्राच्या अनेक अपेक्षा आशांचें तें कबरस्थान होतें !

*    *    *

ज्या स्वरूपाचे देव्हारे माजावेत ते मोडक्या बाजारांत जाऊन बसले ! ज्या बुद्धीनें महाराष्ट्र सारस्वतें संपन्न करावीत ती बुद्धी " आंख-फरकांत " सडून गेली ! जी पात्रें अमरपद देणाऱ्या अमृतानें ओसंडावीत ती सस्त्या मद्याच्या दुर्गंधी फेंसानें फसफसूं लागली !

ज्या अलंकारांनीं देवी शारदेच्या शरीरास शोभिवंत करावे, ते एका तीन दमडीच्या पण्यांगनेवर लुब्ध होऊन मातीमोल बनले !

—आम्हीं पुन्हां ह्मणतों कीं ते दृश्य करुणास्पद होते, शोककारक होते, रडविणारें होते !

* * *

—पुन्या आकाराच्या कोंबडीचे हाडही शिल्लक न ठेवणारे अत्रे अहिंसेच्या गोष्टी सांगू लागले ! ग्रे फलाणींत आपला देह गुंडाळणारे अत्रे स्वदेशी व्रताच्या मानभावी वाती वळूं लागले ! " **साष्टांग नमस्कार** " " **वंदे भारतम्** " व " **ब्रह्मचारींत** " त गांधीतत्वज्ञानाची मनसोक्त खिल्ली करणारे अत्रे, अप्रामाणिक बाटग्याच्या मतलबी आवेशानें त्या राजकारणाची तरफदारी करूं लागले ! ज्या सावरकरांच्या चरणांच्या सावलींत अत्रे वाढले, ज्यांच्या चरणधूलीनें अत्रे पवित्र झाले, त्या सावरकरांवर स्वार्थांध अत्रे तुटून पडले ! अत्र्यांच्या बोलण्याचा ताळ सुटला, अत्र्यांच्या वागण्याचा ताळ सुटला, अत्र्यांच्या लिहिण्याचा ताळ सुटला !

—आपणाला ऊंच उचलणारे हात दुसऱ्याचे आहेत, आपणाला शरीरावर झेलून मोठे करणारे खांदे दुसऱ्याचे आहेत, त्या दुसऱ्याविषयीं कृतज्ञता, अथवा किमान संभावित दाखविणें अवश्य आहे, ही गोष्ट ज्या दिवशीं अत्र्यांच्या धुंद मस्तकांतून गेली, त्याचदिवशीं त्यांनीं पतनाचा अखेरचा टप्पा गाठला !

—ज्यांनीं वर उचलले ते खालीं झोकूं शकतात, ज्यांनीं मस्तकावर घेतलें ते पायदळीं तुडवूं शकतात, समाजाची व नीतिनियमांची निरंकुश हेळणा अमर्याद करतां येत नाहीं, ह्या सत्याची जेव्हां अत्र्यांस विस्मृति पडली, तेव्हांच त्यांचा ग्रंथ प्रस्तावना पार पडण्यापूर्वीच आटोपला !

* * *

—मेलेल्यास अधिक मारावे, पतितास परुष शब्दांनीं ताडन करावे, ह्या उद्देशानें आम्हीं आज लेखणी उचललेली नाहीं ! निर्मळ अनुकंपेनें आमचें हृदय आतां भरून आले आहे. अत्र्यांच्या उद्धाराची आम्हांस आज चिंता लागली आहे !

—अत्र्यांना खरोखरच भविष्यकाळ नाहीं काय ? अत्र्यांचा उद्धार होणें खरोखरच शक्य नाहीं काय ? ज्यानें पशूश्रेष्ठ गजेंद्राला मोक्ष दिला,

ज्यानें पापमग्न अजामिळाला उद्धरिलें, ज्यानें पिंगलेला अंतराय दिला नाहीं, तो दयाघन प्रभू अत्र्यांस एकाकी मोकलील काय ? " **संतांना भूतकाळ व पाप्यांना भविष्यकाळ असतो** " ही म्हण खोटीच आहे काय ?

—आम्हांस तसें वाटत नाहीं. वेड्या आशेवरच जगाचा डोलारा तोल सांवरून आहे. ह्या आशेपोटींच आम्हीं अत्रे–आख्यानाचा हा प्रपंच मांडला. ह्या आशेपोटींच आम्हीं त्यांस आत्मनिरीक्षणाची संधि दिली. ह्या आशेपोटींच इतिउत्तर आम्हीं त्यांच्या आत्मिक कल्याणासाठीं अवरित प्रार्थना करणार आहोंत ! इत्यलम् !

ॐ शांतिः ! शांतिः !

THE IDEAL ... ROAD
१२–४१
BOMB...

---

उपाख्यान :--

## अत्र्यांचे वातेरे, व पुण्याचे पैजार !

शौर्य, भीरुता व अत्रे मास्तर ह्या विषयांवर आम्हीं निरूपण आरंभिलें असतां एक चमत्कारिक सनसनीदार पण निस्संशय मनोरंजक अशी वार्ता वर्तमान पत्रांतून प्रगट झाली. त्या वार्तेचा व महामंडलेश्वर अत्र्यांच्या अंगीं वसत असलेल्या शौर्यगुणाचा निकट संबंध आहे. प्रल्हादपंत अत्र्यांच्या गत–चरित्रांतील पानांचा चिकित्सक व्यासंग करून आम्हीं त्यांचें भारतीय वीर पुरुषांच्या मालिकेंतील स्थान निश्चित करण्याच्या खटाटोपांत असतांच सर परशुराम कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं सडकीं अंडीं, कुजक्या भाज्या, तांबडे टोमेटो, व फाटक्या वहाणा, ह्यांच्या नव्या निकषांवर अत्रे ह्यांची मर्दुमकी पारखून पाहण्याचें मनांत आणलें ! आणि आम्हास मान्य करावयास अत्यंत आनंद वाटतो कीं, सदहु कडाख्याच्या प्रसंगीं आचार्य अत्रे ह्यांचे वर्तन अत्यंत धीरोदात्तपणाचें झालें व त्यांच्या ठायीं वसत असलेल्या अनेक लोकोत्तर गुणांची ओळख त्या दिवशीं जनता जनार्दनास झाली. शौर्य, धैर्य, हिम्मत,

जम्मत, दूरदर्शीपणा, अहिंसा, हिंसा, सहनशीलता, पलायनपाटव, अ-सहनशीलता, प्रकृती, विकृती, निष्कृती, इ. इ. अनेक महनीय गुण ''कॉपीराईट'' न्यायानें अत्रे ह्यांस डकलेले आहेत ह्या विषयीं त्या दिवशीं सर्वांची बालंबाल निश्चिति पटली ! खरोखर, अत्र्यासारखा महामर्द आजपर्यंत झाला नाहीं व पुढें होणार नाहीं ! अशा विभूति युगांयुगांतून जगाच्या सुदैवानें व त्यांच्या दुर्दैवानें केव्हांतरी एकदांच अपघातानें उत्पन्न होत असतात !

* * *

शहाण्याला शब्दांचा मार पुरेसा असतो ही ह्मण महशूर असतांही अत्रे मास्तरांना बेदम झोडपून काढण्याची आवश्यकता पुणेंकर तरुणांस वाटावी, ह्या घटनेमुळें आह्मी विचारक्रांत झालों आहोंत. सालगुदस्ता नागपुरासही असाच शोकजनक प्रकार जाहला. अत्रे ह्यांस शारीरिक क्लेश देऊन त्यांचे शौर्य कसास लावण्याविषयीं पुण्यानें नागपुरशीं स्पर्धा लावलेली दिसते ! अत्रे मास्तरांचे कायिक व मानसिक सामर्थ्य अजमावून पाहण्याची ही कुतुहलजन्य पद्धत बृहन्महाराष्ट्रांत ह्याच वेगानें पसरत राहिली तर काय होईल बरें ? असा गंभीर प्रश्न आज साऱ्या विचारवंतास व शक्तीच्या प्रयोगांच्या चाहत्यांस पडला आहे.

अत्रे मास्तरांच्या आजच्या नाजुक शारीरिक व मानसिक अवस्थेंत सदरहू प्रसंगावरील आमच्या टीकाटिप्पणी त्यांस झेंपणार नाहींत म्हणून मानवतामूलक सद्‌हेतूनीं प्रेरीत होऊन ते कार्य आम्हीं पुढें ढकलत आहोंत. शनै शनै प्रसिद्ध होणाऱ्या अत्रे, उपाख्यानास हें व्यवधान निर्माण झाल्याविषयीं आम्हीं त्या परम दयाळू, परम मंगल, कैवल्यधाम प्रभूची प्रार्थना करतो !

* * *

स. प. कॉलेजांत जी सफेजंग जहाली तिचा आमच्या विशेष वार्ताहरानें पाठविलेला वृत्तांत अर्थातच जरा भीषण आहे. रागीट प्रवृत्तीच्या उतावळ्या व अविचारी विद्यार्थ्यांनीं श्री. अत्रे ह्यांस बेरहेम व बेकळेजा

बदडण्यास सुरवात करतांच धीरोदात्त प्रवृत्तीचे आचार्य अत्रे करूण—कातर—[ माडखोलकर, माफ करा ! ]—साश्रू स्वरांत हंबरले "अहो, किती मारतां माझ्या वर्मी लागेल हो ! पाया पडतो ! "

सावरकराविषयीं बेजबाब बोलणाऱ्या अन्यास विद्यार्थ्यांनीं मजबूत मार द्यावा, ही गोष्ट तारूण्यांतील अविचारी अवखळपणास साजेल अशीच असली, तरी त्यांनीं आचार्य प्र. के. अत्रे, बी. ए. बी. टी. टी. डी. (लंडन) ह्यांस वाईट साईट व चावटपणाच्या शिव्या देण्यांतही कालापव्यय करावा ही गोष्ट मात्र आम्हांस बिलकुल आवडली नाहीं, हें येथें नमूद करणें प्राप्त आहे.

दुराराध्य व फटेल लोकांस आडवे घालून त्यांना एरंडेलचे मोठाले डोज पाजून त्यांचा आत्मा आणि देह शुद्ध करण्याचा यशस्वी प्रयोग मुसोलिनीनें मोठ्या प्रमाणावर केला असला, तरी आम्हीं भारतीयांनीही त्याच अतिरेकी मार्गाचें अवलंबन करावें, कीं हृदयपालटीवर विसंबून रहावें, ह्याची सोपपत्तिक व सोदाहरण मीमांसा यथावकाश करण्याचा आमचा विचार आहे. अस्तु !

४–१०–४१

---

## प्रल्हाद केशवाचा मस्तक-झेंडू ! सासवडचा वस्तरा व हिंदुत्वाची समशेर ! दिलगिरीच्या धळींत भरलेले तोंड !!

[ शिळया कढीस निष्कारण ऊत आणण्याचा आमचा मानस नाहीं. परंतु जवळ जवळ सर्वस्वी साधत आलेला प्रल्हाद केशवाचा मानसिक मोक्ष त्यापासून अर्ध्यावर हिरावून घेणें निष्ठुरतेचें होईल. "नवयुगांत" वीर सावरकरांवर पुनरपि हल्ले करून प्रल्हाद केशवानें जित्याची खोड सिद्ध केली आहे. कसलाही धर्माधर्म न मानणाऱ्या ह्या जीवाला समारोपाच्या लेखांकांची लाथ लगाऊन परत त्याला त्याच्या विश्रांतिस्थानीं लोटणें, आह्मांस आमचें कर्तव्य वाटतें. आणि ह्मणून आम्हीं आमचे लेखक श्री "फाल्गुन" यांना प्रल्हाद केशवाचा समाचार घेण्यास पुन्हां एकदां पाचारण केलें.—संपादक.]

आज ब्रँडी उडाली आणि बाटली तेवढी केविलवाणें तोंड वासून पालथी पडली. ताडी खलास झाली आणि भपकारा मात्र तसाच वातावरण दुषित करीत तरंगत राहिला. बंटेल वनमाला विछिन्न झाली. आणि नेत्रशल्य होणारा बेरंग पाचोळा मात्र बाकी उरला !

आज पावडरीची डबी पालथी पडली, डोळ्यांतला सुरमा उडाला, पायांतील नुपुरांचा भंग झाला, ओष्ठशलाका (Lip-Stick) गोरीमोरी पडली व ग्वाल्हेरची जरतारी अंगवस्त्रें उघड्या बाजारांत लिलावास निघाली !

आतां फुलांस सुवास उरला नाहीं ! आतां मदिरेंत मादकता उरली नाहीं ! आतां चिरोटांत लज्जत राहिली नाहीं ! आतां मुजोरीत अर्थ राहिला नाहीं ! आतां मस्तींत शक्ती शिल्लक नाहीं ! आतां चित्रमंदिरांत चित्र बाकी नाहीं !

आज भ्रमाचा भोपळा फुटला ! साष्टांग नमस्काराच्या व्रताची आज सांगता झाली ! डगमगत्या पायावर तोल सांवरीत उभा असलेला हंडीबाग आज दिलगीरीच्या धुळींत लोटपोट झाला ! गुलाबाच्या गुणावर जाहिरात-बाज धारिष्टानें अधिकार सांगणाऱ्या झेंडूच्या झडप्या फुलांची माळ आज बेंबटत बळी जाणाऱ्या बोकडास शोभिवंत करती झाली ! पूज्यपादांच्या नांवानें सतत कावकाव करणाऱ्या व्रणवृत्ति पराच्या डोमकावळयाचे उसने पंख आज उखडून निघाले !

आज थोबाड फुटले, बत्तीशी घशांत गेली, कटिप्रांत शेकून निघाला, व कसलेही नशापाणी न करितां देखील विषवाहिनी खलजिव्हा एखाद्या जुनाट न्वेटराच्या मुर्दाड जिभेप्रमाणें तोंडातल्या तोंडांत लडथडूं लागली ! आतां शेदाड शौर्य गळाले, धुंदधैर्य पळाले, नाटकी मुजोरीस कायमची खीळ बसली !

युद्धाचे शिंग वाजले, विद्युल्लतेप्रमाणें तरवारी लवूं लागल्या, समर-वाद्यांच्या भीषण नादास भरती आली आणि मग बायकांत बहुसाल बडबड करणाऱ्या विराटपुत्राचे कटिवस्त्र आपल्या धन्याचे लज्जारक्षण करावयास नकार भरूं लागले !

रथाला रथ भिडला, योद्ध्याला योद्धा भिडला, दिशा धुळीनें धुंद झाल्या, आणि मग नृत्यालयांत, नाट्यालयांत, व नृत्यशाळांत नाचरे नखरे

करून उमर गुदरलेल्या उत्तराला कळलें, कीं सव्यसाची वनवासी झाला तरी त्याची सर आपणास येणें नाहीं ! अर्जुनावर स्थळाची बंधनें असतील, काळाची बंधनें असतील, राजयंत्राची बंधनें असतील, साधनसामुग्रीची बंधनें असतील, पण तरीहि त्याचा परिहास करावयास आपण योग्य नाहीं. त्याचा उपहास आपल्याला झेपण्यासारखा नाहीं ! त्याचा अवमान आपणांस परवडण्यासारखा नाहीं !

ज्वरदूषित धुंगुरटें चावे घेत कितीहि उंच उडालें तरी कांहीं त्याला गगनविहारी विनायकाची सर येत नाहीं. कागदी वावडी गिरक्या घेत कितीहि नाचली, तरी कांहीं ती मेघमालेचें वैभव हिराऊं शकत नाहीं. कागदी वन-मालेचे कुणी कितीहि पोवाडे सांगितलें तरी कांहीं तिला विष्णुपुरीच्या वैज-यंतीची पदवी प्राप्त होत नाहीं ! चित्रभूमीवरील नाटक्यानें वीरश्रीच्या कितीहि किंकाळ्या मारल्या, तरी कांहीं कुणी त्याला व्हिक्टोरिया क्रॉस बहाल करीत नाहीं ! स्त्रैण उत्तर सावेश व साविर्भाव कितीहि बडबडला तरी कांहीं त्याला पार्थाची सर येत नाहीं !

—कारण उत्तर तो उत्तर व अर्जुन तो अर्जुन ! एकानें बाळपणापासून शस्त्रांचे नाद ऐकलें तर दुसऱ्यानें नुपुरांचें ! एकानें बाळपणापासून युद्धशास्त्रांचे धडे घेतले, तर दुसऱ्यानें नृत्यशास्त्राचें ! शूरांशीं झोटधरणी करण्यांत एकाची हयात गेली, तर नटींशी झोटधरणी करण्यांत दुसऱ्याची ! फडकत्या निशा-णापासून न ढळण्याचे एकाचे व्रत तर फडकत्या पदरापासून न चळण्याचे दुसऱ्याचे ! एकाच्या कानाला रणवाद्यांचा सराव तर दुसऱ्याच्या कानाला कंकणध्वनींचा ! मूर्तिमंत शौर्य हा एकाचा स्वभाव तर शौर्याचा स्वाभाविक अभिनय हा दुसऱ्याचा जन्मगुण ! एकाचे सख्य व सहोदरत्व शूराशीं तर दुसऱ्याचे सख्य व सहोदरत्व षंढांशीं ! एकानें ऐन यौवनापासून रुधिराचे रक्तरंग उडविले, तर दुसऱ्यानें तांबूलरसापेक्षां अधिक आरक्त असें कांहीं पाहिलेंच नाहीं ! रणभूमी हे एकाचे वांछित शय्यास्थान, तर शय्यास्थान ही दुसऱ्याची वांछित रणभूमि ! रणचंडीस एकानें शीरकमळांच्या माळा घातल्या, तर गांवभवानीस दुसऱ्यानें आपला मस्तक-झेंडू अर्पण केला. एकानें आजन्म शरचाप चालविले, तर दुसऱ्यानें नुसत्या पिचकाऱ्या मारल्या ! विजनवासाचे

लोखंडी लंगर एकानें तोलले, तर बाजारू वनमाला झेलण्यांत दुसऱ्यानें धन्यता मानली !

*　　　*　　　*

—आणि तरीहि त्या एवंगुणविशिष्ट नोड्यानें आपल्या हातानें स्वतःचा मोक्षकाल समीप आणला. गांडूळ वळवळ करीत फणीधरावर चालून गेलें. मृतमांस पुष्ट गिधाडानें गरुडावर स्वारी नेली. राकेलाचे डबडे आपल्या कज्जल-वर्षावानें सूर्यास खग्रासित करण्याची मनीषा बाळगूं लागलें. सासवडचा गांवठी वस्तरा हिंदुत्वाच्या तळपत्या समशेरीस खंडित करावयास उभा झाला ! दाहक अग्न्यस्त्राविरुद्ध डांबरी फटाक्यानें मोहीम पुकारली ! बीअरची बाटगी बाटली अमृत कुंभावर मात करावयास सरसावली ! परेलच्या गटारानें नाशिकच्या गंगौघांस बुडविण्याचा चंग बांधला ! "दाणे" ओळींतील बया सीतासावित्रिवर तुटून पडली ! सारमेयानें सिंहाच्या शिकारीसाठीं पुच्छ सरसावले ! भूगोलाचा मास्तर भूगोल पादाक्रांत करण्याच्या गोष्टी बोलूं लागला ! बीअरवर देह पोसणाऱ्या ढेरपोट्या फोफशास अचानक आपल्या सामर्थ्याचा साक्षात्कार झाला व त्यानें वज्रमुष्टी जगजेत्यास " चिमकुरें " व्यावयास प्रारंभ केला ! आपल्या टीचभर तरवारीचे दुबळे खेळ राणीवशांत दाखवून पायाच्या दासींचाहि उपहासविषय होणारा कमकुवत उत्तर महारथीं पार्थास समरचातुरीचे व धैर्याचे धडे द्यावयास निघाला ! प्रल्हाद केशव वीर सावरकरांस भीरुतेविषयीं दूषणें देऊं लागला ! सुताच्या राजकारणाची धनुकली बाजविणारा बोद्या पिंजारी पैजेच्चे शिवधनुष्य पेलावयास मोठ्या अवसानानें खडा झाला– !

—आणि !—आणि ! —आणि !!! जे व्हावयाचे होते, तेच झाले ! जे घडावयास पाहिजे होते तेच घडले ! न पेलणाऱ्या धनुष्यास आत्मप्रौढीने हात घालावयास गेलेला तो असुरपुत्र ते दैवीधनुष्य उरावर घेऊन साफ आडवा झाला ! तो रक्त ओकूं लागला ! तो केविलवाणे बोंबलूं लागला ! तो मायावी अभिनयाव्यतिरिक्त आजन्म प्रथम ढसढसा रडूं लागला ! तो येत्या जात्याची, पै पाव्हण्याची, देवा ब्राम्हणाची, वकीला कारकुनाची, पटापट थोबाडांत मारून घेऊन सारखी करुणा भाकूं लागला ! त्यानें अंगावरील पट्टे पुसून काढले, कष्टे ओरबाडून

फेकलें, मुखवटा झुगारून दिला, व आपल्या मूळच्या गर्दभी स्वरास करूण रसाची परिणामकारक फोडणी देऊन तो सव्वावीत भोंकाड पसरतें झाला! बालवाङ्मयावरील पितृत्वाचा आपला शालेय अधिकार त्यानें आतां पुरेतपणीं सिद्ध केला! तो भुईवर गडबडा लोळूं लागला! तो कपाळावर थडाथड हात मारून घेऊं लागला! स्वतःच्या तोंडांत मुठीनीं माती घालून त्यानें आपल्या वाचाळ पंचविशीचे कबरस्थान उभारलें! (त्याच्या बत्तीशींतील सात दात कोणा एका मामल्यांत कामी आले आहेत! जिज्ञासूंनी त्याचे तोंड वासून पहावे!) स्वहस्ते व आमंत्रणपूर्वक उरावर बसवून घेतलेल्या त्या धनुष्याचा भार सहन करता करता तो असुरपुत्र अगदीं जेरीस आला! त्याला सिनेमांतील व आकाशांतील साऱ्या तारका मैफलीनें डोळ्यांपुढें दिसूं लागल्या! त्या त्याच्या विनोदी करामतीकडें पाहून दांत विचकीत होत्या! त्याच्या संशयास्पद मर्दुमकीवरील त्यांचा विश्वास पार उडाला! त्या तारांगणांतील कांहीं सिने-तारकांना तो एकेकाळीं राहूप्रमाणें भासला होता! कांहींना तो केतू वाटला होता! कांहींचा त्या म्हशासुरानें अपमान केला होता! सासवड येथें "शूटिंग" चालू असतां कांहींना त्यानें अमर्याद शीवीगाळ केली होती! एकांतांत त्यानें कांहींना खोलींत कोंडून मरेपावेतो आणि रडेपावेतो मारले होते!

--पण जबरदस्ताशीं गांठ पडतांच हा मर्द महिषासूर धाय मोकलून रडूं लागला. केलेल्या पापाचे सक्षौर व पंचगव्यपूर्वक प्रायश्चित्त घेण्याची त्यानें तुरंत सिद्धता दर्शविली! गरीब कवड्यांचा व दुबळ्या बायाबापड्यांचा कर्दन-काळ बनून राहिलेला हा मुजोर मल्लिनाथ, सव्वाशेराशीं गांठ पडतांच गाय बनला, कोंकरूं बनला, नम्रवृत्ति ससा बनला, पळपुटी खार बनला, निरागस-नयन वासरूं बनला, आज्ञाधारक खेचर बनला, आंग घांसत लाडावणारी मांटी बनला, येवढेंच काय पण निरभिमान पशुकोटींतून कायापलटासाठीं योग्य योनीची निवड करतां यावी म्हणून त्यानें त्या कोटींत झोन तिकीटानें उदंड प्रवास केला!

कारण आज त्याची मस्ती जिरली. त्याचे औद्धत्य कुठून निघाले. त्याच्या मुजोर मुखास प्रतिकारात्मक लगामाचा कांटेरी हिसका मारणारा स्वार आतां त्याला भेटला व मग ह्यानें केविलवाण्या स्वरांत एकच हंबरडा फोडावयास सुरुवात केली!

त्यानें दारें झिजविली, त्यानें पायऱ्या झिजविल्या, त्यानें उंबरठे झिजविले, त्यानें कपाळ झिजविलें! ज्यांना त्यानें शत्रू म्हटलें, ज्यांना त्यानें आव्हान दिलें, त्यांच्या दर्शनासाठीं, त्यांच्या कृपाकटाक्षासाठीं, तो एखाद्या विरहिणी स्त्रीसारखा झुरूं लागला!

त्यांच्या समोर पदर पसरावा, त्यांच्या चरणांचें चुंबन घ्यावें व गतापराधाविषयीं गद्गद स्वानें त्यांच्या पायांवर मस्तक ठेवून क्षमा मागावी, हीच एक आस आतां त्याला लागून राहिली! "करूं गेले काय व त्वर झालें पाय" ह्या म्हणींचा त्यास पुन्हा एकदां अनपेक्षित अनुभव आला! तो लाथ मारावयास निघाला व लाथ खाऊन परत आला! आपल्या अब्रूचें मलीन वस्त्र ह्यानें सफाईसाठीं टाकलें, आणि परिणामतः संशयास्पद जातीचें ते पापमलीन पटकूरहि हा हतभागी गमाऊन बसला! सात्विक संतापाच्या नाटकी आविर्भावानें हा चलाख चेट सूडाच्या मोहिमेवर निघाला—ह्यानें "कंकणा"चें वारे आणले पण आपण केवळ एक "नुपुर" असल्याचें सिद्ध करण्यांत ह्यास यश मिळालें!

हिंदुत्वनिष्ठ "आदेश"शीं प्रयासपूर्वक विकत घेतलेल्या भांडणांत हा उघडा पडला; दिगंबर झाला, "चित्ररथ" बनला आणि मग आपल्या स्वराची उद्धट तार अकस्मात क्षमायाचनेच्या नम्र पट्टीवर लाऊन विरोधकासमोर हा एखाद्या असहाय गतधवेच्या सकंप स्वरांत साभिनय स्फंदू लागला.!

—ते दृश्य विनोदात्मक होतें, विडंबनात्मक होतें, परिहासपूर्ण होते! कारण त्याचें सबंध आयुष्य म्हणजेच नीति, सभ्यता, व सद्‌गुण ह्यांचे एक विडंबित व्हावें, असा धूर्त विधात्याचा संकेत होता! पण तरीहि स्वकष्टावर व स्वमूल्यानें तो येवढें विनोदी दृश्य निर्माण करूं शकेल अशी कुणाचीच अपेक्षा नव्हती! परंतु त्याची मात्र तशी प्रतिज्ञा होती—संकल्प होता! काय वाटेल ते मूल्य द्यावें लागलें तरी बेहत्तर, परंतु जनतेला हासवायाचें, महाराष्ट्राला हासवायचें, ह्या दुर्मुख भारताला हासवयाचें, नव्हे—नव्हे—हे अखिल विश्व म्हणजेच विदुषकी हास्याची एक आरोळी करून टाकायची, अशी त्याची घोर, भयाण, भीष्म प्रतिज्ञा होती!

—आज त्याला प्रतिज्ञापूर्तीचा अपूर्व आनंद लाभला. विकट विनोदाच्या नग्नयुगांवर आज ह्या हिऱ्यानें अगदीं "सोन्याचा" कळस चढविला! त्या

प्रकारामुळें केवळ त्याच्या धोब्यानेंच काय ते नाक मुरडले, परंतु तेवढा तो विनोदशून्य रजक वजा जातां बाकीची आलम् दुनिया मात्र आतां खदखदून हंसत सुटली !

—ते दृश्यच तसें अपूर्व होते, असामान्य होते, अलौकिक होते ! विडंबनात्मक कलेचा तो अगदीं शेवटचा शब्द होता ! विदुषकी हास्याचा तो अगदीं अखेरचा आंचका होता ! सवंग घोडकिंकाळीची ती अगदीं अंतिम आरोळी होती ! प्रसंगनिष्ठ विनोदाचा तो अगदीं उच्चांक होता !

चारपानी " आदेशच्या " बटु वामनाने एका असुरकुलावंत बळीला अक्षरशः " दे माय धरणी ठाय " करून सोडले होते ! छोटासा जॅक आडमाप राक्षसावर स्वार होऊन बसला होता ! लघु पण चपळ चित्त्यानें एका रानरेड्याची शिकार साधली होती ! हौतात्म्यासाठीं आजवर आतुर असलेला तो पशू आतां मात्र त्या श्रेष्ठ पदाचा कबजा करण्याविषयीं केविलवाणी कांकू करीत होता !

—आणि ह्या घटनेंतच त्या विडंबनात्मक आपत्प्रसंगाचे सारे सार होते !

—कारण आजपर्यंत प्रल्हाद केशवाची एकूण भाषा एखाद्या विनोदी भासणाऱ्या धीरगंभीर हुतात्म्याची होती ! मी क्षत्रिय आहे—मी संभाजी आहे—मी येसूबसी आहे—मी शाक्य मुनी आहे--मी मरणाला भीत नाहीं—मी मृत्यूला डरत नाहीं—कुणी या, आणि माझा पुतळा घडवायला द्या,

—कुणी या, आणि माझें तैलिया चित्र रंगवायला टाका, कुणी या, आणि माझ्या पुण्यतिथीची तयारी करा, कुणी या, आणि स्वारीं खिळण्या-पूर्वीं माझ्या शेजारीं एखादा अट्टल चोर डांबून ठेवा—कुणी या, आणि माझ्या नम्रयुगीन " उवाचां " चे नवे करार छापायला द्या—अशी त्याची दरोबस्त निरवानिरवीची आणि आवरासावरीची भाषा चालली होती ! कुणाला वाटावे कीं जणू हा राजपूत रणनवरा केशरी पोषाख घालून जसा कांहीं जोहाराच्या क्षणाची अधिरतेनें वाट पहात आहे !

—परंतु लवकरच जनतेच्या असें लक्षांत आलें कीं तद्यांतला कांहीं एक प्रकार नाहीं ! ती केवळ बालमोहनांच्या रंगभूमीवर पाठ केलेली टाळ्यांची

वाक्यें होती ! जेव्हां खरोखरच कडाखा उडाला, प्रसंग गुदरला, ती काळवेळ येऊन ठेपली,–तेव्हां हा शब्दबंबाळ येशू पाठी खांब घेऊन धूम पळत सुटला ! मळवट भरून अग्निकाष्ठ भक्षणाचा देखावा उत्पन्न करणारी उनाड बाई सतीचे ज्यादा कुंकू व सरणाची लांकडे दुसऱ्या घरठावाच्या संसारास उपयोगी पडतील म्हणून वृत्तपत्रांत नव्या सोयरिकीची जाहिरात द्यावयास निघाली ! नारायण नामाचा नाटकी अट्टाहास करणारा हा आधुनिक भक्त प्रल्हाद, परिक्षेच्या कढईतील तप्त तेल व कड्याखालची भयाण दरी देखतांच, खेळाडू वृत्तीचा झाला, सुवर्णमध्यमाचा कायदा त्याला चपखल समजला, तडजोडीची आवश्यकता त्याला पूर्णपणे पटली, व स्वतःकडे “ आ ” वासून पाहणाऱ्या तेलाच्या आशाळू कढईत समेटाची गरमागरम भजी त्यानें हां–हां म्हणतां तळून दाखविली व एका उमेदवार हुतात्म्याला पोटांत वेऊं पहाणाऱ्या त्या स्वनामधन्य तैलपात्राला त्यानें क्षणार्धांत विडंबित करून सोडले !

—तो सारा प्रकारच बोलणी राजाची व वागणी कैकाड्याची असा झाला ! तो सारा प्रकारच, वाण राणीचें व गूण सिनेमा–नटीचें असा घडला ! तो सारा प्रकारच अतिशय विनोदी, अत्यंत विडंबनात्मक व कमालीचा विदूषकी असा वठला !

* * *

तो प्रकार सुरूं झाला–“भेंडे” हे मवाळ नांव घेऊनहि पाणी मागविणाऱ्या मिरचीचे ते तिखट-प्रयोग- सुरूं झाले, व प्रल्हाद केशवास कळलें कीं हुतात्मा घडवितांना विधाता जी सामुग्री घेतो, त्या सामुग्रीचा आपल्या घडणींत अंशहि नाहीं ! वेडझव्या विधीनें कसल्या तरी गफलतींत वानराचा मालमसाला विनायकाऐवजा वापरला आहे ! खिस्त, संभाजी, कालिदास किंवा बुद्ध घडवितांना जे साहित्य घेतात, ते घेण्याऐवजीं आपल्या विषयांत कळुगा, कालापहाड किंवा ढेलवटाऊ ह्यांचें साहित्य वापरण्यांत आलें आहे ! आपल्या अंगावरील मद्यजन्य सूज ही कांहीं गामा पहिलवानास आव्हान देणाऱ्या आरोग्याची खूण नव्हे !

—आणि त्याच्या मस्तिष्कक्षेत्रर ह्याहि सत्याचा उदय झाला, कीं न्यायदेवतेच्या साक्षीनें ज्या विरोधकाच्या प्रतिकारास आपण आवाहन केलें,

त्यांच्या गोत्र-प्रवरांत कोणाहि भीरूचें नांव समाविष्ट नाहीं. मनावरच घेतलें तर केवळ प्रामाणिक तत्त्वनिष्ठेस आणि युयुत्सु श्रद्धेस उपलब्ध असणाऱ्या शस्त्रसामुग्रीचा येवढा संभार ते निर्माण करतील, कीं त्यांस तोंड देणें, संधिसाधु आणि वाचाळ आचार्यांच्या एका समग्र कुलासहि शक्य होणार नाहीं !

हा बोध घडला, हे ज्ञान गवसले, ही खूणगांठ पटली, आणि मग हा आधुनिक संभाजी सपशेल सुतस राजी झाला, हौतात्म्याची उसनी वस्त्रें ह्यानें हुपटघाईनें दूर फेंकली, व अंतःपुरांत अडीअडचणींसाठीं सदैव सज्ज ठेवलेली दिलगिरीची व क्षमायाचनेची विदुषकी कानटोपी लेऊन ह्यानें आपल्या विरोधकांच्या चरणांवर सपशेल लोळण घेतली. "आरोपी"ची करुणा भाकून समेटाच्या क्षुरधारेनें स्वतःच सक्षौर व सार्वजनिक प्रायश्चित्त घेणाऱ्या त्या तपोधन मानधन, व त्यागी आचार्यांचे चित्र जितके करुण होते, तितकेच ते हास्यमय होते, तितकेच विडंबनात्मक होते. ते दृश्य अवलोकितांच स्वर्ग हांसला, पाताळ हंसला, पृथ्वी हंसली, व खदखदून उठलेले अंतराळ चर्मपुष्पांच्या नव्या हाऱ्याचा वर्षाव करूं लागलें !!

२०-३-४३

उलट तपासणी

प्र. के. अत्रे :

## आचार्य व वनमाला ह्यांचा प्रथम परिचय !

( टीपः—शेवटीं दिलेले दिनांक प्रतिवृत्त असणाऱ्या "प्रभात"च्या त्या त्या अंकाचें आहेत. )

भेंडे—तुमचें आणि तुमच्या बायकोचें हल्लीं बरें नाहीं काय ?

अत्रे—ठीक आहे कीं ! दर पंधरा दिवशीं मी तिला भेटावयास जातों.

भेंडे—काहो; तुमच्या बायकोनें पुण्याला घर घेतलें आहेना ?

अत्रे—बायकोचे भाऊ, बहीण व ती यांनीं तें घर बांधलें आहे.

भेंडे—तुमच्या नांवानें तें कां नाहीं ठेवलें ?

अत्रे---त्या घरांत तिच्या भावाचे व बहिणीचे पैसे आहेत. तिची सर्व कमाई त्यांत आहे. मी तिच्या कमाईची कधीं चौकशी करीत नाहीं.

भेंडे---अहो, तुमची सासवडला जमीन होती ना ?

अत्रे---होय.

भेंडे---ती वनमालेच्या नांवावर केली आहे काय ?

अत्रे---होय.

कोर्टानें या प्रश्नास हरकत घेतली. इतक्यांत अत्रे म्हणाले---मीं ती जमीन नगरचे भालेराव वकील यांना विकली व नंतर---

कोर्टानें या प्रश्नाची जरूरी नाहीं असें सांगितलें.

भेंडे---मोबदला दिल्याशिवाय ही जमीन वनमालेच्या नांवावर चढली आहे असें मला दाखवावयाचें आहे.

कोर्ट---मोबदला दिला असेल नसेल, आपल्याला त्यांच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं.

भेंडे---सौ. अत्रे यांजबरोबरचा विवाह आंतरजातीय आहे ना ?

अत्रे---होय.

भेंडे---तुमची आई धार्मिक, कर्मठ आहे ?

अत्रे---होय !

भेंडे---लग्न झाल्याबरोबर तुम्ही निराळे रहावयास गेलेत. चुलते, भाऊ व आई हीं एकत्र रहातात---?

अत्रे---होय. आई केव्हां केव्हां माझ्याकडे मुंबईला येते.

भेंडे---तुमची आई कर्मठ असल्यामुळें ती तुमच्याकडे येणेंच शक्य नाहीं.

अत्रे---येते. दोनचार महिने राहून परत जाते.

भेंडे---जास्त वेळ ती पुण्याला तुमच्या चुलत्याकडे रहाते---?

अत्रे---होय.

भेंडे---वनमालेची व तुमची ओळख कशी झाली ?

अत्रे---आगरकर गर्ल्स हायस्कूलमध्यें ती शिक्षिका होती. मी सोसायटीचा प्रेसिडेंट होतों.

भेंडे---ती होस्टेलची सुपरिंटेंडेंट होती काय ?

THE IDEAL BOOK ... CHABILDAS ... BOMBAY

अत्रे--नाहीं. ट्यूटर होती. ती तेथेंच रहात असे.

भेंडे--तुम्ही तिला वरचेवर भेटावयाला जात असां ?

अत्रे—कामनिमित्तानें जात असे.

भेंडे—तेव्हां तुम्ही तिच्याच खोलींत बसत असांना ?

अत्रे--होय.

भेंडे—त्या वेळीं तुमच्या व वनमालेच्या संबंधीं गावांत अफवा उठल्या होत्या ना ?

अत्रे--नाहीं.

भेंडे—तुम्ही वनमालेला घेउन नगरकरच्या खोलीवर जात होतां ना ? नगरकर ब्रम्हचारी होता ?

अत्रे--नगरकर कोण तें मला माहीत नाहीं.

भेंडे--[ एक छायाचित्र दाखवून ] हा तुमच्या शाळेंतील स्टाफचा फोटो पहा. तुमच्या पायाशीं कोण बसला आहे ?

अत्रे--हे होय ! हे शिक्षक होतें-ते नगरकर. ते असिस्टंट होते माझे. मी त्यांच्याकडे केव्हां केव्हां जात असें.

भेंडे--या नगरकरानें तुमच्याविषयीं अफवा उठविल्या म्हणून त्याला रानांत एकांत स्थळीं नेऊन तुम्ही झोडपला होता काय ?

अत्रे – नाहीं. तें साफ खोटें आहे.

भेंडे--आतां लक्षांत आलें का, हेंच तें. नगरकर प्रकरण. त्यामुळें गांवांत बभ्रा झाला व पालकांनीं होस्टेलमधून मुली काढल्याना ? म्हणून हॉस्टेल बंद झालें ना ?

अत्रे--होस्टेल नुकसानींत आलें म्हणून तें बंद केलें. होस्टेल १९३४ ते ३७ अखेर असेल.

भेंडे–वनमाला तेथें ट्यूटर केव्हां झाली ?

अत्रे—१९३६ च्या सुमारास.

भेंडे-ती आल्यावर एक वर्षांतच होस्टेल बंद झालें ?

अत्रे-होय.

भेंडे-नंतर रानडे ख्रिश्चन यांच्या घरांत ती रहावयाला गेली ना ?

अत्रे-होय.

भेंडे-भाडें थकलें म्हणून रानड्यांनीं तुम्हांला नोटीस दिली होतीना ? आणि तुम्हीच भाडें भरलेंत-?

अत्रे—मला नोटीस ? नोटीस नाहीं. पण भाडें मीं भरलें, केव्हां केव्हां भरीत असें.

भेंडे—पुढें वनमाला बॉम्बे सेंट्रलजवळ रहात असे ?

अत्रे- होय. युनिव्हर्सिटी सेटलमेंटमध्यें !

भेंडे--तुम्हीं तिला भेटावयाला जात होतां ?

अत्रे—मधून मधून भेटत असें.

भेंडे-पुण्याला मेनस्ट्रीटवरील डेव्हिड व्यापाऱ्याकडे तुमचें खातें होते ना !

अत्रे—मला माहित नाहीं. बरेच ठिकाणीं माझीं खातीं आहेत.

भेंडे--डेव्हिडकडे वनमाला तुमच्या खात्यावर कपडे खरेदी करीत असे व तुम्ही बिलें चुकतीं करीत होतां ?

अत्रे—मला तें माहीत नाहीं, मला आठवत नाहीं.

भेंडे--१९३६ मध्यें कांहीं सामाजिक कार्य करण्याचें तुमच्या मनांत आलें-म्हणून तुम्ही सावरकरांना भेटायला गेलांत व त्यांच्या प्रेरणेनें तुम्हो झुणकाभाकर सहभोजन घडवून आणलेंत.

अत्रे—रत्नागिरीच्या कीरांनीं १००० रु. देण्याचें कबूल केलें व म्हणून हा सहभोजनाचा कार्यक्रम हाती घेण्यांत आला.

भेंडे-त्या वेळीं तुम्ही अनंत हरि गद्रे यांना मदतीला बोलावलें होते ना !

अत्रे—होय. त्यांना बोलाविलें होतें.

भेंडे—१९३७ मध्यें दुसरें झुणकाभाकर भोजन झालें, त्यावेळीं सावरकरांना बोलाविलें होतें ना ?

अत्रे—होय. त्यांच्याच मदतीनें तें भोजन आंखलें होते. पुणेकरांतर्फे मीच स्टेशनवर त्यांचें स्वागत केलें. स्वागताचे वेळीं पहिल भाषण मी केले. बालमोहन नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं त्यांची रहाण्याची व्यवस्था केली. मोटार मी स्वतः हांकली. एक आठवडाभर मी २४ तास त्यांच्याबरोबर होतो.

भेंडे—जास्त लोकप्रसिद्धीकरितां व स्वार्थाकरितां सावरकरांना सोडून कॉंग्रेसपक्षांत शिरलांत ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—म्युनिसिपालिटीच्या निवडणुकींत कॉंग्रेसतर्फे उभे राहिलांत म्हणून कांहीं खर्च आला नाहीं ?

अत्रे – २०० रु. खर्च आला. ते माझ्या मित्रानें खर्च केले.

भेंडे—पण झुणकाभाकरीची आठवण आली कीं, गद्रे यांचेंच नांव लोकांच्या लक्षांत येतें ?

अत्रे—येत असेल.

भेंडे—म्यु० तील तुमचे सहकारी तुम्ही वर्णन केल्याप्रमाणें अशिक्षित होते म्हणून तुम्ही त्यांचे पुढारी झालांत ?

अत्रे—मी पुढारी होतों व स्टँडिंग कमिटीचा चेअरमन होतों.

भेंडे—तुम्ही चेअरमन असतांना बऱ्याच भानगडी झाल्या ?

अत्रे—कसल्या ?

भेंडे—जाधव यांना पब्लिसिटी ऑफिसर म्हणून नेमण्याचें अगोदर ठरविलें व लोकांना फसविण्याकरितां नंतर जाहिरात दिली ?

अत्रे—नेमला येवढें मला माहीत आहे. जाहिराती दिल्या वगैरे कांहीं माहीत नाहीं. नेमणूक कमिटीनें केली.

भेंडे—त्या कमिटींत किती सदस्य होते ? तुम्ही होतांना ? 'सकाळ' मध्यें पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला होताना ?

अत्रे—असेल.

भेंडे—चेअरमन म्हणून तुम्हांला फार काम पडत असेल ?

अत्रे—होय. २४ तास काम करीत होतों.

भेंडे—शाळेच्या कामाकडे मग दुर्लक्ष होत असेल ? तुमच्याविरुद्ध सेंट्रल डिव्हिजनच्या डाप्यु इन्स्पेक्टरनीं रिपोर्ट केला व शाळेच्या कमिटीनें तुम्हांला शाळा तरी सोडा किंवा म्यु. सोडा असें सांगितलें ?

अत्रे—म्हणूनच मी शाळा सोडली.

कोर्ट—त्यांत काय बिघडलें ? एका कामाकरितां त्यांनीं नोकरी सोडली, ही कर्तव्यनिष्ठाच होय.

भेंडे—१८ वर्षें जेथें त्यांनीं शिक्षणकार्य केलें, तें सोडून नगरपालिकेंत जाऊन त्यांनीं केलें काय ? त्यांच्या सार्वजनिक कार्यासंबंधीं विचारावयाचें आहे.

८-१२-४२

---

## सोसायटी कां सोडली !

भेंडे—कँप एज्युकेशन सोसायटींत प्रिन्सिपॉल असतांना तुम्हीं म्युनिसिपालिटींत गेलां ना ?

अत्रे—होय.

भेंडे-सोसायटीच्या नियमावलींत असा एक नियम आहे ना कीं, मी कोणत्याही राजकीय संस्थेंत भाग घेणार नाहीं, किंवा राजकीय वृत्तपत्र काढणार नाहीं.

अत्रे—हा नियम मागाहून केला आहे. तो मला बंधनकारक नाहीं.

भेंडे—संस्थेच्या उत्कर्षाकरितां मी यथाशक्ति झटेन व संस्थेच्या लौकिकास साजेसें वर्तन करीन असाही एक नियम आहेना ?

अत्रे—मी तसें केलें.

भेंडे—म्युनिसिपालिटींत जाऊन शाळेच्या कामाची हयगय केलींत ना ?

कोर्ट—त्याचा येथें संबंध काय ?

भेंडे—त्यांना शाळेंतून राजीनामा देणें भाग पडलें हें मला सिद्ध करावयाचें आहे.

भेंडे-' स. प. कॉलेजसंबंधीं आचार्यांची स्वच्छ व स्पष्ट सदिच्छा तरी काय आहे ? त्या कॉलेजचें वेडोप मद्यालय व्हावें कीं रंगेल स्टुडियो व्हावा ? ' असें आरोपी म्हणतात. फिर्यादीनें असें म्हटलें आहे कीं, प्रि. करमरकर हे ' स. प.' चे प्रिन्सिपॉल होण्यास नालायक असून त्यांनीं मंडईमागें दुकान उघडल्यास बरें होईल. हें तुम्हीं लिहिलें आहे ना ?

अत्रे—व तें मला पूर्णपणें पटतें आहे.

भेंडे—तुम्हीं शाळा सोडून चित्रपटांत पडलां ना ?

अत्रे—होय.

भेंडे—राजीनामा देणें तुम्हांला भाग पडलें ना ?

अत्रे—नाहीं. हैद्राबादहून मीं राजीनामा पाठवून दिला. मी फर्लो मागितली, पण ती न देतां मला नोकरीवर हजर रहाण्यास सांगण्यांत आलें. तसें करणें मला अशक्य असल्यानें मी राजीनामा दिला.

भेंडे—फर्लो कां मागितली ?

अत्रे—' नवयुग चित्रपट कंपनी लिमिटेड ' काढण्याकरितां.

भेंडे—तिचे शेअर विकण्याकरितां तुम्ही हैद्राबादला गेलां होतां ?

अत्रे—होय.

भेंडे—त्यापूर्वीं तुम्हीं चित्रपटाकरितां कथा लिहित असां ना ?

अत्रे—होय.

भेंडे—त्या वेळीं वनमाला शाळेंत होती ?

अत्रे—आगरकर गर्ल्स हायस्कूलमध्यें शिक्षकीण होती.

भेंडे—तुम्ही नवयुग कंपनीचे डायरेक्टर होतां ना ?

अत्रे—नाहीं. मॅनेजिंग एजंटस्पैकीं एक होतों.

भेंडे—तुम्ही नवयुगचे शेअर्स किती रुपयांपर्यंत विकलेत ?

अत्रे—एक लाख.

भेंडे—तुम्हीं आपला खर्च चाळीस हजार रुपये दाखविलांत ?

अत्रे—हें खोटें आहे.

कोर्ट—या प्रश्नाचा संबंध काय ?

भेंडे—हा गृहस्थ स्वतः शाळेच्या कामाची हयगय करून चित्रपटाचे शेअर्स खपविण्याकरितां गांवोगांव फिरतो नी प्रि. करमरकरांना दुकान उघडण्यास सांगतो. नी नीतिमत्तेच्या गोष्टी सांगतो म्हणून हे प्रश्न विचारीत आहे.

१२-१२-४२

# सुधाबाई अत्रे व वनमाला !

भेंडे वकील--( अत्रे यांस )—तुम्ही शाळा सोडून स्टुडिओंत शिरलांत ना ?

अत्रे—होय. शिक्षणाचें लहान क्षेत्र सोडून मी मोठ्या क्षेत्रांत शिरलों.

भेंडे—वनमालेलाही तुम्ही शाळेच्या लहान क्षेत्रांतून चित्रपटाच्या मोठ्या क्षेत्रांत आणलेंत ना ? वनमालेला पगार काय होता ?

अत्रे—दोन हजार रुपये.

भेंडे—पण तुम्हीं लिहिलें आहे कीं, तिला पांच हजार रुपये पगार मिळत होता.

अत्रे—मिनर्व्हाशीं तिचें कॉंट्रॅक्ट होतें. दोन्ही ठिकाणीं मिळून तिला पांच हजार रुपये पगार मिळत असेल. मला जी माहिती मिळाली त्यावरून मी लिहिलें.

भेंडे—अहो, फडके यांनीं 'अत्रे-वनमाला यांना गाशा गुंडाळावा लागला' असं लिहिलं आहे, त्याला उत्तरादाखल तुम्हीं वरीलप्रमाणें लिहिलें आहे.

अत्रे—असेल. मीं तसें लिहिल्याचें मला आठवत नाहीं.

भेंडे—वनमाला ही हॉस्टेलमध्यें ट्यूटर होती ना ?

अत्रे—होय.

भेंडे—ती भवानीपेठेंत रहात असतांना तिला नाच शिकविण्याकरितां तुम्हीं शिक्षक ठेविला होता ना ?

अत्रे—मी ठेवला नव्हता.

भेंडे—ती भवानी पेठेंत असतां नाच आणि गाण्याचें शिक्षण घेत होती काय ? त्या वेळीं तुम्ही वनमालेला आपल्याबरोबर पुष्कळ ठिकाणीं फिरवीत होतां ना ?

अत्रे—कुठें ? केव्हां ?

भेंडे—तुम्हीं दौंडला चित्रपटमंदीर उघडण्याकरितां गेलां होतां ना ?

अत्रे—होय.

भेंडे—त्या सिनेमाचे मालक सोनावणे होते ना ?

अत्रे—होय.

भेंडे—पुणें म्युनिसिपालिटीचे सभासद कांबळे यांच्या खटपटीनें तुम्ही गेलांत ?

अत्रे—छेः, त्यांचा कांहीं संबंध नाहीं.

भेंडे—बरें, तुमच्याबरोबर वनमाला गेली होती ना ?

अत्रे—होय, तिलाही आमंत्रण होतें, आणि ती आली होती.

भेंडे—वनमाला त्या वेळीं आगरकर स्कूलमध्यें मास्तरीण होती ? चित्रपट धंद्याशीं तिचा कांहीं संबंध नव्हता ?

अत्रे—होय. मास्तरीण होती. पण सोनावणेच्या मुलानें तिला बोलाविलें होतें.

भेंडे—त्या वेळेला सौ. अत्रेना कांहीं तुम्ही नेलें नव्हतें ?

अत्रे—नव्हतें.

भेंडे—तेव्हां दौंडच्या लोकांना वाटलं, तुम्ही आणि वनमाला नवरा-बायको आहांत ?

कोर्ट—लोकांना वाटले तें आपल्याला काय करावयाचें आहे ?

भेंडे—( एक फोटो दाखवून ) दौंडला सिनेमा उघडला, तेव्हांचा हा फोटो पहा ! ही तुमच्या डाव्या बाजूला बसलेली वनमाला ना ? याच्यांत कांबळे आहे काय ?

अत्रे—मला फोटो बघूं द्या ( फोटो पाहून ) यांत वनमाला आहे, कांबळे आहे, व पुण्याचे इतर दोन गृहस्थ आहेत.

भेंडे—त्या वेळेला दौंडच्या लोकांना वाटलें, तुमचे आणि वनमालेचे संबंध फार घनिष्ट आहेत ?

अत्रे—लोकांना कांहींही वाटले असेल.

भेंडे—काय हो अत्रे, वनमालेला दौंडला नेल्यामुळें तुमचें आणि सौ. अत्रे यांचें भांडण झालें काय ? कांहीं सीन ( कमी जास्ती ) झाला काय ?

अत्रे—कांहीं भांडण नाहीं, सीन नाहीं.

भेंडे—सौ. अत्रे म्हणाल्या कीं मी आतां जाऊन जीव देतें ?

अत्रे—साफ खोटें.

मराठी ग्रंथ संग्रहालय

भेंडे—सौ. अत्रे म्हणाल्या कीं मी जाऊन निराळी रहातें ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—नंतर सौ. अत्रे एकदां वनमालेकडे गेल्या असतां तेथें तुम्ही होतां ?

अत्रे—साफ खोटें.

भेंडे—काय हो, तुमच्या शेजारीं एज्युकेशन इन्स्पेक्टर देसाई रहात होते ना ? तुमचें भांडण ऐकून ते धांवून आले ना ?

अत्रे—होय, ते शेजारी होते. पण आमचें भांडण झालें नाहीं व ते कधीं आले नाहींत.

भेंडे—भांडण झालें असतां सौ. अत्रे यांजवर फ्लॉवर पॉट फेकलें ना ?

अत्रे—साफ खोटें.

१३-१२-४२,

---

## पडद्याआडचे शालाविसंगत दृश्य !

श्री. भेंडे वकील ( अत्रे यांस )—बॅ. जयकर हे शाळेच्या बक्षिस समारंभाला आले होते ना ?

अत्रे—होय.

भेंडे—त्या वेळीं त्यांना कांहीं गैरवाजवी ( Something unpleasant ) दिसलें ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—शि. ल. करंदीकरांनीं 'अत्र्यांची बढाई' या नांवानें लिहिलेली पुस्तिका तुम्हीं वाचली आहे काय ? त्याच्यांत त्यांनीं या गोष्टीचा उल्लेख केला आहे ना ?

अत्रे—असेल.

भेंडे—तुम्हांला प्रत्यक्ष दाखविल्याशिवाय तुम्ही कोणतीच गोष्ट कबूल करीत नाहीं. पहा, शि. ल. करंदीकर एम्. एल्. ए. यांनीं लिहिलेली अत्र्यांची

बढाई ही पुस्तिका. मी वाचून दाखवितों–' बाबासाहेब जयकर शाळेंत आले त्या वेळीं त्यांना जे तेथें एकंदर प्रकार दिसले, त्यांची उद्वेगकारक स्मृति बाबासाहेबांच्या मनांत बरेंच दिवस रेंगाळत असल्याचा प्रवाद अत्र्यांनीं ऐकला आहे कीं नाहीं ? ज्या पालकांनीं आपल्या मुलींचीं नांवें मोठ्या अगत्यानें आगरकर हायस्कुलांत दाखल केलीं, त्यांपैकीं पुष्कळांनीं तीं पुढें एकाएकीं काढून घेतलीं व आगरकर हायस्कूलचा संपर्क त्यांनीं टाळला.

अत्रे—याला मी ' नवयुगां ' त उत्तर दिलें आहे.

भेंडे–त्यांच्यावर तुम्हीं केस केली नाहीं ना ?

अत्रे—परंतु मी त्यांना आव्हान दिलें होतें कीं सिद्ध कर—

भेंडे—नाहीं तर भर बुधवारांत मी तुला जोडे मारीन ?—त्याप्रमाणें तुम्हीं कांहीं केलेंत काय ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—याचा अर्थ तुम्ही आपली अब्रू साफ करून घेतली नाहीं हें खरें ना ? ( do you admit that you did not vindicate your honour ? )

अत्रे—त्याची कांहीं जरुरी नाहीं

भेंडे—याच पुस्तिकेंत पुढें लिहिलेलें आहे—आगरकर हायस्कूलच्या इन्स्पेक्शनच्या वेळीं ऑफिसच्या शेजारीं पडद्याआड असलेलें एक शालाविसंगत दृश्य पाहून इन्स्पेक्ट्रेस बाईंना आश्चर्याचा धक्का बसला आहे असा जो बोभाटा झाला आहे, तो अजिबात निराधार असल्याचें अत्र्यांनीं कधीं जाहीर केलें आहे काय ? याला तुम्ही कांहीं उत्तर दिलें आहे काय ?

अत्रे—नाहीं. यावर कोणीही विश्वास ठेवला नाहीं.

भेंडे—काय हो, त्या वेळेस मिसेस लोबो नांवाची इन्स्पेक्ट्रेस होती ना ?

अत्रे—मिसेस लोबो नांवाची इन्स्पेक्ट्रेस नव्हती.

भेंडे—मग त्या वेळीं इन्स्पेक्ट्रेस कोण होती ?

अत्रे—मिस् , ट्वेल्म.

भेंडे—मग तिनें कांहीं शेरा मारला आहे ना ?

अत्रे—हें खरें नाहीं. अजिबात खोटें आहे.

फिर्यादीचे वकील--हे प्रश्न वारंवार विचारले जातात ?

भेंडे—कारण आहे. फिर्यादीनें हरकत घेतलेल्या लेखांत म्हटलें आहे—" निर्लज्ज माणसा ! शिस्त, सभ्यता व ज्ञानाचें पावित्र्य हे शब्द तुझ्या तोंडांत शोभत नाहींत. नाशिक येथें पाहुणा म्हणून विनातिकीट दुसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या व बेहोष स्थितींत दारूच्या बाटल्या हातांत घेऊन लळत लोंबत फलाटावर उतरणाऱ्या बेशरम जनावरास तूं काय म्हणशील ? मुलींच्या शाळेंत ठेवलेल्या पलंगाचा खुलासा इन्स्पेक्ट्रेस बाईला देऊं न शकणाऱ्या हैवानाला शिस्त, सभ्यता व ज्ञानाचें पावित्र्य हीं कळलीं आहेत काय, याचा तूंच निशापाणी न करतां विचार कर."—म्हणून हे प्रश्न विचारावे लागत आहेत. बरें, लागवणकर नांवाचे शिक्षक तुमच्या शाळेंत होते ना ?

अत्रे—होय.

भेंडे—होस्टेलच्या मुली घेऊन बंडगार्डनवर फिरायला जाण्याविषयीं तुम्हीं सांगितलें होतें ना ?

अत्रे--साफ खोटें आहे.

भेंडे—आणि त्या वेळीं तुम्ही आणि वनमाला होस्टेल रूममध्यें गप्पा मारीत बसत होतां ?

अत्रे--अजिबात खोटें आहे.

भेंडे—नगरकर हे फ्रेंचचे शिक्षक होते ना ?

अत्रे--होय.

भेंडे--कांहीं कारणामुळें, तुम्ही त्यांनीं शाळेंत शिकवावयाला जाऊं नये असा हुकूम काढला होता ना ?

अत्रे—माझा काय संबंध ? तें प्रिन्सिपालचें काम.

भेंडे--हां ऽ ऽ ! प्रिन्सिपाल म्हणजे मिसेस दामले-म्हणजे वनमालेच्या मावशी ?

अत्रे--होय.

भेंडे—या सौ. दामले यांनीं राजीनामा देण्याचें कारण काय ? त्यांच्या कारभारांत कोणी अडथळा केला काय ?

अत्रे—असेल, मला माहीत नाहीं.

भेंडे—तुम्हीं कांहीं मास्तरणी नेमल्यात, व तें त्यांना आवडलें नाहीं ?

अत्रे—ही गोष्ट खोटी आहे.

भेंडे—वनमाला बी. टी. चा अभ्यास करीत असे, तेव्हां तिच्या शिक्षणाचा खर्च कोण करीत असे ?

अत्रे—ती स्वतःच करीत असे.

भेंडे—त्या वेळीं तुम्ही सेव्हाय हॉटेलमध्यें उतरत होतां काय ?

अत्रे—नाहीं

भेंडे—तिनें आगरकर हायस्कूल सोडल्यावर चित्रपट-व्यवसायांत ती कशी गेली ? तुमच्यामुळें ?

अत्रे—तो केवळ accident ( योगायोग ) होता. तिला कलेची आवड होती म्हणून ती ' नवयुग ' कंपनीत आली.

भेंडे—काय हो, तिचा पगार काय होता ?

अत्रे—दरमहा दोन हजार रु. ठरला होता.

भेंडे—शाळेंत तिला काय पगार होता-७५ रु. काय ?

अत्रे—शाळेंत ४५ रु. होता.

भेंडे—म्हणजे ४५ रुपड्या मिळणाऱ्या मास्तरणीला तुम्ही सिनेमांत दरमहा २००० रु. पगार देऊं लागलांत ना ?

अत्रे—मी नाहीं. मॅनेजिंग एजंटांनीं ठरविलें.

भेंडे—शेअर होल्डर्सचेच पैसे ! त्या वेळीं डिव्हिडंट काय दिलें ?

अत्रे—मला माहीत नाहीं.

भेंडे—नवयुग कंपनींत तिला चांगला गलेलठ्ठ (handsome) पगार मिळत होता ! मग तिनें नवयुग कंपनी कां सोडली ? काय डायरेक्टरना तिचें काम पसंत नव्हतें, कीं चित्रपट पडला, कीं डायरेक्टरचें व तिचें बिनसलें ?

अत्रे—तो तिचा प्रश्न आहे.

भेंडे-मग २००० रु. लठ्ठ पगाराची नोकरी तिनें कां सोडली ? तुम्ही निघालेत म्हणून तुमच्याबरोबर तीही निघाली काय ?

अत्रे-तसें नाहीं. तिचें कॉन्ट्रॅक्ट संपलें म्हणून ती नवयुगमधून निघाली.

भेंडे--दुसरीकडे कुठें न जातां, तुम्ही व तिनें अत्रे पिक्चर्स काढलें ?

अत्रे—होय.

कोर्ट--हे प्रश्न विचारण्याचा उद्देश काय ?

भेंडे--कारण हरकत घेतलेल्या लेखांत असें म्हटलें आहे कीं-' दुसऱ्याच्या बायका पळविण्यास जें धैर्य लागतें' त्या मुद्यावर मी आतां येणार आहे. ( अत्र्यांना )- काय हो, वनमालेचा नवरा तुम्हीं ओळखतां काय ? कॉंग्रेसच्या चळवळीमुळें तो तुरुंगांत गेला आहे काय ?

अत्रे--मला माहीत नाहीं.

भेंडे--काय, माहिती नाहीं ? तुम्ही कॉंग्रेसवाले आहांत-आणि हीही गोष्ट तुम्हांला माहिती नाहीं ?

अत्रे--होय, मी सांगतों मला माहिती नाहीं.

भेंडे--श्री. सावंत हे म्युनिसीपल कॉर्पोरेटर आहेत हें तुम्हांला माहीत आहे कीं नाहीं ?

अत्रे--हं, तें मला माहीत आहे.

भेंडे--आतां कसें कबूल केलेंत ! ते तीन वेळां कॉंग्रेसच्या सत्याग्रहांत तुरुंगांत गेलें आहेत हें माहीत आहे कीं नाहीं ?

अत्रे--मला माहिती नाहीं.

भेंडे--वनमाला सावंतांना तुरुंगांत भेटावयाला गेली होती काय ?

अत्रे--मला माहिती नाहीं. तिचें काय तें ती पाहून घेईल. ( thats her business. )

भेंडे-अहो, तुमच्यासारखा आचार्य, लेखक वगैरे qnalifications ( उपाधी ) असलेल्या सद्गृहस्थाला वनमालेनें नवऱ्याची चौकशी करावी असें वाटत नाहीं काय ?

अत्रे--तो तिचा प्रश्न आहे. दुसऱ्याच्या खाजगी प्रश्नांत मी पडत नाहीं.

भेंडे--होय. वनमाला तुमच्याजवळ दोन वर्षें रहाते ना ?

अत्रे--कारण मी तिचा पालक ( guardian ) आहें.

कोर्ट--अहो पालक म्हणजे काय ? तुम्हांला काय म्हणावयाचें आहे ?

अत्रे--I look after her business ( मी तिच्या व्यवहारावर देखरेख ठेवतों. )

कोर्ट--तिचा व्यवहार, धंदा काय आहे ?

अत्रे--चित्रपटसंबंधीं.

कोर्ट--पालक म्हणून तुम्हीं काय करतां ?

अत्रे—मी तिच्या सर्व व्यवहारावर नजर ठेवतों-प्रसिद्धी करतों.-

१४-१२-४२.

---

## अत्रे वनमालेचे पालक, मालक, कीं चालक ?

भेंडे—( अत्रे यांस ) वनमालेचें वय काय आहे ?

अत्रे--असेल ३६ वर्षांचें.

भेंडे--ती बी. ए. बी. टी. आहेना ? तरी तिला पालक लागतो ?

अत्रे—तिचा एकंदर व्यवहार-गाणें, नृत्याचे शिक्षक ठेवणें, सिनेमा कंपन्यांशीं करार करणें, तिच्या प्रसिद्धीची व्यवस्था करणें-

भेंडे—ह्मणजे तिचे तुम्हीं 'पब्लिसिटी ऑफिसर' आहांत तर ?

अत्रे—मी इतरही बरींच कामें करतों.

भेंडे—तुमच्या स्टुडियोंत इतरही नटी आहेत. त्यांना कांहीं पालक लागत नाहींत ? इतर नटींचे पालक व्हावयाला तुमची तयारी आहे काय ?

अत्रे—हो. त्यांची इच्छा असल्यास व मला पटत असल्यास.

भेंडे-स्टुडियोमधल्या तुमच्या इतर नटी घरांत तुमच्याबरोबर रहात नाहीत ना ?

अत्रे-नाहीं. वनमाला माझी भागीदार आहे म्हणून माझ्याकडे रहाते.

भेंडे—मग मोटेही तुमचे भागीदार आहेत. त्यांबरोबर ती कां नाहीं राहात ?

अत्रे-तो तिचा प्रश्न आहे.

भेंडे-तुम्हीं वनमालेला सांगावयाला नको होतें का, कीं बाई, नवऱ्याकडे जाऊन रहा म्हणून ?

अत्रे-हा तिचा प्रश्न आहे. ती माझ्या आश्रयाला होती ( guardianship ).

भेंडे—जो तिचा नवरा नगरपालिकेंत शहराचें पालकत्व सांभाळतो, त्याला वनमालेचें पालन करतां येत नाहीं काय ?

अत्रे–तो तिचा प्रश्न आहे. मी तिचा पालक म्हणून निरनिराळ्या कंपन्यांशीं करार करीत असें. आशा पिक्चर्स, मिनर्व्हा, वगैरे कंपन्यांबरोबर मी करार घडवून आणले आहेत.

भेंडे—कां हो, ती तुमच्याबरोबर परवां दिल्लीला गेली होती काय ?

अत्रे—माझ्याबरोबर नाहीं. तिच्या ' अंकल 'बरोबर गेली होती. तिचा ' अंकल ' तिला ग्वाल्हेर आणि दिल्लीला घेऊन गेला होता.

भेंडे—म्हणजे ग्वाल्हेर आणि दिल्लीला तिला निराळा पालक लागला ? पण दिल्लीला तुमच्याबरोबर होती काय ?

अत्रे—होती. पण सार्वजनिक समारंभांत तिनें भाग घेतला नाहीं.

भेंडे—मग तुम्हो ' नवयुगां ' त प्रसिद्ध केलें आहे कीं, वसंतसेनेचें प्रकाशन करण्याकरितां तुह्मी व वनमाला दिल्लीला गेलांत ह्मणून ?

अत्रे—तें खोटें.

भेंडे—पुण्याला तिला पालक नको होता, मग मुंबईला तिला पालक कां लागतो ? तिचा नवरा मुंबईत आहे ह्मणून का ?

अत्रे—मला माहिती नाहीं. हा तिचा प्रश्न आहे.

भेंडे—कां हो, गेल्या दोन वर्षांत तुह्मी वनमालेचे पालक ह्मणून तिला सांगितलें नाहीं का, कीं तूं तरुण आहेस, ' स्वरूपसुंदरी ' आहेस, तुझा नवरा मुंबईत आहे, माझी बायको नाशिकला आहे, सामाजिक दृष्ट्या तूं नवऱ्याकडे रहाणें बरें, हा अब्रूचा प्रश्न आहे !—असें तुह्मीं तिला सुचविलें नाहीं काय ?

अत्रे—माझी अब्रू पणाला लागली आहे असें मला वाटलें नाहीं.

भेंडे—अहो, तुह्मी तिचे पालक ना ? तुमचें कर्तव्य नाहीं का, कीं—

अत्रे—पण मी कायद्यानें कोठें नेमलेला पालक आहे ? तिच्या संमतीनें मी तिचा पालक झालों आहे.

भेंडे—मग तुह्मी पालक ह्मणून तिची काय व्यवस्था पहातां ?

अत्रे—तिचे वैवाहिक जीवन हा कांहीं माझा प्रश्न नाहीं.

भेंडे—चित्रमंदिरमध्यें तुह्मी, वनमाला व मोटे भागीदार आहांत ना ?

अत्रे--होय.

भेंडे--मोटे यांनीं ७५ हजार रुपये भांडवल दिलें ना?

अत्रे--नाहीं. आह्मी कंपनी सुरू केल्यावर १ वर्षानें मोटे आले.

भेंडे--तुमचें कंपनींत भांडवल ह्मणजे कथानक लिहिणें, प्रसिद्धी करणें; असेंच ना ?

अत्रे—नाहीं. मी स्वतः भांडवल आणलें आहे.

भेंडे—काय हो, रामचंद्र लालजी कडून तुह्मी हुंडीवर भांडवल आणलें काय ? व त्याला भागीदार करायचा करार केला होता काय ?

अत्रे—नाहीं. मला मुळींच माहिती नाहीं. कंपनीचा आर्थिक व्यवहार मोटे पहातात.

भेंडे—म्यु. स्टॅंडिंग कमिटीचे चेअरमन झाल्यावर तुह्मी आपली सेकंड-हँड गाडी विकून दुसरी नवी गाडी घेतली कीं नाहीं ?

अत्रे—मी सेकंड हँड गाडी मुळीं कधींच वापरीत नाहीं. चेअरमन होण्यापूर्वींच मी नवी गाडी घेतली होती.

भेंडे—तुह्मी गोपिनाथ रुइयाला ओळखतां काय ?

अत्रे—ओळखीत नाहीं.

भेंडे—अहो, ते तुमच्या शाळेचे पेट्रन आहेत ?

अत्रे—मला माहीत असण्याचें कारण ? मी त्या शाळेचा सेक्रेटरी थोडाच होतों ?

भेंडे—बरें. मग असें समजा, एक श्रीमंत मारवाडी तुमच्याकडे आला व आपल्या मुलाकरितां एक शिक्षक मागूं लागला. तेव्हा एकादा पुरुष शिक्षक न पाठवितां वनमालेला तुह्मी पाठविली कीं नाहीं ? आणि तिला दरमहा २०० रु. पगार द्यावयास सांगितलें कीं नाहीं ?

अत्रे—साफ खोटी गोष्ट आहे !

भेंडे—तुमच्या सोसायटीचे एक माजी अध्यक्ष गुरू होते ना ? त्यांनी तुह्मी गैरहजर असतां असा शेरा लिहून ठेवला कीं नाहीं ?

अत्रे—त्यांना काय अधिकार ? ( या वेळीं मधली सुट्टी झाली, म्हणून कोर्टाचें काम स्थगित झालें )

दुपारीं ३ वाजतां उलटतपासणीला पुढें सुरुवात झाली.

भेंडे—वनमालेला दरमहा ५००० रु. पगार होता असें 'नवयुग' मध्यें लिहिलें आहे ना ? ( श्री. भेंडे यांनीं उतारा वाचून दाखविला. )

अत्रे—होय. एकंदर उत्पन्न ५००० रु. आहे.

कोर्ट—ह्मणजे निरनिराळ्या कंपन्या मिळून ?

भेंडे—अत्रे पिक्चर्समध्यें तिला पगार काय मिळतो ?

अत्रे—मी तें उघड करूं इच्छीत नाहीं.

भेंडे—ह्मणजे तिला काम करण्याबद्दल निराळा पगार होता, व भागीदारीबद्दल निराळा हिस्सा मिळतो कीं काय ?

अत्रे—होय.

भेंडे—ती हिशेब ठेवते काय ?

इन्कमटॅक्स भरते काय ?

अत्रे—मला काय माहीत ?

भेंडे—अहो, पण तुह्मी तिचे गार्डियन ( पालक ) ना ?

अत्रे—तिचा प्रायव्हेट सेक्रेटरी तें काम पहातो.

भेंडे—मग तुह्मी पालक ह्मणून काय काय पहातां ?

अत्रे—करार करणें इ. कामें पहातों. तिला ५००० रु. उत्पन्न आहे, यापेक्षां मी अधिक कांहीं सांगूं इच्छीत नाहीं.

---

१५-१२-४२

# प्रल्हाद केशवाची मुग्ध दुःखे !

श्री. भेंडे वकील ( अत्रे यांस )—'आदेश' मधील पुढील उताऱ्यास तुमची हरकत आहे ना ? तो उतारा असा—

"धोतरजोडीवर खुश किस्मतीनें आलेल्या रंभेचें चित्र मोठ्या हिफाजतीनें ट्रंकेच्या तळाशीं पुरावें, सार्वजनिक वाचनालयांतील एकादें पिवळें पुस्तक सफाईनें मारून त्याची आपल्या ग्रंथभांडारांत भर घालावी, आर्यन सिनेमाच्या द्वारपालानें कृपाकटाक्षाची खैरात केल्यास हर्षोत्फुल्ल व्हावें, 'विदाऊट लाईट' जाण्याविषयीं पिवळ्या बागुलबोवानें दरडावल्यास घामाझोकल व्हावें, आणि क्रमिक पुस्तकांतील थोर पुरुषांच्या चरित्रांतून स्फूर्तींच्या ओंजळी भरून घेत

स्वत:च्या मोठेपणाचीं दिवास्वप्नें पहावीं अशीं तेव्हां त्याच्या इवल्याश्या जीवनांतील मुग्ध सुखदु:खें होतीं "

याच्यांत तुम्ही कशाला हरकत घेतां ?

अत्रे--मी पिंवळीं पुस्तकें ग्रंथालयांतून चोरून नेत असें अशी माझी यांत बदनामी केली आहे.

भेंडे--पिंवळीं पुस्तकें ' म्हणजे trash.

अत्रे--पिंवळीं पुस्तकें म्हणजे अश्लील वाङ्मय.

भेंडे--म्हणजे तुमच्या ' नवयुग ' सारखें पत्र कीं काय ! -बरें पुढें-मुग्ध म्हणजे काय ?

अत्रे--Silent ( गुप्त )

भेंडे-मुग्ध सुखदु:दुखें म्हणजे न मिळालेलीं, न अनुभवलेलीं, मनांतल्या मनांत विरमलेलीं unrealised सुखदु:खें ना ?

अत्रे--असाही अर्थ होतो.

कोर्ट--हें विचारण्याची जरूर ?

भेंडे--अत्र्यांची त्या वेळीं हीं विरमलेलीं सुखदु:खें होती, आणि त्यावेळच्या इवल्याशा जीवांचीं हीं सुखदु:खें होतीं--

अत्रे--त्या वेळच्या म्हणजे कुठचीं ?

भेंडे--आरोपीनेंच लिहिलें आहे.-" अत्र्यांच्या गालफडाचे जेव्हां द्रोण होते, शरीराच्या जेव्हां पत्रावळी होत्या, व हाडांच्या जेव्हां चोयट्या होत्या, तो काळ दूरचा नाहीं-त्या वेळचीं हीं मुग्ध सुखदु:खें आहेत. कायहोअत्रे, तुम्हांला अशा इच्छा होत असत का ?

अत्रे-अशा इच्छा माझे मनांत कधींच आल्या नाहींत. ' पिंवळें पुस्तक ' चोरण्यावरून माझी मनोवृत्ती गुन्हेगारीची असल्याचें आरोपी सुचवितात, त्याला माझी हरकत आहे. बाकी मजकूर घाणेरड्या शिव्या आहेत.

भेंडे--आरोपीचें ह्मणणें असें आहे कीं, तुह्मी पुस्तक चोरलें नाहीं, तुमच्या मनांत येत होतें, पण कृतींत आलें नाहीं.

अत्रे--माझ्याकडून गुन्हा घडला असें कांहीं त्यांत ह्मटलेलें नाहीं. पण माझी गुन्हेगारीची प्रवृत्ति असल्याचें सूचित केलें आहे.

कोर्ट--ह्मणजे तुह्माला काय सुचवावयाचें आहे ? कीं तो गुन्हा घडला तुमच्या हातून ?

अत्रे--त्या वाक्याचा असा अर्थ होऊं शकेल कीं, त्याप्रमाणें मी गुन्हा केला.

तळपदे– ह्मणजे त्या वाक्याचा तसा अर्थ होऊं शकेल.

भेंडे--होय. मन जर खात असेल तर ( Yes, if the mind is guilty )

भेंडे—आरोपीनें ' इवल्याशा जीवाचीं ' असें ह्मटलें आहे. त्यावरून १९२७ सालीं तुह्मी कांहीं फार प्रसिद्ध नव्हता ?

अत्रे—असें कां ? मी १९१५ पासून कवि, लेखक, शिक्षणतज्ज्ञ ह्मणून प्रसिद्ध आहे.

भेंडे—मग तुम्ही कोणतीं कवितांचीं पुस्तकें लिहिलीं आहेत ?

अत्रे – गीतगंगा, झेंडूचीं फुलें, हीं त्या वेळीं प्रसिद्ध झालीं होतीं त्या वेळीं मी टीकाकार म्हणून प्रसिद्ध होतों.

भेंडे--' झेंडूचीं फुलें ' हें फार लोकांना माहिती नसणार ?

अत्रे--वाः तें तर सगळीकडे प्रसिद्ध आहे. मराठी साहित्य जाणणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस तें माहीत आहे. कांहीं युनिव्हर्सिटी परीक्षांना तें नेमलें आहे.

भेंडे—मग तें ' नवयुग ' वाचणाऱ्या वाचकांना व हे लेख लिहिणाऱ्या आरोपींना माहीत असेल ?

अत्रे--असलेंच पाहिजे. सर्वांनाच माहीत आहे. तुम्हांला मराठी वाङ्मयाची माहिती कमी दिसते. त्यामुळें तुह्मांला तें माहीत नाहीं.

भेंडे--तें पाहूं मग. त्यांत तुह्मी ' मनाचे श्लोक ' ह्मणून कांहीं लिहिलें आहे ना ?

अत्रे—होय.

भेंडे--यांत तुमचे स्वतःचे अनुभव आहेत ना ?

अत्रे—स्वतःचे अनुभव असतातच असें नाहीं. कवीचें निरीक्षण, कल्पना व समाजांतील दोषांचें संकलन करून ते मांडलेले असतात.

भेंडे—ह्मणजे त्यांत तुमचे अनुभव, अतृप्त भावना, विरमलेल्या इच्छा आल्याच.

अत्रे--तसेंच कांहीं नाहीं.

भेंडे--बरें, हें पुस्तक ( ' झेंडूचीं फुलें ' पुस्तक दाखवून ) तुम्हीच लिहिलेंत ना ?

तळपदे- -तुम्हांला माहीत आहे तर तें पुस्तक ?

भेंडे—माहीत आहे तर. या पुस्तकावरून मी त्यांचा एकवेळ चाहता होतों. पण आजचें गलिच्छ लिखाण वाचून घृणा येते. बरें तें असो. येथे म्हटलें आहे–मात्र हे श्लोक निव्वळ मनाचेच समजू नयेत. ' हें तों प्रचीतीचें बोलणें '– प्रचीती म्हणजे काय ? स्वतःचा अनुभव ना ?

अत्रे--दुसऱ्यांमध्यें असलेल्या दोषांचा आलेला अनुभव.

भेंडे--सर्वांमध्यें तुमचा समावेश होत नाहीं काय ?

अत्रे-समाजांतील कांहीं माणसें–

भेंडे—कोणतीं ?

अत्रे–एक दोन, अहो शिरगणती कोण करतो ? न्यूटननें एक पडतांना पाहिलें व गुरुत्वाकर्षणाचा नियम शोधून काढला ना ?

भेंडे--हां. म्हणजे समाजांतील एकादा इसम तुम्ही पाहिला व दोष मांडले. तो इसम तुम्ही कीं काय ?

अत्रे—मी कशावरून ? बहुजन समाजांतील व्यक्ती.

भेंडे—त्यांत तुमचा समावेश होत नाहीं काय ?—बरें आतां श्लोक ऐका—

कधीं मंदिरीं जासि वाचावयाला । तरी इंग्रजी मासिकीं ठेव डोळा ॥
कुठें छान चित्रें कुठें कुपनें ही । दिसे सर्व तें नीट कापून घेई ॥

यावरून आरोपीला सुचवावयाचें आहे कीं, ग्रंथालयांतून पुस्तकें चोरण्याची कल्पना मुख्य होती ?

अत्रे—माझें वाटणं नव्हे, माझें पहाणं.

भेंडे—अहो, इंग्रजी शब्दप्रयोग माहीत आहेना–Man is what he thinks. तुम्ही रामदासांच्या श्लोकांचें विडंबन केलें आहे आणि आरोपीनें तुमच्या काव्याचें विडंबन केलें आहेना ! हेंच पहा–" आर्यन सिनेमाच्या द्वारपालांनीं कृपाकटाक्षाची खैरात केल्यास हर्षोत्फुल्ल व्हावें–" म्हणजे तुम्हाला फुकट सिनेमा पहावयाला मिळत असे–आणि हा तुमचा श्लोक बघा–

कधीं आगगाडींतुनीं हिंडतांना । सिनेमा-तमाशे तसें पहातांना ॥
विचारी मना, त्वां न खर्चीत जावें । सदा श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें ॥

तसेंच, ' विदाऊट लाईट ' जाण्याविषयीं पिवळ्या पगडीनें दरडावलें तर घामाझोकळ व्हावें,-ही कल्पना लेखकाला तुमच्याच कवितेवरून सुचली आहे. तुम्हीं ही ' प्रेमाचें अद्वैत ' कविता लिहिली आहे ना ? त्यांत हें पहा—

न मज्नू न लैला अशी हिंडली । बटाऊ न वा मोहनेच्या सवें ॥
मुशाफीर इष्कामध्यें रंगले । असे केधवांही न मद्यासवें ॥
' हुकमडर् ' स्वरें तो कुणी ओरडे ॥ समाधींतुनी तीव्र ये जागृति ॥
उभारून बाहू वरी तोंच अन् । पुढें पातली पोलिसी आकृति !
खडी पायचाकी करा या क्षणीं । न गाडीस बत्ती कुठें चाललां ?॥

आरोपीनें लिहिलेल्या गोष्टींचा यांत उल्लेख आहे. अन्यांच्या इवल्याशा जीवांचीं मुग्ध सुखदुःखें होतीं-मनातल्या मनांत राहिलीं-कृतींत उतरली नाहींत.

अत्रे—रंभेच्या चित्राचा उल्लेख कोठें आहे ?

भेंडे-अहो आपल्याला कल्पनाशक्ति आहे तशी दुसऱ्यांनाही आहे. हें पहा-

कुठें छान चित्रें कुठें कूपनें ही । दिसे सर्व तें नीट कापून घेई ॥

तुमच्या काव्यांत सर्व निराकार (व्हेग) आहे. आरोपीनें तें सर्व साकार ( कॉंक्रीट ) करून दाखविलें. तुम्ही सर्व सामान्य म्हटलें, लेखकानें तें विशेषस्वरूपांत दाखविलें. तुम्हीं चित्र म्हटलें-लेखकानें रंभेचे चित्र म्हटले. तुम्ही सिनेमा म्हटलें-लेखकानें आर्यन म्हटले.

अत्रे-मी प्रत्येक उदाहरणाला आक्षेप घेत नाहीं. सूचित अर्थाला माझा आक्षेप आहे.

( १६-१२-४२ ).

# संगीतसाधना, नृत्यसाधना, व द्रव्यसाधन !

भेंडे--तुम्हीं वनमालेचे पालक केव्हां झालां ?

अत्रे--मुंबईला आल्यापासून.

भेंडे--पुण्याला असतांना पालक नव्हतां कां ?

अत्रे--नाहीं. त्या वेळीं मी सल्लागार होतों.

भेंडे—मुंबईला आल्यावर तिला पालक कां लागला ?

अत्रे—तो तिचा प्रश्न आहे.

भेंडे—वनमाला पुण्यांत भवानीपेठेंत रहात असतांना ती शाळेंत जात होती ?

अत्रे--होय.

भेंडे--वनमालेनें शाळा कां सोडली ?

अत्रे--मी सांगू शकत नाहीं.

भेंडे--शाळा सोडतांना तिनें सल्ला मागितला का ?

अत्रे--तिनें मला कळविलें.

भेंडे—तुम्हीं काय सांगितलें ?

अत्रे—मी म्हणालों ठीक आहे.

भेंडे—शाळा कां सोडतेस असें तुम्हीं तिला विचारलें नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—राजीनामा बोर्डापुढें येतो ना ! बोर्डाचे प्रेसिडेंट म्हणून तुम्हांला त्याचीं कारणें माहीत असतीलच ?

अत्रे--तीं मी सांगू शकत नाहीं.

भेंडे—आगरकर स्कूल सोडल्यावर एक वर्षानें तिनें भवानी पेठेंतील जागा सोडली. त्या काळांत ती काय करीत असे ?

अत्रे—त्या काळांत ती नृत्य, संगीत वगैरे शिकत होती.

भेंडे—जागेचें भाडें काय होतें ?

अत्रे—तीस ते चाळीस रुपये असेल.

भेंडे—नृत्यशिक्षकाचा पगार काय होता ?

अत्रे—सुमारें पंचवीस रुपये असेल.

भेंडे—संगीत शिक्षकाचा पगार ?

अत्रे—निश्चित माहिती नाहीं. १५-२० रु. असेल.

भेंडे—पुण्यांत असतांना ती एकाद्या स्त्री-क्लबाची सभासद होती का ?

अत्रे—नव्हती.

भेंडे—नृत्य संगीत शिक्षणाबद्दल तिनें सल्ला विचारला का ?

अत्रे—हो विचारला. मी ह्मटलें ठीक आहे.

भेंडे—शिक्षकाबद्दल सल्ला विचारला ?

अत्रे—नाहीं. तिच्या ओळखीचा कोणी शिक्षक होता.

भेंडे—शाळेंत पगार किती मिळत होता ?

अत्रे—मागें सांगितलें आहे.

भेंडे—भाडें ४० रु., नृत्य २५ रु., संगीत १५-२० रुपये, आणि इतर मिळून एकंदर खर्च सुमारें दीडशें रुपये होतो.

अत्रे—असेल.

भेंडे—हा खर्च ती कसा भागवीत असे ?

अत्रे—तिच्या बापाकडून तिला पैसा मिळत असेल.

भेंडे—तुह्मी नाहीं पैसा दिला ?

अत्रे—मी तिला लहानलहान प्रमाणावर कर्ज देत असे.

भेंडे—किती कर्ज देत असा ?

अत्रे—२५-३० देत असें.

भेंडे—तिला मनीऑर्डर वगैरे येतांना तुह्मी कधीं पाहिली ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—तुह्मी तिला विचारलें नाहीं खर्चाबद्दल ?

अत्रे—नाहीं. तिनें सल्ला मागितला तर देत असें.

भेंडे—बी. टी. ची रजा बिनपगारी होती ?

अत्रे—असेल.

भेंडे—'पराचा कावळा' लिहिण्याकरितां तुह्मी चार महिन्यांची रजा घेतली होती ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—त्या वेळीं तुह्मी मोतिलाल मॅन्शनमध्यें रहात असं

अत्रे—नाहीं.

भेंडे--१ डिसेंबर १९३७ पासून तुह्मीं चार महिन्यांची रजा घेतलीत ?

अत्रे--असेल.

भेंडे--इंग्लंडला गेलां तेव्हां, व शिक्षणविषयक पुस्तकें लिहितांना, तुह्मीं रजा घेतली होती ?

अत्रे—होय.

भेंडे—वनमालेला कॉलेजांत प्रवेश कसा मिळाला ? प्रवेश मिळणें कठीण असतें. प्रवेश मिळावा म्हणून तुह्मीं आपलें वजन खर्च केलेंत ?

अत्रे--नाहीं.

भेंडे--प्रिन्सिपाल हंप्टन तुमचे मित्र होते ना ?

अत्रे--होय.

भेंडे—वनमालेला प्रवेश मिळण्याबद्दल तुह्मीं त्यांना सांगितलें ?

अत्रे--नाहीं.

भेंडे—वनमालेला पैसे कुठून मिळत ?

अत्रें—घरून मिळत असतील. ती श्रीमंत कुटुंबांतील आहे.

भेंडे--तिच्या बापानें तिला घरांतून हांकलून लावलें नाहीं का ?

अत्रे--तें चुकीचें आहे.

भेंडे--ह्मणून ती पुण्याला आली ?

अत्रे--चूक.

भेंडे--पुण्याला ती आपली मावशी दामले यांच्याकडे रहात असे ? त्यांनीं सांगितल्यावरून तिनें शाळेंत अर्ज केला ?

अत्रे —होय.

भेंडे--त्यानंतर एक महिन्यानें तिला होस्टेलची टयूटर नेमण्यांत आलें ?

अत्रे--नाहीं, प्रारंभापासूनच तिची नेमणूक करण्यांत आली होती.

भेंडे--आगरकर गर्ल्स स्कूलमध्यें बऱ्याच स्त्रीशिक्षिका होत्या ?

अत्रे--होय.

भेंडे--कुणाच्या बदली तिला नेमण्यांत आलें ?

अत्रे—स्वतंत्र ह्मणून तिची नेमणूक करण्यांत आली ?

भेंडे--त्यापूर्वी होस्टेलची टयूटर कोण होती ?

अत्रे--तिची मावशी दामले. त्या आपल्या नवऱ्याजवळ रहात असत.

भेंडे--पूर्वी कोणी वसतिगृहांत ( होस्टेल ) रहात असे ?

अत्रे--नाहीं.

भेंडे--प्रथम वनमाला राहूं लागली ?

अत्रे--होय.

भेंडे--तिला तेथें कोणी नेमलें ?

अत्रे—दामलेनीं. त्यांनीं माझी संमति घेतली.

भेंडे—होस्टेलच्या मुली सायंकाळीं फिरावयास जात असत, त्यांचा विनयभंग वगैरे होऊं नये ह्मणून लागवणकर शिक्षक बरोबर जात असत. तुह्मीं वनमालेला होस्टेलमध्यें त्या वेळीं भेटत असां ?

अत्रे--नाहीं. ऑफिस टाइममध्यें केव्हांही भेटत असें.

भेंडे--तुह्मीं तिला होस्टेलच्या ऑफिसमध्यें भेटत असां ? ऑफिस वनमालेच्या खोलीच्या पुढच्याच खोलींत होतें ?

अत्रे--होय.

भेंडे--आंत कधींच गेलां नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—वनमालेबरोबरच्या तुमच्या वागणुकीमुळें मिसेस दामल्यांचे व तुमचे संबंध बिघडले ? तुह्मी नेमलेले शिक्षक दामल्यांना पसंत पडले नाहींत ?

अत्रे—मी केलेल्या नेमणुका त्यांना पसंत पडल्या नाहींत.

भेंडे—शाळेंतील संख्या कमी होत असल्याचें नवीन प्रिन्सीपालना आढळलें ?

अत्रे—नाहीं

भेंडे—पण होस्टेल बंद झालें ना ?

अत्रे—त्या वेळीं नाहीं पण मागाहून बंद झालें.

२०-१२-४२

# तिच्या सौंदर्याचे उपयोग !

भेंडे—वनमालेचे तुह्मीं पालक आहां. तिला तुह्मीं सल्ला देतां. तिच्या सौंदर्याचा उपयोग ' नवयुग ' चा खप वाढविण्याला तुह्मीं केला कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—( वनमालेचें एक चित्र दाखवून कोर्टास )– हें ' नवयुग ' च्या मुखपृष्ठावर प्रसिद्ध झालें आहे. एका शाळामास्तरणीला त्यानें किती अधः पाताला नेली तें दाखवावयाचें आहे. कोणतीही विवाहित बी.ए.बी.टी. स्त्री, बी. ए. बी. टी. टी. डी. लंडनच्या गायडन्सखालीं असलेली स्त्री, आपलें असें चित्र प्रसिद्ध झालेलें सहन करणार नाहीं. ' लपंडाव ' पुस्तकावरही हें चित्र प्रसिद्ध झालें आहे. ( अत्रे यांस ) हें पुस्तक तुह्मी प्रकाशित केलें आहे ?

अत्रे—माझ्या चित्रपटाच्या कथानकावर कादंबरी लिहिण्यास मी परवानगी दिली.

भेंडे—तुह्मी तिचें चित्र कां दिलें ?

अत्रे—मागितलें ह्मणून दिलें. त्या पुस्तकाशीं माझा आर्थिक हित-संबंध नाहीं.

भेंडे—मागितलं नी दिलं ? वनमालेचे तुह्मी पालक कीं मालक ?

अत्रे—ह्मणजे काय ?

भेंडे—हें चित्र पाहून तिच्या नवऱ्याला काय वाटलें असेल ?

अत्रे—मला त्याची पर्वा नाहीं. मी तिच्याकडे कलावंत ह्मणून पहातों.

भेंडे—' नवयुग ' वर कां दिलें ?

अत्रे—चित्रपटाची प्रसिद्धी करण्याकरितां व ' नवयुग ' चा खप वाढविण्याकरितां.

भेंडे—शिकंदरमध्यें वनमाला नायकाच्या क्लोज कॉंटॅक्टमध्यें ( अगदीं जवळ,) येते ना ! शरीरांचा स्पर्श एकमेकाला होतो कीं नाहीं !

अत्रे—आह्मीं त्या दृष्टीनें तिकडे पहात नाहीं.

भेंडे—अहो, पण तिचे आईबाप व नवरा कोणत्या दृष्टीनें पहातील? त्यांना काय वाटेल ? तुम्हीं तिला सल्ला दिलात ?

अत्रे—हो, तिनें मागितला ह्मणून दिला.

भेंडे—दिल्लीला तुम्हीं वनमालेला घेऊन गेलां ?

अत्रे—नाहीं. ती आपल्या अंकलबरोबर गेली.

भेंडे—अंकल ह्मणजे कोण ? मामा कीं काका? मामा ह्मणजे भानगड.

अत्रे—भानगड ह्मणजे काय ?

भेंडे—तुम्हीं नाहीं का मामा ह्मणजे भानगड असें वरेरकरांना ह्मटलें ?

अत्रे—ते तिचे मामा होते.

भेंडे - ते कसें तुह्मांला समजलें ?

अत्रे—तिनें सांगितलें.

भेंडे—वनमाला ह्मणजे Series of woodlands ना ?

अत्रे—होय.

भेंडे—शंखचक्रगदापद्म—वनमाला विभूषित हा श्लोक तुह्मांला माहीत आहे काय ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—तो वनमाला शब्द तुम्हीं वसंतसेना पुस्तकांत वापरला आहे. हें पहा ‘ स्फटिकाच्या लकलकती । ओठांतुनि ओळी,

अरुणाची नाचतसे । गालावर लाली ! भासे वनमाला । ’

लकलकीत स्फटिकाच्या ओळी ह्मणजे वनमाला ना ?

अत्रे—नाहीं. वनमाला ह्मणजे वुडलँड.

भेंडे—शरीराचा कोणता भाग तुह्मांला वुडलँड ( अरण्यासारखा ) दिसतो ?

अत्रे—सबंध शरीर ह्मणजेच woodland incarnate.

भेंडे—‘ अत्रे-पिसाळलेलें कुत्रें ’ हें पुस्तक तुम्हीं वाचलें आहे ?

अत्रे—वाचलें नाहीं. त्याविषयीं ऐकलें आहे.

भेंडे—यांत एक विधान तुमच्या अब्रूला धोका आणणारें आहे. पुरुष सुपरिंटेंडंटच्या ऑफीसमध्यें आपण एक पलंग व त्यावर गादी असें दृश्य पाहिलें असा शेरा इन्स्पेक्ट्रेस बाईनें मारलेला आहे असें त्यांत ह्मटलें आहे.

फडके, बालगंधर्व, चिंतोपंत जोशी, यांच्यावर टाका करतां मग या टीकेला उत्तर कां दिलें नाहीं ?

अत्रे—तो क्षुद्र मनुष्य आहे.

भेंडे—या विधानानें तुमची बदनामी होत नाहीं ?

अत्रे—तो ल्युनॅटिक ( वेडा ) आहे असें मला समजलें.

भेंडे—मग असें लिहिणाऱ्याला ठाण्याला पाठवायला नको होतें ! हा गृहस्थ एम्. ए. आहे, शिक्षक आहे, दरमहा २५० रु. भाडें घेणारा आहे.

अत्रे—मला माहीत नाहीं.

भेंडे – एक वेळ तुह्मी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अनुयायी होतां ?

अत्रे—आजही आहे. कवि, समाजसेवक, या नात्यानें आजही मी त्यांना मानतों. १९०८ पर्यंतचें त्यांचें राजकारण मला मान्य आहे.

भेंडे—कॉंग्रेसमध्यें गेल्यावर तुह्मी सावरकरांवर टीका करण्यास प्रारंभ केला ?

अत्रे—तोंपर्यंत मी त्यांच्याशीं राजकारणाविषयीं चर्चा केली नव्हती.

भेंडे—बॅ. सावरकरांनीं अंदमानमध्यें कष्ट सोसले ना ?

अत्रे—होय. त्याविषयीं मला आदर वाटतो.

भेंडे—अन् त्यांना तुह्मी भेकड ह्मटलेंत ?

अत्रे—त्या काळाला उद्देशून मी तसें ह्मटलें नाहीं.

कोर्ट—सावरकरांच्याविषयीं ते त्यांनीं मान्य केलें आहे.

भेंडे—बॅ. सावरकर मुंबईला आले त्यावेळीं कृष्ण सिनेमांत त्यांचा सत्कार झाला—

अत्रे—त्यावेळीं मी अध्यक्ष होतों. पुण्याला सत्कार झाला त्यावेळींही अध्यक्ष होतों.

THE IDEAL B... CHABILDAS ROAD DADAR २५-१२-४२

# न त्याग, न सेवा !

भेंडे—' विविधवृत्त ' हें प्रमुख मराठी साप्ताहिक आहे ना ? त्यांत ' बाबुराव बेतानें बोला, बुद्धि बारगळली, पण कोणाची ? ' असें अनावृत्त पत्र तुह्मांला लिहिण्यांत आलें आहे. ' आपला–दुसरा कोण ? ' अशी लेखावर सही करण्यांत आली आहे. हें कोणी लिहिलें ?

अत्रे—माहीत नाहीं.

भेंडे—हें पत्र तुह्मीं वाचलें आहे काय ?

अत्रे—वाचलें. पण मी त्याला किंमत दिली नाहीं. उत्तर देण्याच्या तें लायकीचें नाहीं.

भेंडे—त्यांत ह्मटलें आहे– ' आधीं आगरकर हायस्कूलला कां ओहोटी लागली या गोष्टीचा विचार करा— ' ही ओहोटी वनमालेमुळें लागली कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—शाळा सोडल्यावर ती बराच काळ आजारी–हॉस्पिटलमध्यें पडून होती ना ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—' लपंडाव ' हा चित्रपट कोणी काढला ?

अत्रे—नवयुग चित्रपट कंपनीनें.

भेंडे—' नवयुग ' चित्रपटमध्यें असतांना वनमाला कोठें रहात होती ?

अत्रे—कोल्हापुरांत.

भेंडे—वनमाला भवानीपेठेंत रहात असतांना तुह्मी तिचें भाडें किती वेळां दिलेंत ?

अत्रे—आठवत नाहीं.

भेंडे—तुमची स्मरणशक्ति आतां दुर्बल होऊं लागलेली दिसते ! कोल्हापुराहून ती मुंबईला आली नी तुमच्याजवळ राहूं लागली ?

अत्रे—होय.

भेंडे—ती कोल्हापूरला असतांना तुह्मी तिकडे जात असां ना !

अत्रे—होय.

भेंडे—त्या वेळीं वनमालेकडे रहात असां ना ?

अत्रे—कधीं कधीं.

भेंडे—तुम्हीं तिला कधीं नैतिक विषयावर सल्ला दिलात कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं. तिला जरूर लागली नाहीं.

भेंडे—वनमालेला बरोबर घेऊन तुम्हीं पार्टीला जात असां कीं नाहीं ?

अत्रे—होय.

भेंडे—वाडिया मुव्हीटोनच्या मालकांनीं ता. ३१ जुलै १९३८ रोजीं–दारूबंदी सुरू होण्याच्या आदल्या रात्रीं–दिलेल्या पार्टीला तुम्हीं गेला होतां कीं नाहीं.

अत्रे—नाहीं.

भेंडे–त्या वेळीं दारू घेतली कीं नाहीं ?

अत्रे–नाहीं.

भेंडे–त्या वेळीं एका वृत्तपत्रकाराला तुम्हीं ‘ हिप्पापोटॅमस ऑफ इंडियन रेव्होल्युशन’ (हिंदी क्रांतीचा पाणहत्ती) असें दारूच्या निशेंत म्हटलें कीं नाहीं.

अत्रे—नाहीं, ती ‘ कॉक अँड बुल स्टोरी ’ ( कल्पित कथा ) आहे.

भेंडे—‘ ब्रँडीची बाटली ’ बोलपट मुंबईस मॅजेस्टिकमध्यें लागला तेव्हां तुह्मी आलां होतां कीं नाहीं !

अत्रे—होय.

भेंडे—रजा घेऊन आलां ?

अत्रे—होय.

भेंडे—रजा संपल्यावर तुह्मी गेला नाहीं. एक दिवस जास्त राहिलां. त्या वेळीं कँप एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नायडू तुह्मांला गाडींत भेटले. रजेच्या दिवशीं ‘ मस्टर रोल ’ वर तुमची सही होती, ह्मणून त्यांनीं खुलासा विचारला !

अत्रे—नाहीं.

भेंडे—त्याचप्रमाणें कॅंप एज्युकेशन सोसायटीचे गुरु, एज्युकेशनल इन्स्पेक्टर पावटे व देसाई यांनीं आपण शाळेमध्यें उपस्थित नसतां असे शेर कागदोपत्रीं मारले आहेत कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—सोसायटीचे 'लाइफ मेंबर' झाला. "त्याग व सेवा" हें त्या सोसायटीचें ब्रीदवाक्य होतें ?

अत्रे—मींच तें दिलें.

भेंडे—मग वीस वर्षे पुरीं होण्यापूर्वीच आपण कॅंप एज्युकेशन सोसायटी सोडलीत ? म्हणजे सेवा केली नाहींत व 'नवयुग' चे शेअर्स विकण्याकरितां दीड वर्षांची फर्लो मागितलीत. म्हणजे त्यागही घडला नाहीं.

अत्रे—फर्लोकरितां त्यापेक्षां मोठें कारण होतें.

भेंडे—कोणतें कारण.

कोर्ट—त्याचा येथें संबंध नाहीं.

भेंडे—कॅंप एज्युकेशन सोसायटी सोडून चित्रपट कंपनी काढलीत ? त्याचे शेअर्स विकण्याकरितां फिरत होतां ?

अत्रे—होय. इतरांबरोबर.

भेंडे—पैसे जमल्यावर भांडणें सुरू झालीं ?

अत्रे—नाहीं. चेअरमनशीं मतभेद झाला.

भेंडे—नवीन कंपनीकरतां पैसे उसने काढलेत ?

अत्रे—होय. नेहमींच काढतों.

भेंडे—परत करतां ?

अत्रे—होय.

भेंडे—कॅंप कोऑपरेटिव्ह सोसायटीकडून तुह्मी सोळाशें रुपये १९२८ मध्यें उसने घेतलेत कीं नाहीं ?

अत्रे—होय.

भेंडे—त्याची डिक्री झाली कीं नाहीं ?

अत्रे—होय.

भेंडे—दरमहा पंचवीस रुपये प्रमाणें अजून हप्ते भरतां कीं नाहीं ?

अत्रे--मला माहीत नाहीं. माझ्या कायदेशीर सल्लागाराला तें माहीत आहे.

कोर्ट--त्यांच्या आर्थिक परिस्थितीविषयीं प्रश्न कां विचारतां ?

भेंडे—कारण आरोपीनें झटलें आहे—' उसनवट रंगेलपणाच्या ऐन भरांत, ' ' गहाण पडलेल्या एकाद्या चित्रमंदिरांतील नकली पिस्तुलानें अठ्ठावीस ब्राउनिंग पिस्तुलाची खिल्ली करण्यास धजावें तशांतला प्रकार प्रल्हाद अत्रे यानें सावरकरांस मेकड झणून केला आहे. '

२१-१२-४२

CHAGILDI... BOMB...

## डॉक्टरांनीं दिला " एकच पेग "!

श्री भेंडे—( अत्रे यांस )-परशुराम भाऊ कॉलेमजध्यें हल्ला झाला त्याची सविस्तर हकीकत ' मारणोर मेले, मी जिवंत आहे.' या लेखांत दिलीत ?

अत्रे होय

भेंडे— दीडशें मुलें तुमच्यावर चालून आलीं व हल्ल्यास आरंभ केला. ही गोष्ट शक्य आहे ?

अत्रे —होय.

भेंडे - कसें शक्य आहे ? फार झालें तर दोघे तिघे हल्ला करतील ? दीडशें लोक कसा हल्ला करतील ?

अत्रे—त्यांनीं माझ्यावर गर्दी केली.

कोर्ट--याचा संबंध काय ?

भेंडे--त्यावेळीं हे दारू प्याले होते हें मला सिद्ध करावयाचें आहे. ( अत्रे यांस ) तुम्हीं त्यावेळीं दारू घेतली होती काय ?

अत्रे--नाहीं.

भेंडे—नंतर काय झालें ?

अत्रे--मला फार ग्लानि आली म्हणून डॉक्टरनीं ब्रँडीचा एक पेग दिला.

भेंडे—अहो, हल्ला झाल्यानंतर तुम्हीं आपल्या नेहमींच्या पद्धतीनें दीड-तासपर्यंत विनोदी भाषण केलेंत ना ?

अत्रे—होय.

भेंडे – त्यानंतर कोणाच्या घरीं गेलां ?

अत्रे--मित्राच्या.

भेंडे--त्याचें नांव काय ?

अत्रे—परांजपे नांव असेल. डॉ. खरे तेथें होते.

भेंडे--परांजपे यांचें संबध नांव काय ?

अत्रे—माहीत नाहीं.

भेंडे—ते काय करतात ?

अत्रे—काय करतात तें निश्चित माहीत नाहीं.

भेंडे—डॉ. पुरंदरे कोठें असतात.

अत्रे—सध्यां ते आफ्रिकेंत सैन्यांत नोकरीस आहेत. त्या वेळेस ते रजा घेऊन आले होते.

भेंडे--म्हणजे डॉ. पुरंदरे हे प्रॅक्टिस करीत नाहींत. मग त्यांनीं ब्रँडी कोठून आणली ?

अत्रे--कोठून आणली तें मला माहीत नाहीं. मी प्यालों एवढें खरें.

भेंडे--परांजपे घरांत दारू ठेवतात काय ?

अत्रे—मला माहीत नाहीं.

भेंडे—ब्रँडी घेतल्यावर काय केलें ?

अत्रे—बारा वाजेपर्यंत पडून होतों. त्यानंतर पोलिसकडे गेलों.

भेंडे—ब्रँडी केव्हां घेतली ?

अत्रे--१०-११ चे सुमारास.

भेंडे—कॉलेजमधील सभा केव्हां संपली ?

अत्रे--संध्याकाळीं ६ वा.

भेंडे--मग ग्लानि तुम्हांला पांच सहा तासांनीं आली ?

अत्रे--त्यानंतर मला सुमारें पांचशें मंडळी भेटावयास आली.

भेंडे--डॉक्टरनीं...आणखी काय काय उपाय केलें ?

अत्रे—त्यांनीं मालिश केलें.

भेंडे—ससून हॉस्पिटलमध्यें गेलां होतां ?

अत्रे—पोलिस स्टेशनवर गेल्यानंतर मला हॉस्पिटलमध्यें जाण्यास सांगण्यांत आलें.

भेंडे—तुमच्या तोंडाला वास येतो, अल्कोहोल घेतला आहे का, असें डॉक्टरनीं विचारलें ?

अत्रे—डॉक्टर काय म्हणालें तें मला माहीत नाहीं.

कोर्ट—( भेंडे यांस ) तुमच्याजवळ रिपोर्ट आहे ?

भेंडे—आम्हीं तो आणणार आहों. ( अत्रे यांस ) कर्नाटक प्रेसचे कुळ कर्णी माहीत आहेत ?

अत्रे—होय, ते माझे मित्र आहेत.

भेंडे—तुम्हीं दोघे बारमध्यें जात असां ?

अत्रे—नाहीं. ते दारू पीत नाहींत.

भेंडे—तें आम्हांला माहीत आहे. पण तुम्ही घेत असतां ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—तुम्ही आपल्या चित्रपटमंदिराचा ' हार्ड कॅसल वॉर्ड कं. ' मध्यें विमा उतरविला आहे कीं नाहीं ?

अत्रे—होय.

भेंडे—त्या कंपनीचे एजंट सुलतान जान महंमद यांनीं तुम्हांला हॉटेल मॅजेस्टिकमध्यें पार्टी दिली होती कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—तेथून तुम्हीं विलिंग्टन क्लबमध्यें गेलां कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे-प्रो. फडके यांनीं आयुष्यांत ज्या ज्या कांहीं मौजा केल्या आहेत, त्या अत्रे यांनींही केल्या आहेत, असें तुम्हीं ' नवयुग ' मध्यें लिहिलें आहे.

अत्रे—तशा प्रकारचें-मौजा म्हणजे काय हें सांगणें कठीण आहे. एक तास व्याख्यान द्यावें लागेल.

भेंडे—मग आतां हें पहा—" अत्रे यांनीं आयुष्यांतल्या सर्व सुखाचा, दुःखाचा, रसाचा, रुचीचा अनुभव घेतला असला तरी यापुढील आयुष्य जगण्यासाठीं देवपूजेचें, पश्चात्तापाचें किंवा एकाद्या झंकारचें ढोंग पांघरण्याची

त्याला कांहीं अवश्यकता वाटत नाहीं" असा कोणता रस अनुभवला कीं त्यानें पश्चात्तापाची आवश्यकता उत्पन्न होते ?

कोर्ट—रस ह्मणजे काय ?

अत्रे—रस ह्मणजे fullness, richness. Life in its richness.

भेंडे—Life in its richness चा अनुभव घेतल्यावर मनुष्याला पश्चात्ताप होत नाहीं. तेव्हां असा कोणता रस आहे कीं त्याचा अनुभव घेतला असतां पुढील आयुष्य जगण्यासाठीं पश्चात्तापाची आवश्यकता वाटते ?

अत्रे—याचा अर्थ richness, fullness. life in its richness fullness असाच होतो.

भेंडे—अहो, तुह्मी कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोर व्याख्यान देतां कीं काय? हें कोर्ट आहे, नीट विचार करून द्या.

कोर्ट—( भेंडे यांस ) एकदां त्यांनीं सांगितलें आहे. आणखी तुम्हांला जें काय सांगायचें असेल तें अर्ग्युमेंटमध्यें सांगा.

भेंडे—सामान्य वाचकाला जी गोष्ट सहज समजेल ती साक्षीदाराला समजत नाहीं. त्याला प्रश्नांचीं योग्य उत्तरें द्यावयाचीं नाहींत हें मला कोर्टाच्या निदर्शनास आणून द्यावयाचें आहे.

२२-१२-४२.

---

# प्रो. फडके काय "ढोसतात" ?

भेंडे—( अत्रे यांस ) हा उतारा पहा—"ईश्वरानें आपल्या कटोरींतील थोडीं भांग काढली आणि ती त्या नंदीला देत तो म्हणाला हें घे अमृत ! ज्या ज्या वेळीं स्फूर्तीची जरूर लागेल त्या त्या वेळीं हें अमृत घेत जा. मृत्युलोकांत याला जरा निराळा वास येईल. पण अनमान करण्याचें कारण नाहीं."

ही भांग मृत्युलोकांत निराळा वास येणारी ब्रँडीच ना ? आणि नंदी प्रो. फडके ना ?

कोर्ट—असं कुठे लिहिलं आहे कीं फडके नंदी म्हणून ?

भेंडे--पुढील उताऱ्यावरून हें स्पष्ट होतें:—

" पण देवा ! " नंदी म्हणाला,

" मृत्युलोकांत मी एकटा कसा राहुं ? मृत्युलोक असार आहे म्हणून ऐकतो. "

"तुला एक प्रिय शिष्या मिळेल. तुला जीवन सुसह्य होईल. जा, आतां मला जास्त सतावूं नकोस. "

" पण देवा ! " ईश्वराचे पाय धरीत नंदी पुन्हां म्हणाला, शेवटीं माझी गत काय ? माझा उद्धार कोण करील ? अहिल्येचा उद्धार श्रीरामचंद्रानें केला, त्याप्रमाणे माझा उद्धार करणारा एकादा महात्मा भूतलावर आहे काय ? "

नंदीच्या टाळक्यावर एक प्रेमळ चापटी मारून पार्वतीरमण म्हणाला, " काळजी करूं नकोस. मीं सर्व व्यवस्था केली आहे. आचार्य अत्रे नांवाचा एक थोर पुरुष मृत्युलोकांत जन्माला येईल. तो तुझ्या थोऱ्या वाजवील, तेव्हांच तुझा उद्धार होईल. आणि एक गोष्ट लक्षांत ठेव; जेव्हां तुला म्हातारपण येईल, तेव्हां ' सख्या हरि ' ' सख्या हरि ' या पवित्र नाममंत्राचा जप कर. विसरूं नकोस. "

अत्रे--हें मीं लिहिलें नाहीं.

भेंडे—' फडक्यांना जसा पश्चाताप झाला ' याचा अर्थ काय ?

अत्रे--फडके हिपोक्रिट ( ढोंगी ) आहेत असें म्हणावयाचें आहे.

भेंडे—मौजांत enjoy a woman, enjoy a wife ( स्त्रीचा उपभोग घेणें ) हा प्रकार येतो कीं नाहीं ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—" दुःख भोगलें " असें आपण म्हणतां. कोणतें दुःख आपण भोगलेंत ?

अत्रे--दुःख म्हणजे मी निकृष्ट दर्जाचें जीवन जगलों नाहीं.

भेंडे—म्हणजे ताडीमाडी नव्हे; पण ब्रँडी ? बरं, आता २० जुलै १९४१ च्या ' नवयुग ' मधील ' अत्रे यांचा अवतार कां झाला ? पुराणांत न सांगितलेली कथा ' या लेखांतील हा उतारा पहा--

'फडके रोज संध्याकाळीं कोल्हापूरला एका डॉक्टरच्या दवाखान्यांत जाऊन काय ढोसतात' असें तुम्हीं लिहितां. यांत तुम्हांला काय सुचवायचें आहे ?

अत्रे—य. गो. जोशी व प्रो. फडके यांच्यांत वाद चालला होता. त्यांनीं 'य. गो.' चहा ढोसतात असा आरोप केला. मीं त्याला उत्तर दिलें. काय ढोसतात असा मी प्रतिप्रश्न केला.

भेंडे—अलंकारिक प्रश्नाला उत्तर द्यावें लागत नाहीं. संध्याकाळीं डॉक्टरच्या डिस्पेन्सरींत जाऊन काय ढोसतात याचा अर्थ दारू पितात असाच ना?

अत्रे --डॉक्टरच्या दवाखान्यांत दारू असते कीं काय ?

भेंडे--डॉ. पुरंदऱ्यांकडे दारू होती कीं काय ? 'फडक्यांनीं' जादा डोस घेऊन लिहिलें आहे काय ?–म्हणजे काय ?

अत्रे--चहा असल त्यांत दारूही येते.

भेंडे--जादा डोस घेऊन लिहिलें म्हणजे शुद्धीवर राहून त्यांनीं लिहिलें नाहीं असा अर्थ होतो ना ?

अत्रे--होय.

भेंडे--मग असा कोणता डोस असतो कीं ज्यागें मनुष्याची शुद्धी हरपते ?

अत्रे--कैफ आणणारें कोणतेंही पेय.

भेंडे--म्हणजे फडके दारू पितात असा अर्थ होऊं शकेल.

नटनटींना ड्रिंक देतां कीं नाहीं ?

अत्रे--नाहीं.

भेंडे--औट डोअरला गेल्यावर ?

अत्रे--नाहीं.

भेंडे --पण चित्रपटकंपन्यांविषयीं नवयुगमध्यें तसें लिहिलें आहे.

अत्रे--मीं तें वाचलें नाहीं.

भेंडे---नवयुगकडे तुम्हीं दुर्लक्ष देतां काय ? नवयुगमध्यें जें जें येतें तें तुम्हीं वाचीत नाहीं.

अत्रे--नाहीं. सर्वच वाचीत नाहीं.

भेंडे--लोकांनीं मात्र वाचावें ?

अत्रे--होय. माझा स्टाफ कॉंपिटंट आहे. तो अनुचित कसें लिहील ?

भेंडे--म्हणजे नवयुगमध्यें येतें तें सगळेंच चांगलें असतें काय ?

अत्रे--होय.

२३-१२-४२.

---

## फडके व कमल ह्यांचे "जुझू" !

श्री. भेंडे—हें पहा, अत्रे, 'जुझू' ह्मणजे काय? ता. १०-८-४१ च्या 'नवयुग' च्या अंकांत तुह्मीं हा शब्द वापरला आहे.

भेंडे—दार लावून फडके व कमल दीक्षित 'जुझू' करतात ह्मणजे काय ?

अत्रे—जुझू ह्मणजे पाळण्यांत झोंपविणें.

भेंडे—अहो तें जो जो.

अत्रे—जपानी त्याला जुझू म्हणतात.

भेंडे—ह्मणजे तुह्माला जपानी येतें तर! तुमच्याप्रमाणे जुझू करणें ह्मणजे झोंपविणें ?

अत्रे—होय.

कोर्ट—हें तुह्मी कशाकरितां पुढें आणीत आहां ?

भेंडे—फडके व कमल दीक्षित यांचे अनैतिक संबंध असल्याचें अत्रे सुचवितात.

अत्रे—मीं तसें कधींच सुचविलें नाहीं. त्यांची मैत्री बौद्धिक ( Platonic friendship ) आहे. कमल दीक्षितनींच 'नवयुग 'च्या अंकांत 'माझे अप्पा मला कसे दिसतात' हा लेख लिहिला होता.

श्री. भेंडे—'नवयुग' च्या अंकांतून 'फडके, तुह्मी तर्कशास्त्राचे प्रोफेसर आहांत. सर्व गोष्टी पुराव्यानें सिद्ध कराव्या लागत नाहींत. अनुमान म्हणून कांहीं असतें. आणि व्यवहारज्ञानाने हें सर्वांस समजतें' असें तुह्मीं म्हटलें आहे. आणि फडके आणि कमल दीक्षित दारें लावून जुझू करीत बसतात, असें म्हटलें आहे. यावरून तुह्मी त्यांचे अनैतिक संबंध सुचवीत नाहीं काय ?

अत्रे—नाहीं. ते मूर्ख योजना आंखीत असतात, असें मीं सुचावेलें आहे.

भेंडे—मग दारें लावून बसण्याची काय जरूर? बरें हा २०-७-४१ चा 'नवयुग' चा अंक पहा. 'शांतारामाचा भाडोत्री कुत्रा-फडके' हा लेख तुह्मींच लिहिलात ना?

अत्रे—मी लिहिलेला नाहीं. मला तो पसंत आहे.

भेंडे—पसंत आहे, तर येथें तुह्यांला जुझूचा अर्थ सांगतों.

श्री. भेंडे यांनीं त्या लेखांतील अप्पांचें पोट दुखत आहे, कमल दीक्षित पु. रा. ना म्हणते, 'तुम्ही बाहेर जा, मी अप्पांना जुझू करतें.' येथें पु. रा. ना, बाहेर जावयास का सांगितलें आहे?

अत्रे—भिडे म्हणजे एक लहान मुलगा समजानात!

भेंडे—म्हणजे लहान मुलासमोर करतां येत नाहीं असें जुझू असल्याचें तुम्हांला सुचवावयाचें आहे काय?

अत्रेः—मला कांहीं माहीत नाहीं. मी तें लिहिलें नाहीं. तें विनोदी लिखाण आहे.

भेंडेः—विनोद असला तर तो घाणेरडा आहे. आपण जरी तो लिहिला नसला तरी हा घाणेरडा विनोद तुह्मीं प्रसिद्ध करून तो १॥ लक्ष वाचकांसमोर जाणें हें त्याहूनही वाईट आहे. बरें, कमल दीक्षितचें लग्न झालें आहे काय?

अत्रे—नाहीं.

भेंडे—मग तुम्ही तिचा सातारच्या एका बॅरिस्टरबरोबर, कोल्हापूरच्या प्रोफेसरबरोबर संबंध कां सुचवितां?

अत्रे—मी सुचवीत नाहीं. मी तें लिहिलेलें नाहीं.

भेंडे—या लेखांत कमल दीक्षितनें मला जुझू कसें करायचें तें शिकविलें आहे असें जयश्री शांतारामला लडिवाळपणें सांगते. यांत तुम्हांला काय सूचवावयाचें आहे?

अत्रे—मी कांहीं सांगू शकत नाहीं.

भेंडे—या लेखांत फडके आणि कमल दीक्षित, विनायक आणि मिनाक्षी, शांताराम व जयश्री, आणि बाबुराव व ललिता पवार यांच्या जोड्या दाखवितां, मग अत्रे व वनमाला यांची जोडी दाखविली तर तुमची बदनामी कां होते.

अत्रे--ती सिनेमांत एकत्र काम करतात म्हणून त्यांचा एकत्र उल्लेख केला आहे.

भिंडे—कमल दीक्षित व फडके यांनीं कुठें काम केलें आहे ? शांताराम व जयश्री यांनी काम केलेलें नाहीं ?

अत्रे:—' झंकार ' ची संपादक कमल दीक्षित व सहाय्यक फडके म्हणून एकत्र काम करतात.

भिंडे:—तुम्ही व वनमाला चित्रमंदिरांत भागीदार आहांत ?

अत्रे:—आमची जोडी दाखवून अनैतिक संबंध दाखवितात.

येथें दु. २ वाजून मधली सुटी झाली.

मधल्या वेळच्या सुट्टीनंतर उलट तपासणी पुढें सुरू झाली.

भिंडे—'पायाची दासी' ह्या बोलपटाची पटकथा तुम्हीं लिहिली आहे ना ?

अत्रे—होय.

भिंडे--त्यांत घारुअण्णा हा खलनायक आहे व नायिका यमु हिच्याशीं अतिप्रसंग करण्याकरितां तो पोटदुखीचें निमित्त करतो असें दाखविलें आहे.

अत्रे – होय. खलनायकाची ती एक ट्रिक आहे.

भिंडे—त्याचप्रमाणें १० जुलै १९४१ च्या ' नवयुग ' च्या अंकांत ' शांतारामाचा भाडोत्री कुत्रा-फडके ' या लेखांत फडके हे घारूअण्णासारखे माझें पोट दुखतें असें म्हणून विव्हळत असल्याचें दाखविलें आहे ?

अत्रे—त्यांत कांहीं साम्य नाहीं. मला तशा प्रकारचें कांहींच सुचवावयाचें नाहीं.

भिंडे—तसें सुचवावयाचें नव्हतें तर त्यांत घारूअण्णासारखे विव्हळत आहांत हें कसें लिहिलेंत ?

अत्रे--मी तें लिहिलेलें नाहीं.

भिंडे—पुढें असें लिहितां-भिंडे कमल दीक्षितला असें विचारतात कीं, काल रात्रीं अप्पांनीं कांहीं कमीजास्त केलें नाहींना ? कमल लाजते ' यानें काय सुचवितां ?

अत्रे--कमीजास्ती म्हणजे Excesses in Indulgences. वाचकांनीं काय तें ठरवावें.

भेंडे—पण याचा अर्थ काय ? तुह्मी पुढें लिहितां, ‘ अप्पाचें वय झालें आहे व त्यांत तुह्मी भेटलांत ’

अत्रे--याच्यांत कांहीं सूचित केलेलें नाहीं. ते म्हातारे आहेत व त्यांना आपली जबाबदारी कळत नाहीं. आपली पुस्तकें ते कमलच्या नांवानें छापतात इतकेंच ह्मणावयाचें आहे.

भेंडे--यांत कांहीं अनैतिक संबंध सुचविला जात नाहीं काय ?

फिर्यादीचे वकील श्री. तळपदे मध्येंच उठून—श्री. भेंडे यांनीं याबाबत पूर्वीं कांहीं प्रश्न विचारले आहेत. व्यंगचित्राबद्दल त्यांची जबानी वाचून दाखवितों. अनैतिक संबंध सुचविला नाहीं व तो सुचविणारीं व्यंगचित्रेंही छापलीं नाहींत असें त्यांनीं ह्मटलें आहे.

भेंडे--मी तळपदे यांचा फार आभारी आहे. काहो अत्रे, १३ जुलै १९४१ च्या ‘ नवयुग ’ मध्यें फडके व कमल दीक्षित यांचीं दोन व्यंगचित्रें छापलीं आहेत ना ? या व्यंगचित्रांत फडके ह्मणतात ‘ मी साहित्यसूर्य आणि कमल दीक्षित कुंती ’ असें वर्णन आहे. दुसरें चित्र ‘ पायाची दासी ’ असें आहे त्यांत फडके धारूअण्णासारखे उभे असून कमल पायाची दासी दाखविली आहे.

अत्रे--मी हीं व्यंगचित्रें काढलेलीं नाहींत.

भेंडे--घाबरूं नका. शूरासारखे कबूल करा. तुह्मी हीं प्रसिद्ध तरी केलीं आहेत ना ?

कोर्ट--ह्या व्यंगचित्रावरून तुम्हांला काय सांगायचं आहे ?

भेंडे—या व्यंगचित्रांत फडके साहित्यसूर्य व कमल कुंती दाखविली आहे कमल म्हणते कीं तुम्ही आपल्याला सूर्य म्हणवूं नका. कारण त्यानें कुंतीच्या कौमार्याचा भंग केला आहे. दुसऱ्या व्यंगचित्रांत कमल विचारते,–तुम्हीं ‘पायाच्या दासी’वर टीका करणार ? म्हणजे माझें चरित्र चवाट्यावर आणणार काय ? ( अत्र्यांना उद्देशून ) हें चरित्र काय ?

अत्रे-त्या व्यंगचित्रांत अनैतिक कांहींच नाहीं.

भेंडे-तुम्हांला नीति आणि अनीतींतला फरक कळतो काय ? कुंतीला कौमार्यावस्थेत सूर्यापासून पुत्र झाला होता हें माहीत आहे काय ? असा या व्यंग चित्रावरून वाचकांच्या मनावर परिणाम होत नाहीं काय ?

पुढें श्री. भेंडे यांनीं विचारलें-तुम्हाला विदूषक म्हटलें म्हणून तुमची हरकत आहे काय ?

अत्रे—माझी कांहींच हरकत नाहीं.

भेंडे--वनमाला क्रॉसवर या नरपुंगवाचा कितपत अधिकार आहे हें पहाण्याचा प्रसंग परशुराम कॉलेजवर नुकताच येऊन गेला—यांत तुम्हाला आक्षेपार्ह काय वाटतें ?

अत्रे—वनमाला क्रॉसवर यांत कांहीं आक्षेपार्ह नाहीं. व्हिक्टोरिया क्रॉस-सारखा वनमाला क्रॉस. परंतु हा उल्लेख करण्याचा हेतू चांगला नाहीं.

भेंडे—वनमाला क्रॉस म्हणजे गौरव आहे, मान आहे. मानापमानांत लक्ष्मीधर विदूषक व धैर्यधर वीर असून आपल्या विनोदानें व पैशाच्या जोरावर तो वनमालेला मिळविण्याचा प्रयत्न करतो. पण वनमाला विदूषक लक्ष्मीधराकडे न जातां धैर्यधराचे पाठीमागें गेली.

अत्रे—वा त्यांचें परस्परांविषयीं प्रेम होतें. धैर्यधराचें वनमालेवर प्रेम होतें.

भेंडे—त्याप्रमाणें सध्यांची तरुण पिढी वनमाला ही लक्ष्मीधर अत्र्यांच्या मागें नसून धैर्यधर सावरकरांच्या मागें आहे हें स. प. कॉलेज मधील प्रसंगावरून सिद्ध झालें हें आरोपीला दाखवून द्यावयाचें आहे.

श्री. तळपदे—वनमाला विष्णूच्या गळ्यांतून निघाली तर !

श्री. भेंडे—आतां ही वनमाला धैर्यधर सावरकरांच्या गळ्यांत पडते कां लक्ष्मीधर अत्र्यांना मिळते हाच प्रश्न आहे. सावरकर धैर्यधरासारखे.

अत्रे--म्हणजे ?

. भेंडे—सावरकर तुरुंगांत होता ना ?

अत्रे--काय होता ! अहो ' होते म्हणा.

भेंडे--अहो आपण शिवाजी हजर होता असें म्हणतों ना ? तुम्हीं त्यांना शिव्या द्या, भेकड म्हणा, आणि आम्हांला 'अहो' म्हणावयाला सांगा ! पुढें पाहूं. निशाणी 'सी' मधील लेखांतील कोणत्या मजकुराबद्दल तुमची हरकत आहे ?

अत्रे—मद्यबलांत मद्यप्याला १० ग्लासांत चीत करणारे, छेलबटाऊला गुरुस्थानी, नीतिमत्ता बोलूं लागले इ. वाक्यांबद्दल माझी हरकत आहे.

भेंडे--परंतु अलंकारांत व्यतिरेक अलंकार, ' नसलेलें दाखविणें ' या करितां वापरतात नाहीं ? लेखकाला तुम्ही तसे नाहीं असें सुचवावयाचें आहे. ऐका—पराक्रमांत पोरसावर कडी करणारे, पोरसापेक्षां तुम्ही कांहीं पराक्रम केला आहे काय ?

अत्रे--पोरसाचा पराभव झाला.

भेंडे--म्हणून तो पराक्रमी नव्हता काय ? पराक्रमी मनुष्याचा पराभव होत नाहीं काय ? शरीरबलांत बुरूड पेहेलवानावर मात करणारे-तसे तुम्ही आहांत काय ?

अत्रे—तसा मी नाहीं.

भेंडे—आत्मबलांत गांधींना लज्जा आणणारे-असे आहांत का तुम्ही ?

अत्रे—माझ्या वागणुकीनें मी गांधींना कमीपणा आणीत आहें असें लेखकाला सुचवावयाचें आहे.

भेंडे—अहो, मला तेंच दाखवावयाचें आहे. तुम्ही कॉंग्रेसच्या चळवळींत कांहीं तुरुंगांत गेलां नाहीं-मग गांधींना लाज वाटणारच.

कोर्ट—त्याचा येथें संबंध कशाला ?

तळपदे—कॉंग्रेसनें लोकांना तुरुंगांत जावयाला सांगितलें याला पुरावा काय ?

भेंडे—अत्रे हे भोंदू आहेत असें दाखवून द्यावयाचें आहे. कॉंग्रेस वार्किंग कमिटीनें--

कोर्ट--त्याचा याच्याशीं कांहीं संबंध नाहीं.

भेंडे—बरें. पुरुषबलांत छेलबटाऊच्या गुरुस्थानीं असणारे-'छेलबटाऊ' म्हणजे काय ?

अत्रे--मोहन व छेलबटाऊ हें तमाशांतील एक रोमॅंटिक जोडपें आहे. येथें लेखकानें मी वैषयिक उपभोगाला प्रोत्साहन देणारा आहे असें सुचविलें आहे.

भेंडे—पौरुष कसें मिळवावें या अर्थी तुम्ही गुरुस्थानीं म्हटलें तर काय बिघडलें ?

अत्रे—तरी सुद्धां अर्थ उलट होतो ! ता· ६-१२-४२.

# सौ. सुधा अत्रे ह्यांचें पत्र !

भेंडे—तमाशाचे तुम्हीं चाहाते आहांत ?

अत्रे—होय. राष्ट्रोद्धाराकरितां योग्य उपयोग केल्यास तमाशा हें एक बलिष्ठ साधन आहे.

भेंडे—तुम्ही तमाशागृहाचें उद्‌घाटन केलेंत ना ?

अत्रे—होय.

भेंडे—आणि त्याबद्दल तुम्हांला चांदीची लेखणी नजर करण्यांत आली ना ?

अत्रे—होय.

भेंडे—' सैतान घोष करूं लागला ' यांत काय वाईट आहे ?

अत्रे—सैतानानें बायबलचा आधार घेतला यांत सर्व दुष्टारोप आहे. ह्या उदाहरणाला माझा आक्षेप आहे.

भेंडे—सर्वच लिखाण दृष्टांतवजा आहे, आणि तें विंचवाप्रमाणें टोंचणारें आहे

तळपदे—त्या नांगीतच बदनामी असते.

भेंडे—सार्वजनिक आयुष्यांत इतकें चिडखोर-नाजुक असून चालत नाहीं. माझे मित्र तळपदे तसे नाहींत. त्यांच्या अशीलांनीं त्यांच्यापासून धडा घ्यावा.

कोर्ट—सुनावणींत आपण फारच थोडी प्रगति केली आहे.

भेंडे—मला सर्व गोष्टी विस्तारानें सांगाव्या लागतात. मग फिर्यादीस आपल्याला योग्य तऱ्हेनें प्रत्युत्तर मिळालें असें आढळून येईल.

भेंडे—पुढें असें-फोरास रोडवरील बया वटपूजा करावयास निघाली ! लग्नबंधनाची बेडी तोडून एका भ्रमाच्या भोपळ्याबरोबर तरंगत जाणारी स्त्री गृहसंस्थेवर पटकथा लिहूं लागली ! सदैव गटारांत बुचकळलेली लेखणी गंगामाहात्म्य आठवून अमृताशीं पैजा मारूं लागली ! फडक्यांच्या आईबापांचा नीचपणें उल्लेख करणारे व सावरकरांस भेकड म्हणणारे अत्रे ' चांगल्या वर्तना-

विषयीं दहा नियम ' सांगू लागले–" फडक्यांच्या बापाचा तुम्हीं नीचपणें उल्लेख केला नाहीं ?

अत्रे—मीं कधींच केला नाहीं.

भेंडे—फडक्यांचा बाप कानपूरचा व आई लखनौची असा तुम्हीं उल्लेख केला नाहीं काय ?

अत्रे—नाहीं. फडक्यांनीं वादाचा गोल गतिमान केला व मी त्याप्रमाणें उत्तर दिलें इतकेंच.

भेंडे—हें पहा, ' सडक्या अंड्यांनीं व टमाट्यांनीं शरीरशोभा झाल्या-मुळें एकाद्या ' फौल ' खान साम्याची कळा अंगावर आली असतांही केशराचें विलेपन झाल्याचा आव अत्रे आणीत आहेत–यांत तुम्हांला काय आवडलें नाहीं ?

अत्रे—स. प. कॉलेजमधील प्रकाराबद्दल लेखकानें माझा उपहास केला आहे, हें मला आवडत नाहीं.

भेंडे—स. प. कॉलेजांत तुम्हांला सोडावॉटर बाटलीनें, खेटरांनीं, गुद्यानें, टांचण्या टोंचून, व अंडीं फेकून मारलें होतें ना ? तेंच वर्णन हें आहे.

अत्रे—पण ' आंधळ्याची शाळा ' या नाटकांतील ' फाऊल ' खान-सामाशीं माझी तुलना करून मी त्या प्रकारांतून बटलरसारखा बाहेर पडलो असें लेखकानें म्हटलें आहे. तें मला पटत नाहीं. त्या दिव्यांतून मी वीरा-प्रमाणें बाहेर पडलो असें माझें म्हणणें आहे.

भेंडे—हा मतभेद आहे. तुम्हांला वाटतें वीराप्रमाणें बाहेर पडलों, आरोपीला वाटतें खानसामाप्रमाणें ! बरं, ' धडोतीचीं वस्त्रें छिनावलीं गेल्यावर अमरपदरूपी दिग्वस्त्रांचा अलभ्य लाभ झाल्याविषयीं हर्षाकुल असल्याचें सोंग ते दाखवीत आहेत ' यांत कांहीं आक्षेपार्ह आहे काय ?

अत्रे—नाहीं. अर्थात् तीही एक शिवीच आहे.

भेंडे—पुढें पहा—बऱ्या बोलानें आपल्या थडग्यांत पडून रहावयास अत्रे मास्तर सिद्ध असते... यांत मास्तर म्हटलें तर तुम्हांला वाईट नाहीं ना वाटलें ?

अत्रे—नाहीं. उलट त्याबद्दल मला अभिमान वाटतो.

श्री. भेंडे यांनीं त्या लेखांतील एक एक परिच्छेद वाचून दाखवावयाला सुरुवात केली. तेव्हां अत्रे म्हणाले—अहो, त्यांना माझा आक्षेप नाहीं. पुढचे दोन कॉलम गाळा. पान ४ वरचा शेवटचा परिच्छेद पहा.

भेंडे—अहो, पण मला त्यापूर्वीचा परिच्छेद वाचून दाखविणें जरूर वाटतें. हें पहा–" प्रिय आचार्य, खुणेची गोष्ट विचारतों. जुन्या नगरकर प्रकरणाचा हिशेब चुकता करूं इच्छिणारे तर ते कुणी खत्रीस नव्हते ? " हें नगरकर प्रकरण काय आहे ? नगरकर कोण ?

अत्रे—मला तें माहीत नाहीं. पुढें पान ५ वरील शेवटच्या परिच्छेदाला माझा आक्षेप आहे.

भेंडे—बरें, तें मी वाचतों. ' आणि स. प. कॉलेजविषयीं आचार्यांची स्पष्ट सदिच्छा तरी काय आहे ? त्या कॉलेजचें बेहोष मद्यालय व्हावें, कीं रंगेल स्टुडिओ व्हावा ? त्यांत गुंड धैर्यधर निर्माण व्हावेत कीं विनोदमूर्ति लक्ष्मीधर धैर्यधराच्या निर्मितीमुळें वनमाला चळेल, अशी तर धास्ती आचार्यांस वाटत नाहींना ?–यांत काय बोचणारें आहे ?

अत्रे—मद्यालय व्हावें असें म्हणून त्यानें मी दारू पितों असें सूचित केलें आहे. म्हणून माझा त्याला आक्षेप आहे.

भेंडे—अहो, तुम्ही मुलांना शिस्त, व ज्ञानार्जनाचा उपदेश केला म्हणून आम्हांला हे लिहावें लागलें. बरें असो. तुमचें गांव सासवड ?

अत्रे—होय.

भेंडे—तुमचे वडील काय करीत होते ?

अत्रे–पुण्याला एका बँकेचे मॅनेजर होते, व त्यापूर्वी सासवड म्यु. चे ते सेक्रेटरी होते.

भेंडे—त्यांना पगार काय होता ?

अत्रे—२० रु.

भेंडे—तुमच्या कुटुंबांत पुष्कळ माणसें होतींना ?

अत्रे–होय.

भेंडे—पुण्याला तुम्ही सरदार पुरंदऱ्यांच्याकडे रहात होतां ना ?

अत्रे—पुरंदऱ्यांच्याकडे ? मी पुरंदऱ्यांच्या वाड्यांत राहात होतों.

भेंडे—तुम्ही पुरंदऱ्यांकडे आश्रित म्हणून होतां ना ?

अत्रे—गरिबीमुळें मी त्यांच्याकडे रहात होतों.

कोर्ट-या गोष्टींची काय आवश्यकता ?

भेंडे—निशाणी २ मधील ४ थ्या परिच्छेदांत ‘ रुद्राक्षासारखे लांगूल चालक व लूत भरलेलें शरीर, परान्नावर पुष्ट करण्यांत अत्र्यांचा पूर्वार्ध खर्ची पडला-तसेंच गालफडाचे द्रोण होते, शरीराच्या पत्रावळी होत्या, व हाडाच्या चोयट्या होत्या वगैरे मजकूर वाचण्यांत आला.

अत्रे—मला परान्नपुष्ट म्हटलें आहे. पण मी त्याला आक्षेप घेत नाहीं. लूत भरलेलें शरीर यालाच माझा आक्षेप आहे.

भेंडे--तुम्ही कँप एज्युकेशन सोसायटींत ३० रु. वर नौकरीस होतां ना ?

अत्रे--तेथें होतों-पण ३० रु. वर नाहीं. पगार ७० रु. होता.

भेंडे--तुम्ही भाषणांत म्हटलें आहे कीं—

कोर्ट--याची काय जरूर आहे ? त्यांना ३० रु. पगार असेल नाहींतर ७० रु.

भेंडे-मला त्यावरून इतकेंच दाखवावयाचें आहे कीं, त्या वेळीं ‘ त्यास इस्तरीदार कपडे ही अज्ञात चीज होती, तेलाचें दर्शन यास नरकचतुर्दशीच्या दिवशीं काय तें पडत असे, बियरच्या बाटल्या यास गॅसलेटच्या बाटल्यांच्या रूपानें दिसत असत. ’

कोर्ट—यांत त्यावेळीं बियरच्या बाटल्या पहावयाला मिळत व आज फिर्यादी बियर पितो असा त्यांतून अर्थ निघतो, यालाच फक्त आक्षेप घेण्यांत येत आहे.

भेंडे--काय हो अत्रे, तुम्ही दारू पीत नाहीं ?

अत्रे--नाहीं.

भेंडे--पुण्यांत पूना बार रेस्टोरांटमध्यें तुमचा अकौंट आहे काय ?

अत्रे--पूना बार— ?

भेंडे--जनरल पोस्टाच्या समोर आहे तें.

अत्रे--तें पूना हॉटेल ! तेथें माझा अकौंट आहे. पण तेथें मी मित्रांना खाना देत असतों.

भेंडे—तेथें पेय कोणतें घेतां ?

अत्रे--मी घेत नाहीं. पण आम्ही तेथें hot, soft, cold, ड्रिंक्स देतों. कधीं कधीं मिक्सखाना असतो.

भेंडे--तुह्मी काय पितां—व्हिस्की ? ब्रँडी ?

अत्रे—सोडा, पाणी वगैरे.

भेंड—काय तुह्मी दारू पीत नाहीं ? हें सौ. अत्रे यांचें पत्र पहा. ( पत्रावरील सही दाखवून ) ही सौ. अत्रे यांचीच ना सही ?

अत्रे—मला तें वाचूं द्या.

भेंडे—फक्त सहीच पहा. पत्र वाचूं नका.

अत्रे--( पत्रावरील सही पाहून ) होय. ही सौ. अत्रे यांचीच सही आहे.

भेंडे—तुह्मी सत्तूरना ओळखतांना ?

अत्रे—होय. ते माझे शत्रू आहेत. ते सोसायटीचे सेक्रेटरी होते.

भेंडे—तुम्ही व मिसेस अत्रे त्यांच्याकडे जेवायला जात होतां ना ?

अत्रे—वर्षाकाठीं दोन तीन वेळां.

भेंडे—तुह्मी व सौ. अत्रे एकदां जेवायला गेलां असतां सत्तूर व तुह्मी दारू पीत असतां मी स्वयंपाकघरांत गेलें असें या पत्रांत लिहिलें आहे.

अत्रे--असेल. कोणत्या परिस्थितींत हें पत्र लिहिलें आहे तें मला माहीत नाहीं.

तळपदे--हें पत्र भेंडे यांच्या ताब्यांत कसें आलें ?

भेंडे—साक्षीला मिसेस अत्रे व श्री. सत्तूर येणार आहेत.

तळपदे--पण याचा येथें संबंध काय ?

भेंडे—ते दारू पितात हें सिद्ध करायचें आहे.

कोर्ट—दारू पितात असें जरी गृहीत धरलें, तरी त्यांना जाहीरपणें दारुडे असें कसें ह्मणतां येतील ?

भेंडे--आक्षेपित लेखांत त्यांना दारुड्या व मद्यपी ह्मटलें असून ते ह्मटलें नीतितत्वें शिकविण्यास योग्य नाहींत असा आमचा दावा आहे.

कोर्ट—ते अतिशय दारू पितात हें सिद्ध करणें सार्वजनिक हिताचें आहे हें दाखवून द्यावें लागेल.

भेंडे—होय. तेंच आह्मांला दाखवावयाचें आहे.

अत्रे--मी दारू कधींच पीत नाहीं.

भेंडे---तुमचा ग्रँडन, कॉर्नेलिया, वगैरे ठिकाणीं अकौंट आहे ना ?

अत्रे--माझा पुष्कळ ठिकाणीं अकौंट आहे. ग्रँडनमध्यें अकौंट ठेवीत नाहीं. मी ग्रँडनमध्यें केव्हां केव्हां जेवावयाला जातों.

भेंडे---दहाबारा दिवसांपूर्वी तुम्ही दिल्लीला गेलां त्यावेळीं ग्रँडनमध्यें गेलां होतां ना ? तेथें दारू घेतली काय ?

अत्रे-नाहीं तेथें मी जेवलों; दारू घेतली नाहीं. सोडा, पाणी प्यायलों.

भेंडे-त्यावेळीं तुमच्या बरोबर कोण होते ?

अत्रे-माझे भागीदार मोटे होते.

भेंडे-बरें. तुम्हाला आठवते, १९३७ मध्यें थिएटरजवळ तुम्ही दारू पिऊन सांपडलेत व टांग्यांतून तुम्हांला घरी पोचवलें असतां तुम्ही टांगेवाल्याला मारलेंत—

अत्रे---हें साफ खोटें आहे.

भेंडे---एकदां तुम्ही अतिशय दारू प्यालात व सिगरेट पितांना बिछान्याला आग लागली.

अत्रे-अगदीं अजिबात खोटें.

७-१२-४२.

---

## " फडक्यांच्या पश्चिमतनूवर चपला- "
## " बाप कानपूरचा कीं आई लखनौची-! "
## छपरी पलंगाचा उल्लेख !

भेंडे ( अत्रे यांस ) निशाणी जे. सी. मध्यें आरोपीनें म्हटलें आहे- " फडक्यांच्या आईबापांचा नीचपणानें उल्लेख करणारे अत्रे- " तुम्ही फडक्यांच्या आईबापाचा कोठें नीचपणें उल्लेख केला आहे काय ?

अत्रे---आज आठवत नाहीं.

भेंडे---तुम्हांला कुठलीही गोष्ट दाखविल्याशिवाय कांहीं आठवतच नाहीं आठवत नाहीं तर इतकें भारूड लिहितां कशाला? आतां ? १२-१-४१ चा

' नवयुग ' चा अंक पहा-यांत लिहिलें आहे- " फडक्याचा बाप कानपूरचा होता कीं आई लखनौची होती. " हें गलिच्छ लिखाण तुमचेंच ना ?

अत्रे—तात्यासाहेब केळकरांच्या हिंदीवर त्यांनीं टीका केली म्हणून पी तसं लिहिलं. यांत कांहीं वाईट अर्थ सूचित होतो असें मला वाटत नाहीं.

भेंडे—फडक्यांसारख्या विद्वान प्रोफेसरचा तुम्ही उल्लेख करतां, एवढेंच नव्हे, तर २९ नोव्हेंबर १९४२ च्या ' नवयुग ' मध्यें ' फडके एक बापाचा कीं दोन बापांचा ' असा उल्लेख केला आहे. हें पत्र लिहिणारा हा रमाकांत वेलदे हा कोण ?

अत्रे--ते आमचे पब्लिसिटी ऑफिसर आहेत.

भेंडे—पब्लिसीटी ऑफिसर? तुम्ही तर म्हणालात वनमालेचा मी पब्लिसीटी ऑफिसर आहे म्हणून ?

अत्रे--मी पब्लिसिटी डिपार्टमेंटचा हेड आहे. मुख्य आहे.

तळपदे--अहो, हें आतां लिहिलेलें आहे.

भेंडे—पण त्यांत म्हटलें आहे, " अप्पाराव मंगळसूत्र नसलेल्या कमळच्या गळ्यावर हात ठेऊन शपथ घेऊन सांगा "-आणि आरोपीनें आपल्याला " वनमाला हातांत घेऊन शपथ घ्या " असें म्हटलें. तर तें बदनामीचें वाटतें ?

तळपदे--खटल्याच्या अगोदर झालेल्या लिखाणाचें समर्थन नंतरच्या लिखाणावरून कसें करतां ? भेंड्यांनीं कोर्टाशीं प्रामाणिक असलें पाहिजे.

भेंडे—प्रामाणिकपणा हरकती घेऊन पुरावा दाबून टाकण्यांत नसतो.

कोर्ट – नंतरच्या लिखाणाची काय जरूर आहे ?

तळपदे – आरोपीनें तर फिर्यादीला याच्यापेक्षांही फाऊल खानसामा असे वाईट शब्द वापरले आहेत.

भेंडे—बरी आठवण केलीत, मी त्यावर येणार होतोंच. " तुम्ही सुप्रसिद्ध बवर्जी मा. का. " असें म्हटलें आहे कीं नाहीं ? हा मा. का. कोण ?

अत्रे—अहमदाबादेंत मा. का. देशपांडे प्रोफेसर होते. मी त्यांना बवर्जी म्हटलें आहे कारण कीं, त्यांनीं माझ्यावर कारण नसतां टीका केली. त्यांनीं माझ्यावर ग्रंथ लिहिला आहे.

भेंडे—त्यांत तुमची स्तुति केली आहे ना ?

अत्रे—नाहीं. त्यांत माझी गर्भित नालस्ती केली आहे ( damned by feiqned praise. )

भेंडे—मग त्यांना बबर्जी कां म्हटलें ?

अत्रे--मा. का. नें वाङ्मयाची नासधूस केली म्हणून.

भेंडे—मग तुम्हांला खानसामा म्हणजे बबर्जीपेक्षां श्रेष्ठ म्हटलें आहे ! आरोपीनें तुमची स्तुतीच केली.

अत्रे—खानसामा म्हणजे बटलर.

भेंडे—हो, म्हणजे प्रत्येक ' रेस्ट हाउस ' मध्यें खानसामा असतो कीं नाहीं ?

अत्रे--मला माहीत नाहीं. खानसामा म्हणजे बटलर.

भेंडे—कांहो, अत्रे, तुम्ही दारू पीत नाहींना ? तुम्हीं तर म्हटलें आहे – ' फडक्यांनीं जें जें केलें तें मी केलें ' ' त्यांनीं मौजा मारल्या त्या मीं मारल्या आहेत-- ' ह्या ' मौजा ' काय ?

अत्रे—त्याचा अर्थ करणें काय कठीण आहे ?

तळपदे—फडके दारू पितात असें तुम्ही कोठें सुचविलें आहे ?

भेंडे—काय हो, ' डॉक्टरकडे जाऊन काय ढोसत असतां ? असें तुम्हीच ' नवयुग ' मध्यें लिहिलें आहे.

तळपदे—असेल झोपेचें औषध !

अत्रे—य. गो. जोशीवर त्यांनीं टीका केली त्याला मीं उत्तर दिलें आहे.

भेंडे—डॉक्टरकडे काय ढोशीत असतात ?

तळपदे—उसाचा रस कां नाहीं ?

अत्रे—' गोरस ' काय हरकत आहे ?

कोर्ट—काव्यांतला रस असें मला वाटलें.

भेंडे—बरें, तुम्ही कल्याणहून नाशिकला गेलां होतां ना ?

अत्रे—मी ? केव्हां ?

भेंडे—' पायाची दासी ' उद्‌घाटित करण्याकरितां पुण्याहून रात्रीच्या गाडीनें.

अत्रे—तें होय ? मुंबईहून नाशिकला गेलों होतों दुपारी ४ च्या गाडीनें.

भेंडे--त्या वेळीं एक मनुष्य विनतिकिटानें प्रवास करीत आहे अशी नाशिकला तार गेली होती ना ?

अत्रे—मला माहीत नाहीं.

भेंडे—त्या वेळेला तुमच्या डब्याकडे येऊन स्टेशनमास्तरने तुम्हांला बाहेर येण्यास सांगितलें की नाहीं ? तुम्ही बाटल्या घेऊन खालीं उतरलांत ? तुमच्याजवळ तिकीट नव्हतें ?

अत्रे—साफ खोटें.

भेंडे—तुम्हांला शुद्धी तरी होती काय ? तुम्हांला सेकंड क्लास वेटिंग रूममध्यें बसवून घेतलें ? हा तमाशा पहाण्याकरितां नाशिकला गेलेले बरेच यात्रेकरू जमले ?

अत्रे—निखालस खोटें.

भेंडे—सर्कल टॉकीच्या मॅनेजर बर्व्यांना ओळखतां ना ?

अत्रे—बर्वे ? मी फक्त मालक ओक यांना ओळखतों.

भेंडे—त्यांनीं टेलिफोन केला ? मग सौ० अत्रे आल्या ? त्यांनीं तुम्हांला टांग्यांतून नेलें ?

अत्रे—साफ खोटें आहे. नाशिकला माझी मोटार असते; तींतून मी गेलों..

भेंडे—बरं ! शि. ल. करंदीकरांच्या पुस्तिकेंत ‘ छपरी पलंगा ’ चा उल्लेख होता. ‘ अत्रे आणि पिसाळलेले कुत्रें ’ हें केळकरांनीं लिहिलेलें पुस्तक माहीत आहे काय ?

अत्रे—लिहिलें असल्याचें मला माहीत आहे. माझ्यावर प्रतिकूल-अनुकूल टीका झाली आहे. पुरोगामी विचार करणारावर नेहमींच टीका होते.

भेंडे—मग ते मोठे लोक कोर्टांत कधीं गेले काय ?

अत्रे—मी स्वतःला त्यांच्याइतका थोर समजत नाहीं.

तळपदे यांनीं दुसऱ्यानें काय लिहिलें याबद्दल कां विचारण्यांत येतें असा आक्षेप घेतला.

भेंडे—माझ्या अशीलांना असें दाखवावयाचें आहे कीं, आमची शैली फिर्यादीपेक्षां अधिक गोंडस, अधिक डौलदार आहे-कायहो, तुम्हीं लिहिलें

आहे ना-- " स्वभिमानी मुली फडक्यांच्या पश्चिमतनुवर चपला मारण्यास तयार आहेत-" पश्चिमतनु म्हणजे काय ?

अत्रे—शरीराचा पश्चिम भाग-(ignoble part of the body)

भेंडे--मग हें चित्र डोळ्याच्या पुढें आणा, व " मध्यमलीन मुखाच्या दुर्गंधी बाटलीवर नागपूरकरांच्या हस्तप्रसादाची रंगीबेरंगी मोहोर झाली आहे." हें वर्णन पहा. तुमची वर्णनशैली किती घाणेरडी आहे व ही किती उदात्त आहे.

अत्रे—मी तें चांगलें उत्तर दिलें आहे

भेंडे-मग तुम्हांला " नैतिक मूल्यास पारखा झालेला " म्हटलें तर काय चुकलें ? पुढें पहा—आरोपीनें तुम्हांला ' शिंदळ शरीरावर ज्या क्षणीं हिंदुत्व-निष्ठ नागपूरकरांचे पवित्र पैजार पडले तो क्षण या हतभाग्याच्या आयुष्यांतील अत्यंत अभिमानाचा, महत्तम मानाचा, परमयशाचा, व दुर्मिळ आत्मोन्नतीचा होय, असें म्हटलें, तर तुम्ही फडक्यांचें लिखाण ' छिनाल बालाजी छापाचें ' म्हटलेंत.

अत्रे—त्यांनीं लिहिलें त्याला मीं उत्तर दिलें.

भेंडे—अहो लग्न झालेली वनमाला तुमच्या घरांत ठेवलेली आहे म्हणून शरीर शिंदळ म्हटलें. छिनाल म्हणजे काय ?

अत्रे—पुण्यांतील एका देवाचें ' छिनाल बालाजी ' हें नांव आहे.

कोर्ट—याची काय जरूरी आहे ?

भेंडे—कारण आरोपीनें आपल्या लेखाच्या सुरवातीलाच म्हटलें आहे कीं " संभावित माणसें आपणासारखा नंगेपणा करूं शकणार नाहींत या जाणीवेमुळें निर्धास्त असणाऱ्या समाजकंटकास उतार देण्यास आपद्धर्म म्हणून आम्हांस दिवसेंदिवस जास्त भडकत जाणाऱ्या अत्र्यांच्या विषारी लेखणीस तसलाच जलाल उतारा देणें सामाजिक आरोग्याच्या दृष्टीनें आवश्यक वाटतें." म्हणून अत्र्यांच्या लेखनशैलीपेक्षां आरोपीचें लिखाण अधिक शुद्ध व सत्य आहे हें दाखविण्याकरितां हे उतारे वाचून दाखविणें जरूर आहे.

कोर्ट—नमुन्यादाखल तुम्ही ' नवयुग ' चीं चार पांच लिखाणें दाखल केलीं आहेत. मग उगीच त्यांत आणखीं भर कशाला ?

श्री. भेंडे यांनीं हा वाद सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें सुरू झाला व फिर्यादीनें प्रथम सावरकरांवर टीका केली व ह्या वादाला सार्वजनिक वादाचें स्वरूप कसें आलें तें दाखविण्याकरितां 'नवयुग' चे ज्यांत पुढील लेख आहेत असे अंक दाखल केले. ते लेख असे–' सावरकर मूठभर ब्राम्हणांचे पुढारी' ' सावरकर, स्वातंत्र्यवीर कीं स्वातंत्र्यशत्रू' ' ज्यांनीं मारले ते मेले, मी जीवंत आहे.' ' हिंसात्मक तत्वप्रणाली,' ' कांचेच्या घरांतले ओगले,' ' अरेरे काळकर्तें माणुसकीला मुकले;' इ.

नंतर श्री. भेंडे यांनीं 'हिंसात्मक तत्वप्रणाली' यांतील कांही उतारे वाचून दाखविले " पेहेलवान पुढारी अण्णासाहेब भोपटकर म्हणतात, तरुणांनो गुंड व्हा;" प्रो. माटे म्हणतात–" मनुष्य सांगून जर ऐकत नाहीं, तर त्याला आणखी काय करायचें ? झालें हें ठीक. स. प. कॉलेजचे प्रि. करमरकर म्हणतात–"अत्र्यांना रस्त्यावर मारलें असतें तर मी कांहीं म्हणालों नसतों. मी ती गंमत पहायला आलों असतों." दाखल केलेल्या लेखांतील वरील आशयाचे उतारे वाचण्यांत आले.

यावेळीं श्री. भेंडे यांनीं पुढील प्रश्न विचारले:—

भेंडे—आरोपी देशपांडे व तुमची ओळख आहे काय ?

अत्रे—व्यक्तिशः ओळख नाहीं.

भेंडे--त्यांचें तुमचें वांकडे आहे काय ?

अत्रे--माझ्या बाजूनें तरी नाहीं. त्यापैकीं कोणी मजविषयीं मनांत वाईट बाळगतों हें मला माहीत नाहीं. आम्ही दोन निरनिराळ्या राजकीय पक्षांतले आहों-ते हिंदुमहासभावादी आहेत व मी कांग्रेसवाला आहे.

भेंडे--देशपांडे हिंदुसभेच्या वर्किंग कमिटीचे सभासद आहेत ?

अत्रे--होय.

भेंडे--ते भागानगर सत्याग्रहांत तुरुंगांत गेले ?

अत्रे--होय.

भेंडे—ते भागलपूरला सत्याग्रह करून तुरुंगांत गेले ?

अत्रे--होय.

भेंडे--सध्यां त्यांना भारत संरक्षण कायद्याखालीं अटक केली आहे ?

अत्रे--मी वांचलें आहे.

भेंडे-तुरुंगांत जाऊन ते देशसेवा करीत आहेत, आणि तुम्ही चार आण्याचे देशभक्त-(येथें मनाचे श्लोकांतील पुढील उतारा वाचून दाखविण्यांत आला--)

मना सज्जना चार आण्यांत फक्त । तुला व्हावयाचें असे देशभक्त ॥
तरी सांगतो शेवटीं युक्ति सोपी । खिशामाजि ठेवीं सदा गांधी टोपी ॥

भेंडे--कांहो, परवां तुह्मी गांधी टोपी घालून कोर्टांत आलां होतां. ' खिशामध्यें ठेवी गांधी टोपी ' आज खिशांत ती आहे काय ?

अत्रे—आज आणलीच नाहीं. पाहिजे तर खिसे तपासून पहा.

भेंड—ते तुरुंगांत जातात, व तुह्मी दिल्लीला सिनेमा उघडायला जातां.

अत्रे--तुरुंग हीच कांहीं देशभक्तीची कसोटी नाहीं.

भेंडे—मग तुरुंगांत गेलेल्या नवऱ्याच्या बायकोचे पालक होणें-ही देशसेवा ?

अत्रे--मी या प्रश्नाचें उत्तर देत नाहीं.

पुढें ' टाक माझा दीड पैसा ' असें ह्मणून भरल्या बाजारीं रिंगण घालून पोट जाळणाऱ्या एकाद्या अर्धनारीनटेश्वरानें सावरकरांचे नांवें बोटें मोडून त्यांच्यावर भेकडपणाचा आरोप करणें ' ह्यांतील उल्लेख दृष्टांत समजावयाचा कीं वर्णन ठरवावयाचें ह्यावर चर्चा होऊन ता. १० ची सुनावणी तहकूब झाली.

ता. १९-१२-४२.

---

## घरांत ठवलेली परनार !

भेंड—बरें, पुढें पहा. "पण सावरकरांवरील आपल्या दुसऱ्या लेखांकांत ह्या भ्रष्टबुद्धि काळ्या पहाडानें बेअकलीपणाचा जो सडा पाडला आहे, तो पाहून मन विस्मयानें थक्क होतें-" यांत तुह्मांला वाईट काय वाटतें ? बेअकलीपणाचा सडा यांत काय आहे ?

अत्रे—ती वाईट शिवी आहे.

भेंडे—ती शिवी नाहीं. ती योग्य टीका आहे हें सिद्ध करावयाचें आहे. 'काळा पहाड ' यांत हरकत घेण्यासारखें काय आहे ?

अत्रे—त्यांत अब्रूनुकसानीकारक कांहीं नाहीं, पण तें चांगलें वर्णन नाहीं.

कोर्ट—तें तुह्मांला व फिर्यादीला माहीत आहे; मग विशेष कां विचारतां ?

भेंडे—काळा पहाड म्हणजे यांचें शरीराचें वर्णन नाहीं 'काळा पहाड' ह्मणून एक बाटलेला मुसलमान होता; व तो पुढें हिंदूंवर उलटला. त्याप्रमाणें अत्रे हे सावरकर व हिंदुसभा यांवर उलटले ह्मणून त्यांना ' काळा पहाड ' म्हटलें आहे. असो. १९३८ पूर्वी तुह्मीं कॉंग्रेसवाले नव्हतां ? १९२९ मध्यें ?

अत्रे—अधिकृत रीत्या नव्हतों. पण माझें खाजगी मत तसें होतें.

कोर्ट—त्या विधानाची सत्यता सिद्ध करण्याचें कारण नाहीं. तें वर्णन चांगलें नाहीं, असें फिर्यादीनें ह्मटलें आहे.

तळपदे—त्यांचा विचार असा आहे कीं, हें पुनः सर्व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध व्हावें.

भेंडे—फिर्यादीनेंच हें आपल्यावर ओढवून घेतलें. त्यांनीं सावरकरांची माफी मागावी व केसमधून मोकळें व्हावें. पुढें श्री. भेंडे यांनीं विचारलें कीं, ' नवयुग ' काढल्यावेळेपासून तुम्हीं लोकांना शिव्या देऊं लागलां ना ?

अत्रे—मी शिवीगाळ केलेली नाहीं. मी टीका केली आहे. पण ' अर्धनारी नटेश्वर ' ह्या शब्दाला माझा आक्षेप आहे.

भेंडे—" टाक माझा दीड पैसा " ह्मणून भरल्या बाजारांत रिंगण घालून पोट जाळणाऱ्या एखाद्या अर्धनारी नटेश्वराप्रमाणें सावरकरांच्या नांवानें बोटें मोडून-" वगैरे ह्मटलें आहे. बाजारांत भीक मागणारे नोझे दुसऱ्यांना शिव्या देतात माहीत आहे ना ?

अत्रे—होय.

भेंडे—' नवयुग ' सुरू झाल्यावर तुम्ही गंधर्व, फडके, यांच्यावर टीका केलीत ना ?

अत्रे – मी सुरुवात कधींच केली नाहीं. टीकेला उत्तर देत असे.

भेंडे— अत्रे-फडके वादांत तुम्हीं इतकी शिवीगाळ केली कीं, वामन मल्हार जोशीं सारखीं माणसें मध्यस्थी पडून शिवीगाळ थांबविण्याकरितां साहित्यसंघाला कमिटी नेमावी लागली, आणि समेट झाल्यावरही ' फडक्यांचा बोऱ्या वाजला ' असें तुह्मी लिहिलेंत ?

अत्रे—फडक्यांनीं जोंवर टीका केली नाहीं तोंवर मी करार पाळला.

भेंडे—गंधर्वांचें वर्णन करतांना ह्या बायका कीं बुरुज ह्मणून ह्मटलेंत, गोहरबाबासंबंधीं बोलतांना ' गंधर्वांनें विजापुराहून काळया शिसवीचा तंबोरा आणून गायनाचा अभ्यास सुरू केला ' असें लिहिलें आहे ना ?

अत्रे—लिहिलें असेल. पण त्याचा असा अर्थ होत नाहीं.

भेंडे--त्यांतून काय अर्थ निघत आहे ?

अत्रे--विजापूर हें काळया शिशवी तंबोऱ्याकरितां प्रसिद्ध आहे.

भेंडे—गोहरबाबाला उद्देशून तें नाहीं ना ?

अत्रे--नाहीं.

भेंडे--प्रो. चिंतामणराव जोशींना चोंबडा ह्मटलेंत ?

अत्रे—होय.

भेंडे—मा. का. देशपांडे यांना शेंबडा ह्मटलेंत ?

अत्रे—होय.

भेंडे—मामा वरेरकरांविषयीं बोलतांना– ' मामा म्हणजे भानगड ' हा नवीन शब्दप्रयोग काढलात ?

अत्रे--म्हटलें असेल

भेंडे—' काळ 'कर्त्यांना ' अनाथ विद्यार्थी गृहांत मधुकरी मागितलेला संपादकाच्या खुर्चीवर बसला ' असें म्हटलेंत ?

अत्रे—होय.

भेंडे—रँ. परांजप्यासंबंधीं लिहितांना भिक्षुक घराण्यांतील पहिला रँगलर यापलीकडे त्याची किंमत नाहीं असें म्हटलेंत ?

अत्रे--मीं तें लिहिलें नाहीं, छापलें आहे.

भेंडे—याच्यापुढील परिच्छेदांत म्हटलें आहे कीं, "अत्र्यानें सावरकरांस भेकडपणाविषयीं हिणविणें म्हणजे कर्दमांतील गांडूळानें फणीधरासमोर वीर-श्रीयुक्त वळवळ करणें होय. यांत कर्दमांतील गांडूळ या शब्दाला तुमची हरकत आहे ना ? ' कर्दमांतील गांडूळ ' म्हणजे अश्लील भाषा वापरणारा असा अर्थ होऊं शकेल काय ?

अत्रे—होईल.

भेंडे—गांडूळ म्हणजे ज्यांत शक्ति नाहीं असा किडा ना ? तुमच्यावर १५ बेअब्रूच्या फिर्यादी झाल्या व त्या तुम्हीं लढविल्या नाहींत !

अत्रे—माझा त्या मजकुराविषयीं आक्षेप नाहीं. तो घाणेरडा शद्ब प्रयोग आहे.

भेंडे—सावरकर हे फणीधरासारखे आहेत. फणीधर म्हणजे शेष पृथ्वीला आधार देतो, त्याप्रमाणें सावरकरांचा सर्व हिंदु समाजाला आधार आहे ना ! ते सहा वेळां हिंदुसभेचे अध्यक्ष निवडून आले ना ?

अत्रे—होय.

भेंडे—त्यांनीं लिहिलेलें ' हिंदुत्व ' हें पुस्तक हिंदुसभेचें बायबल (मुख्य धर्मग्रंथ) समजलें जातें ?

अत्रे--असेल.

भेंडे–' जनान्यांतील कंचुकीनें अनेक समरप्रसंग गाजविणाऱ्या शूरास युद्धशास्त्राचे धडे देणें होय–' यांत तुमचा आक्षेप कशाला आहे ? सावरकरांनीं अनेक लढाया लढविल्या, खरें ना ?

अत्रे—होय.

भेंडे—आणि तुम्ही हो ऽ ?

अत्रे—मी एकही लढाई मारलेली नाहीं.

भेंडे—तुमच्या चित्रमंदिरांत बऱ्याच नटी आहेत ना ?

अत्रे—होय.

भेंडे—कपडेलत्ते, पेहराव, अभिनय, गाणीं यांवर तुम्हीं देखरेख करतां ना ?

अत्रे—तें काम दिग्दर्शकाचें असतें.

THE IDEAL BO... CHABILDAS ROAD BOMBAY

भेंडे—तुमच्या घरांत वनमाला आहे ना ? तुम्हीं तिचे पालक ?

अत्रे--ती माझ्याबरोबर नसते, घरांत निराळी राहाते.

भेंडे—तुमचें आणि तिचें घर एकच ना ?

अत्रे—ती निराळी रहाते, ती जेवणखाण निराळीं करते. तिचा स्वयंपाकी निराळा आहे.

भेंडे—स्वयंपाक्याचें नांव काय ?

तळपदे—याचा खटल्याशीं संबंध काय ?

भेंडे—कारण अत्र्यांनीं हें पूर्वीं सांगितलें नाहीं. त्यावेळीं ती माझ्याकडे रहातें असें अत्रे म्हणाले.

अत्रे—तुम्हीं त्या वेळीं विचारलें नाहीं.

भेंडे--पण आतां तुम्हीं न विचारतां आपण होऊन हें सांगितलेंत म्हणून हा बदल उलगडण्याकरितां आचाऱ्याचें नांव विचारलें-

कोर्ट—( अत्रे यांना ) तुम्हीं पूर्वीं एकत्र रहातों असें म्हटलेंत, त्याच वेळीं हें स्पष्ट कां नाहीं केलें ?

अत्रे—आम्ही एका घरांत रहातों. पण तिचें बिऱ्हाड (Establishment ) निराळें आहे.

भेंडे—“ पांचव्या प्रतीचीं सिनेमा कथानकें लिहिणाऱ्या दरिद्री खर्डेघांशानें कालिदासाच्या प्रतिभेस वांकुल्या दाखविणें होय ” याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे .

अत्रे—त्याबद्दल माझी कांहींच हरकत नाहीं.

भेंडे—आरोपीनें लिहिलें आहे, ‘ दुसऱ्याच्या बायका पळविण्यास जें धैर्य लागतें ’—सावंतांची बायको तुम्ही पळविली आहे ना ?

अत्रे—नाहीं. आरोपीनें वाटल्यास तसें लिहून समाधान मानावें.

भेंडे—दुसऱ्याच्या बायकोस पळविण्याला धैर्य लागतें कीं नाहीं ?

अत्रे—मला माहीत नाहीं.

भेंडे—मग दुसऱ्याची लग्नाची बायको जगाची परवा न करतां घरांत ठेवण्याला तरी धैर्य लागतें ?

अत्रे--तो भेकडपणा आहे.

भेंडे—तुम्ही दुसऱ्याची बायको म्हणजे वनमाला घरांत ठेवलीत ना ?

अत्रे—कारण तो Practical utility चा (व्यवहाराच्या सोईचा) प्रश्न आहे.

भेंडे—व्यवहाराची सोय म्हणजे काय ?

अत्रे—आम्ही भागीदार आहोंत.

ता. २७-१२-४२.

---

## सुशिला सावंत कीं सुशिला अत्रे ?

भेंडे—श्री० शि. ल. करंदीकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'अत्र्यांची बढाई' या पुस्तकांत 'आगरकर हायस्कुलांत जयकरांना एक उद्वेगजनक दृश्य दिसलें' असा उल्लेख केला आहे, याबद्दल बाबासाहेबांजवळ तुम्हीं खुलासा मागितला होता काय ?

अत्रे—नाहीं. मी करंदीकरांना वर्तमानपत्रांतून आव्हान दिलें.

भेंडे—"चोरट्या प्रणयाच्या अंधाऱ्या खोलीनें अंदमानांतील तुरुंगाच्या अंधाऱ्या खोलीस खिजवावें, यांत कांहीं अर्थ आहे ?" नगरकर ब्रम्हचारी होते ना ? तुम्हीं त्यांना त्यांच्या घरीं एक मुलगी आणतों म्हटलेंत, त्यांनीं नकार दिला, व मग नगरकर प्रकरण झालें—

अत्रे—आरोपीनें लिहिलेल्या वाक्याला माझा आक्षेप नाहीं.

भेंडे—बरें, आलोचनषंढ विलासांनीं रंगलेलीं शरीरें मार्जित करणाऱ्या टर्किश टबानें महासागराची पायमल्ली करण्यास सरसावावें—"

अत्रे—ही शिवीगाळ आहे.

भेंडे—तसें तें नाहीं. खरें आहे तें.

कोर्ट—फिर्यादीनें अब्रूनुकसानीचा आरोप केला आहे. त्यांनीं तें शिवीगाळ म्हटलें. मग कशाला हें विचारतां ?

भेंडे—आरोपीनें लिहिलें तें खरें व वस्तुस्थितीवर अधिष्ठित असें सत्य आहे, हें आम्हांला शाबीत करावयाचें आहे.

कोर्ट—मराठी वाचकांना वर्तमानपत्रांतील शिवीगाळीचा सराव पडला आहे. प्रत्येक शिवीगाळीची सत्यता सिद्ध करण्याचें कारण नाहीं.

भेंडे—सावरकरांविषयीं हा उल्लेख आहे. सावरकरांनीं महासागरांत उडी टाकली' आणि ह्यांनीं उडी मारली टर्किश टबांत—!

कोर्ट—त्याच्याशीं आपल्याला काय करावयाचें आहे ?

भेंडे—बरें ( अत्रे यांस ) पुढें पहा-" एकाद्या चित्रमंदिरांतील नकली पिस्तुलानें २८ ब्राऊनिंग पिस्तुलाची खिल्ली करण्यास धजावें तशांतला प्रकार प्रल्हाद केशव अत्रे यानें सावरकरांस भेकड म्हणून केला आहे—" यांत कशाला हरकत आहे ?

अत्रे—मला तें अब्रूनुकसानीकारक वाटत नाहीं.

भेंडे—म्हणजे २८ ब्राऊनिंग पिस्तुलें विलायतेंतून आणलीं गेलीं हें खरें !

अत्रे—मला माहीत नाहीं.

भेंडे—' निर्भीड ' मधील प्रसिद्धीच्या बालामृताची ऊब मिळतांच हा आंगठ चोखण्याऐवजीं धीटपणें स्त्रियांकडे पाहू लागला—' यांत ' आंगठे चोखणें ' म्हणजे काय ?

अत्रे—बालकासारखें निर्दोष मन ! धीटपणें स्त्रियांकडे पाहूं लागलें, याला माझा आक्षेप आहे

भेंडे—' निर्भीड ' मधील प्रसिद्धीचें बालामृत मिळण्यापूर्वीं तुम्ही विवाहित स्त्रीला घेऊन उघडपणें हिंडत नव्हतां.

अत्रे—खोटें आहे. उघड आणि गुप्त काय आहे ?

भेंडे—म्हणजे तुम्ही दुसऱ्याच्या विवाहित पत्नीला आपल्या घरांत राजरोस रीतीनें टेवलेंत ना ? तें प्रसिद्धी मिळाल्यानंतरच. पुढें पहा-" सावरकरांच्या शिखाची दाढी विंचरून देणें व कधींमधीं त्या शीघ्र संरक्षकास बदली म्हणून राहाणें, इ. मानाचीं कामें त्या काळीं अन्यांच्या वांट्यास येत असत.—" यांत काय आक्षेपार्ह आहे.

अत्रे—मला तें अब्रूनुकसानीकारक वाटत नाहीं. ती ' शिवराळ शिवी ' ( vile abuse ) वाटत

भेंडे—बरें तर, ' अकिंचनता, अप्रसिद्धी, शरीरपीडा इ. आधीव्याधींनीं गांजलेल्या या कवड्या सापावर त्या काळांत हिंदुसभेनें व सावरकरांनीं आपुलकीची, प्रेमाची व प्रसिद्धीची पाखर घातली–हिंदुत्वनिष्ठांच्या उबेनें हा गारठलेला मरणोन्मुख सर्प चलनवलन करूं लागला–" यांत वाईट काय आहे ?

अत्रे—कवड्या साप म्हटलें याला माझा आक्षेप आहे.

भेंडे--सापाचा गुणधर्म काय ?

अत्रे—तो विषारी असतो. यापलीकडे मला कांहीं माहिती नाहीं.

भेंडे—तुम्ही बी. ए., बी. टी. टी. डी. आहांत ? ज्यानें दूध घातलें त्यालाच साप चावतो हें माहीत आहे ना ? सावरकर पुण्याला आले तेव्हां तुम्हांला हिंदुसभा प्रतिगामी वाटत नव्हती ना ? आतां तुम्ही हिंदुसभेवर उलटलांत, म्हणून साप म्हटलें तर बिघडलें कोठें ?

अत्रे—मी कोणत्याच पक्षाचा विश्वासघात केलेला नाहीं ! सिद्ध" करा पाहिजे तर.

भेंडे—त्या वेळीं सावरकर कांग्रेस विरुद्ध होते. ' माझी जन्मठेप' मध्यें त्यांनीं लिहिलें आहे. तुम्हीं वाचलें आहे का तें ?

अत्रे—असेल कदाचित् ! सावरकरांचें साहित्य व सामाजिक कार्य याबद्दल मला आदर आहे.

भेंडे—१९२६ मध्यें त्यांनीं हिंदुत्व ग्रंथ लिहिला, त्यांत हिंदुस्थानमध्यें हिंदूंचेंच राष्ट्र होईल असा सिद्धांत मांडला आहे ना ?

अत्रे—मी तें वाचलेलें नाहीं.

भेंडे—जन्मठेप वाचलें आहे ना ? त्यांत त्यांनीं तुरुंगांत १९२० चळवळींतले सत्याग्रही भेटले असा उल्लेख करून त्या चळवळीबद्दल नापसंती व्यक्त केलेली आहेना ? त्यांत त्यांनीं प्रतियोगी सहकारितेचें तत्त्व सांगितलें आहे ना ?

अत्रे—मला त्यांच्या थोर स्वार्थत्यागाविषयीं गाढ आदर आहे. ते थोर क्रांतिकारक होते—म्हणूनच मी त्यांचा चाहाता होतों-आतां त्यांच्यांत बदल झाला आहे.

भेंडे--ते जन्मभर क्रांतिकारक आहेत. आतां त्यांनीं पिस्तुल घेऊन जावें असें तुमचें ह्मणणें आहे काय ?

अत्रे—तें ज्याचें त्यानें ठरवावें.

भेंडे--वनमालेचा बँकेंत स्वतंत्र अकौंट आहे काय ?

अत्रे--मला माहीत नाहीं.

भेंडे--ती आपले पैसे तुमच्याजवळ ठेवते काय ?

अत्रे—नाहीं.

भेंडे—ती आपणां स्वतः जवळ ठेवते काय ?

अत्रे—असेल.

भेंडे—तिला ५००० रुपये पगार मिळतो ना ?

अत्रे—आतां मिळत नाहीं.

भेंडे—ती तुमच्या नांवानें सही करते ना ?

अत्रे—माझ्या माहितीप्रमाणें नाहीं.

भेंडे—' वनमाला अत्रे ' म्हणून सही करते ना ?

अत्रे—ती सुशीला बापुराव पवार अशी सही करते.

भेंडे—ग्वाल्हेर संस्थानांत तुमचे चित्रपट लागतात ना ?

अत्रे—होय. चित्रा टॉकीजमध्यें पायाची दासी, राजाराणी, घरजांवई हे बोलपट लागले होते.

भेंडे—वनमालेचे वडील मुंबईत तुमच्याकडे कधीं आले होते काय ?

अत्रे—नाहीं. मुंबईत ते कधींतरी आले होतें, तेव्हां त्यांची सरदार गृहांत भेट घेतल्याचें वनमालेनें मला सांगितलें.

भेंडे—तें बोलणें कसें झालें ?

अत्रे—सहजगत्या बोलत असतां तिनें मला सांगितलें.

भेंडे—पूर्वी तुम्हीं वनमाला अलीकडे ग्वाल्हेरला गेली होती असें सांगितलेंत ना ?

अत्रे—नाहीं. ती ग्वाल्हेरला गेली नव्हती. मामाबरोबर बासोवडा ह्या ग्वाल्हेर संस्थानांतील गांवाला गेली होती.

भेंडे—बासोवडा कोठें आहे ?

अत्रे—जी. आय. पी. मेन लाईनवर मुंबईपासून ५७५ मैल.

भेंडे—ग्वाल्हेरनजीक आहे ?

अत्रे—ग्वाल्हेरपासून २०० मैल आहे.

भेंडे—तो मामाच होता हें तुम्हांला कसें कळलें ?

अत्रे—मला तें माहीत आहे. माझा त्यांचा परिचय झाला होता.

भेंडे—कीं तिनें सांगितलें ?

अत्रे--नाहीं. मला तें माहीत होतें.

भेंडे--वडिलांचे बरोबर आईही आली होती का ?

अत्रे--नाहीं. ती १९३५ मध्येंच वारली.

भेंडे—बरें, ती मुलीला घेऊन जांवयाकडे बरोजलेनमध्यें ३ महिने राहिली होती ना ?

अत्रे--मला माहीत नाहीं.

भेंडे--मुंबईत ती नवऱ्याबरोबर राहिल्याचें तुम्हाला माहीत आहे?

अत्रे—नवऱ्याबरोबर राहिल्याचें मी विचारलें नाहीं. तो तिचा प्रश्न आहे, मी कशाला त्या चौकशा करूं ?

भेंडे--तीं एकत्र राहतात असें पाहून आई ग्वाल्हेरला गेली ना ?

अत्रे--मला माहीत नाहीं.

भेंडे--१५ दिवसांनीं वनमाला ग्वाल्हेरला गेली. तेव्हां तिचे आईबाप रागावले व ती मिसेस दामले नांवाच्या आपल्या मावशीकडे गेली हें खरें ना ?

अत्रे—ती मिसेस दामलेकडे आली होती.

भेंडे—'नवयुग'करितां दिलेल्या मुलाखतींत तिनें अत्र्यांनींच मला चित्रपटधंद्यांत पुढें आणलें असें म्हटलें आहे ना ?

अत्रे—होय.

भेंडे—शाळा सोडल्यावर आणि फिल्म कंपनींत जाण्याचे दरम्यान ती कधीं हॉस्पिटलमध्यें होती कांहीं दिवस ?

अत्रे—नाहीं.

२८-१२-४२

उलट तपासणी
पां. वा. गाडगीळ,
(संपादक "लोकमान्य")

# " रात्रीं केलेले कमीजास्ती ! "

( श्री. अत्रे ह्यांचे उलटतपासणीचा बहुतेक भाग आम्हीं दिलेला आहे. स्थलाभावास्तव अलिकडे विशेषच व वारंवार " ख्यातनाम " झालेले अत्र्यांचे साक्षीदार श्री. पां. वा. गाडगीळ ह्यांच्या उलटतपासणीपैकीं मात्र केवळ कांहीं मासलाच येथें देणें शक्य आहे. )

भेंडे—' होलिकाचार्य ' म्हणणें बदनामीकारक आहे का ?

गाडगीळ—होय. होलिकाचार्य म्हणजे अश्लीलतेचे आचार्य (Master of obscenity ).

( नवयुगमधील कांहीं उखाणे वाचून दाखवून )

हे उखाणे तुम्हीं ' लोकमान्यां ' त छापाल का ?

गाडगीळ—नाहीं. तें अश्लील आहे.

भेंडे—असे उखाणे प्रसिद्ध करणाऱ्याला आरोपी ' होलिकाचार्य ' म्हणतात तें बरोबर नाहीं काय ? केवळ प्रश्नाला उत्तर द्या. व्याख्यान नको.

गाडगीळ—तसें म्हणणें बरोबर नाहीं.

कोर्ट—मग तुम्हीं लेखकाला काय म्हणाल ?

गाडगीळ—असें विशेषण लावणार नाहीं.

कोर्ट—असें लिहिणें योग्य नाहीं असें म्हणाल कीं नाहीं ?

गाडगीळ—होय.

भेंडे—तुम्हीं अत्र्यांना केव्हांपासून ओळखतां ?

गाडगीळ—गेलीं पांच सहा वर्षें दहा महिने मी त्यांच्याकडे नोकरीला होतों.

भेंडे—हा ' नवयुग ' चा अंक पहा. यांत " फडके स्वतःला साहित्यसूर्य म्हणवितात नी कमल दीक्षित त्यांना म्हणते, अप्पा चूप. असें बोलू नका.

सूर्यानें कुंतीचें कौमार्य भ्रष्ट केलें. ” असें लिहिलें आहे. यांत काय सुचवायचें आहे ?

गाडगीळ—यांत कांहीं सुचवायचें नाहीं. सूर्याचें वर्णन वाईट रीतीनें केलें आहे.

भेंडे--यांत कांहीं सुचविलें जात नाहीं का ?

गाडगीळ – नाहीं. तें कांहीं तरी वाईट, मूर्खपणा आहे. ( Something bad nonsense ).

भेंडे—अहो, Something bad म्हणजे काय ? बरं, आतां हें पहा “ कमल म्हणते, अप्पा तुम्हीं ‘ पायाच्या दासी ’ वर का लिहिणार ? म्हणजे माझेंच चरित्र लिहिणार. ” यावरून तुम्हांला काय अर्थबोध होतो ?

गाडगीळ—मला कांहींच अर्थबोध होत नाहीं. ( It conveys to me nothing ) यांत मूर्खपणा आहे पण वाईट कांहीं नाहीं.

भेंडे—तुम्हीं ‘ पायाची दासी ’ बोलपट पहिला आहे ?

गाडगीळ—होय.

भेंडे—त्यांत धारूअण्णा हा खलनायक आहे ?

गाडगीळ – होय.

भेंडे—तो यमूला कुमार्गाला लावतो ?

गाडगीळ—होय.

भेंडे—या ठिकाणीं कमल दीक्षित ही यमू असल्याचें दाखविलें आहे ?

गाडगीळ—मला नाहीं तसें वाटत.

THE IDEAL BOOK
CHABILDAS ROAD

भेंडे—म्हणजे तुम्हांला असें म्हणावयाचें आहे काय कीं, अत्रे कांहीं तरी मूर्खपणाचें लिखाण प्रसिद्ध करतात ?

गाडगीळ—मी त्यावरून असें सर्वसाधारण अनुमान काढणार नाहीं. (I can’t generalise ).

भेंडे—‘ नवयुग ’ मधील हीं चित्रें पहा. अनुमान काढायला हीं पुरेशीं नाहींत का ? यावरून कुंति आणि सूर्य यांच्यासारखा अनैतिक संबंध सुचविला जात नाहीं काय ?

गाडगीळ नाहीं.

भेंडे—' जुझू ' म्हणजे काय ?

गाडगीळ--जुझू म्हणजे काय तें मला माहीत नाहीं. जुझू या नांवाचें एक साप्ताहिक होतें.

भेंडे--फडके आणि कमल दीक्षित दरवाजे बंद करून काय करतात ?

गाडगीळ—दरवाजे बंद करून शेकडों गोष्टी करतां येतील.

भेंडे—पण तुम्हीं काय कल्पना करतां ?

गाडगीळ—मी कोणतीच कल्पना करूं शकत नाहीं

भेंडे—म्हणजे तुम्हांला कॉमनसेन्स नाहीं ? बरं, आतां हें पहा—फडक्यांचं पोट दुखतं त्यावर ' पु. रा. ' कमलला एकीकडे विचारतो, ' काल रात्रीं कमी जास्ती तर केलं नाहीं आप्पानं—' 'काल रात्रीं कांहीं कमी जास्ती केलं नाहीं ना ? ' याचा अर्थ काय ?

गाडगीळ—कमी जास्ती खाल्लं नाहीं ना ?

भेंडे—अहो, केलं म्हणजे खाल्लं ? तुम्हीं कांहीं केलंत म्हणजे खाल्लंत असा अर्थ करावयाचा, तर कमळ लाजते कां ?

गाडगीळ—यांत कांहींतरी वाईट आहे.

भेंडे--बरं, ' अप्पांचं हल्लीं वय झालं आहे, अन् त्यांत तुम्हीं भेटलांत' म्हणजे काय ?

गाडगीळ—' नवयुग ' मध्यें कमल दीक्षितानें फडक्यांवर लेख लिहिला आहे. त्यांत फडके गुरू व कमल शिष्या असें लिहिलें आहे. त्यासंबंधीं कांहीं तरी असेल.

कोर्ट—त्यांत कांहीं अनैतिक आहे ?

गाडगीळ—नाहीं.

भेंडे—आतां, हें पहा--" पु. रा. ( डोळे मिचकावून )-हें पहा, मला इथं कांहीं सांगतां येत नाहीं ! तुम्हीं माझ्या बरोबर चला कुठं तरी हिंडायला ! मग मी माझं ' प्रपोजल ' मांडतों.

( फडके एकदम बिछान्यावर ताठ उठून बसतात ! )

फडके–अरे, भिड्या लेकाच्या, कमळला कसलीरे प्रपोजल करतोस?

पु. रा.-मला वाटलं तुम्ही बहिरे आहांत–तुम्हांला ऐकूं येत नाहीं. या सगळयाचा अर्थ काय ?

गाडगीळ—तुम्ही जी जी इनसिन्युएशन करीत आहां तितकं त्यांत कांहीं नाहीं.

भेंडे—पण हें तुम्हांला शोभते काय ? ' असें वरच्या उताऱ्यांत म्हटलें आहे, त्याचा अर्थ काय ? कमलच्या नांवावर पुस्तकें लिहिणें ?

गाडगीळ—होय.

भेंडे—पण त्याला युक्तिवाद काय दिला आहे ?

गाडगीळ--It really does not suggest me anything.

भेंडे--तुमच्यासारख्या साहित्यिकाला समजत नाहीं, मग सामान्य वाचकाला काय समजणार ?

गाडगीळ--मी चूक असेन

भेंडे—मग आलेत कशाला साक्षीला ? बरें, हें पहा, " फडके मला ऐकू येत नाहीं हें खरं आहे-पण नाण्याचा आणि कंकणाचा आवाज मला दोन मैलांवरूनही ऐकू येऊं शकतो. " याचा अर्थ काय ?

गाडगीळ--नायकापेक्षां ते नायिका चांगल्या रंगवितात.

कोर्ट—हा त्याचा अर्थ ?

भेंडे-" पु. रा., तुम्हीं जरा बाहेर जा. मी आप्पांशीं जरा जुझू करेंत. " म्हणजे काय ?

गाडगीळ--जुझूचा अर्थ समजल्यावांचून सांगतां येणार नाही.

भेंडे—अहो, पण पोट दुखायला लागल्यावर डॉक्टर वगैरे आणायचा तों हें जू झू काय ? पु. रा. ना बाहेर जायला कशाला सांगायचें ? त्यांना बाहेर जायला सांगून जुझू करावयाचे म्हणजे काय ?

गाडगीळ—मला माहीत नाहीं.

भेंडे—अन्यांना तुम्हीं जुझूचा अर्थ विचारला नाहीं ?

गाडगीळ—ते मला भेटलें नाहींत.

भेंडे—यापूर्वी तुम्हीं तो लेख वाचला नाहीं ?

गाडगीळ—नाहीं आतांच पहिल्यांदां वाचीत आहे.

भेंडे—‘ लोकमान्यां ’ त तो छापला असता ?

गाडगीळ—नाहीं.

कोर्ट—कां छापणार नाहीं ?

गाडगीळ—मला तो आवडला नाहीं म्हणून.

कोर्ट—म्हणजे काय ?

गाडगीळ--त्यांत कांहीं तरी वाईट आहे. Something bad !

कोर्ट—म्हणजे काय ?

गाडगीळ--Something allowing readers driving at something. Reader is persuaded to draw insinuations.

कोर्ट-म्हणजेच insinuation. म्हणजे हा लेख वर्तमानपत्रांत छापण्याच्या लायकीचा नाहीं ?

गाडगीळ--नाहीं.

२९-१२-४२.

---

# “ वनमाला कॅम्प ” वरील अधिकार !

भेंडे--मीनाक्षीच्या नावाचा संबंध विनायकच्या नांवाशीं जोडला आहे. जयश्री विनायकांना विचारते, “ रतनबाई कोठें आहे ? ”

गाडगीळ--It suggests me nothing

भेंडे—आतां विनायक त्यावर उत्तर काय देतात पहा-'हा प्रश्न विचारून तुम्हीं माझ्या जिव्हारी घाव घालीत आहां. जेथें विनायक तेथें मीनाक्षी, जेथें मीनाक्षी तेथें विनायक,' याचा अर्थ काय ?

गाडगीळ—विनायक दिग्दर्शक आहेत नी मीनाक्षी नटी आहे म्हणून असें म्हटलें.

भेंडे—मग वनमाला नी अत्रे यांच्या बाबतींत तसें म्हटलें तर चालेल ?

गाडगीळ—हो, चालेल.

भेंडे—'सख्या हरि' तुम्हीं वाचलें आहे काय ?

गाडगीळ—वाचलें आहे. त्यांतील कांहीं लेख चांगले आहेत, कांहीं वाईट आहेत.

भेंडे—असे लेख छापावेत कीं नाहीं ?

गाडगीळ—हो छापावेत.

भेंडे—या लेखकाची मनोवृत्ती विकृत आहे, असें फडक्यांनीं म्हटलें आहे ?

गाडगीळ—अमकयानेंच म्हटलें असें सांगतां येणार नाहीं. पण कोणी तरी म्हटलें आहे खरें.

भेंडे—यासंबधींचें '**विविध वृत्तांत**' प्रसिद्ध झालेलें पत्र तुम्हीं वाचलें आहे ?

गाडगीळ—नाहीं.

भेंडे—अहो, तुम्हीं 'नवयुग' वाचीत नाहीं. 'विविधवृत्त' वाचीत नाहीं. तेव्हां होलिकाचार्य या शब्दाचा अर्थ सांगण्यास तुम्ही पात्र नाहीं.

हें पहा-"महाराष्ट्राचे मशहूर खुषमस्करे मास्टर प्रल्हाद यांनीं कांहीं दिवसांपूर्वी आपली विदुषकी कानटोपी उडवत स्वातंत्र्यवीर सावरकरांवर भेकडपणाचा आरोप केला." हा 'आदेश' मधील उतारा आहे. यांत कांहीं बदनामीकारक आहे ?

गाडगीळ—नाहीं !

भेंडे—आतां हा दुसरा पहा -"अमुक माणूस भेकड आहे"—'तमवयाला मी भर बुधवारांत जोडे मारीन' अशा वीरश्रीयुक्त किंकाळ्या

छाती पिटून मारणाऱ्या या नरपुंगवाचा ‘ वनमाला क्रॉस ’ वर कितपत अधिकार आहे हें पहाण्याचा प्रसंग परशुराम कॉलेजांत नुकताच येऊन गेला.” यांत कांहीं बदनामीकारक आहे ?

गाडगीळ—‘ वनमाला क्रॉस ’ शब्द झोंबतो.

भेंडे—त्याचा अर्थ काय ?

गाडगीळ—माहीत नाहीं. पण कांहीं तरी वाईट आहे त्यांत.

भेंडे—काय वाईट आहे त्यांत ?

गाडगीळ—Something tickling. ‘ वनमाला क्रॉस ’ यांत जी असोसिएशन् आहे ती वाईट आहे.

भेंडे—या उताऱ्याचा अर्थ असा आहे कीं, सर परशुराम भाऊ कॉलेजमध्यें अत्र्यांवर जो प्रसंग आला, त्यानें वनमाला क्रॉसवर म्हणजे युवकवर्गावर अधिकार कोणाचा ? अत्र्यांचा कीं सावरकरांचा ? तें सिद्ध झालें. वनमाला याचा अर्थ पुष्पहार असा होतो कीं नाहीं ? कीं वुडलँड ( वनश्री ) ?

गाडगीळ—वुडलँड ( वनश्री )

भेंडे—वनमाला क्रॉस म्हणजे गौरवाचें चिन्ह असें आम्ही समजतों.

गाडगीळ—( कांहींच बोलत नाहींत )

भेंडे—“ ज्यांनीं मारले ते मेले, मी जिवंत राहिलों ” हा ‘ नवयुग ’ मधील लेख तुम्ही वाचला आहे ?

गाडगीळ—हें शीर्षक आठवतें.

भेंडे—‘ आदेश ’ मधील हा उतारा पहा.

“ त्या प्रसंगांतील मारणारे मेल्यावर व मार खाणारा अमरपद पावल्यावर, पळपुटा वीर ठरल्यावर व पाठ पुरवणारे नामर्द ठरल्यावर, मुडदा जिवंत ठरल्यावर व जिवंत मुडदा ठरल्यावर, एक अद्‌भुत घडलें–एक नवल वर्तलें–एक आश्चर्य जाहलें !—पराक्रमांत पौरसावर कडी करणारे, शरीरबलांत बुरुड पहिलवानावर मात करणारे, आत्मबलांत गांधींना लज्जा आणणारे, अहिंसाबलांत खिस्तास मुंडी खालीं घालावयास लावणारे, मद्यबलांत कोणत्याही दहा अव्वल मद्यप्यांच्या बेरजेस चीत मारणारे, पुरुषबलांत छेलबटावूच्या गुरुस्थानीं असणारे, जिव्हाबलांत पैगंबरपुत्राचे पीर शोभणारे,

ढोलिकाचार्य प्र. के. अत्रे, बी. ए., बी. टी., टी. डी. ( लंडन ) हे एकाएकीं धर्म आठवूं लागले, नीतिमत्ता बोलूं लागले, वृत्तव्यवसायिकांतील बंधुभाव स्मरूं लागले, आणि ज्ञानाचें पावित्र्य, कॉलेजांतील शिस्त, गुंडगिरींतील भीरुता, यांच्या नांवानें मणि ओढूं लागले. ”

पराक्रमात पौरसावर कडी करणारे अत्रे आहेत का ?

गाडगीळ—असतील.

भेंडे—कुस्तींत बुरुडावर मात करणारे आहेत का ?

गाडगीळ—मी त्यांची कुस्ती पाहिली नाहीं.

भेंडे—आत्मबलात गांधींना लज्जा आणणारे आहेत काय ?

गाडगीळ—माहीत नाहीं.

भेंडे—अहिंसाबलांत खिस्तास मुंडी खालीं घालावयास लावणारे आहेत का?

गाडगीळ—तें सगळं मूर्खपणानं लिहिलं आहे.

भेंडे—बरं, मद्यबलांत कोणत्याही दहा अव्वल मद्याऱ्यांच्या बेरजेस चीत मारणारे-यांत कांहीं बदनामीकारक आहे का ?

गाडगीळ – तो सगळाच उतारा मूर्खपणानं लिहिला आहे

भेंडे—‘ सैतान वेदघोष करूं लागला ’ यांत काय वाईट आहे.

गाडगीळ—Nothing particular ( विशेष असं कांहीं नाहीं. )

भेंडे—‘ फोरासरोडवरील बया वटपूजनास निघाली ’ म्हणजे काय ?

गाडगीळ—वाईट बाई पावित्र्याच्या गोष्टी बोलूं लागली.

भेंडे—“ ‘ लग्नबंधनाची बेडी तोडून एका कुमाऱ्या भोपळ्याबरोबर तरंगत रहाणारी स्त्री गृहसंस्थेवर पटकथा लिहूं लागली ! सदैव गटारांत बुचकळलेली लेखणी गंगामाहात्म्य आठवून अमृतापाशीं पैजा जिंकण्याचा आव आणूं लागली ! फडक्यांच्या आईबापांचा नीचपणे उल्लेख करणारे व सावरकरांस भेकड म्हणणारे अत्रे ‘ चांगल्या वर्तनाविषयी दहा नियम ’—सांगूं लागले ! ! ” हें सगळें तसेंच आहेना ?

गाडगीळ—होय.

भेंडे—“ निर्लज्ज माणसा ! शिस्त, सभ्यता, ज्ञानाचें पावित्र्य हे शब्द तुझ्या तोंडात शोभत नाहींत ! ” यांत कांहीं बदनामीकारक आहे का ?

गाडगीळ—ही बदनामी होईल कीं नाही तें सांगतां येत नाहीं. पण तें Bad-taste हीन अभिरुचीचें निदर्शक आहे.

भेंडे—" नाशिक येथें पाहुणा म्हणून विनातिकिट दुसऱ्या वर्गानें प्रवास करणाऱ्या, व बेहोष स्थितींत दारूच्या बाटल्या हातांत घेऊन लळतलोंबत फलाटावर उतरणाऱ्या बेशरम जनावरास तूं काय म्हणशील ? "

गाडगीळ—हें बदनामीकारक आहे

भेंडे—( ' नवयुगा ' तील एक उतारा वाचून दाखवून ) यावरून सर परशुराम भाऊ कॉलेजास लोकांनीं मदत करूं नये असें सुचविलें जातें कीं नाहीं ?

गाडगीळ—होय या संस्थेला लोकांनी मदत करूं नये असा अर्थ त्यांतून निघतो

३–२–४३

---

# टि. म. चा वा. वि. !

भेंडे—'वनमाला क्रॉस' हा शब्द तुम्हांला झोंबतो असें तुम्हीं म्हणालांत.

अत्रे-वनमाला हा शब्दप्रयोग तुम्हांला कां झोंबतो ?

गाडगीळ—' आदेश ' मध्यें असलेल्या लेखाचा संदर्भ पाहून मी तसें ( ' वनमाला क्रॉस ' शब्द झोंबतो असें ) म्हणतो.

भेंडे—वनमालेबरोबर अत्रे राहातात हें ' आदेश ' कारांना माहीत असल्यानें त्यांनीं तसें लिहिलें,

अत्रे—वनमाला हीं नवराबायकोप्रमाणें राहातात ?

गाडगीळ—माहीत नाहीं.

भेंडे—तीं दोघे हॉटेलांत बरोबर जातात हें माहीत आहे ?

गाडगीळ—नाहीं.

भेंडे—आज अत्रे आणि वनमाला बंगलोरला गेलीं आहेत हें माहीत आहे ?

गाडगीळ—नाहीं.

भेंडे—वनमालेला तिच्या बापानें घरांतून हांकलून दिलें हें माहीत आहे ?

गाडगीळ—नाहीं.

भेंडे—तिचा नवरा मुंबईत आहे हें माहीत आहे ?

गाडगीळ—नाहीं.

कोर्ट—वनमालेचें लग्न झालें आहे कीं नाहीं तें माहीत आहे ?

गाडगीळ—नाहीं.

भेंडे—तुम्हीं कॉंग्रेसपक्षाचे आहां ना ?

गाडगीळ—होय.

भेंडे—मग म्यु. कॉंग्रेसपक्षाचे प्रतोद ॲड. पी. के. सावंत हे तुम्हांला माहीत नाहींत ?

गाडगीळ—नाहीं.

तळपदे—या प्रश्नांचा येथें संबंध काय ?

भेंडे—दुसऱ्याच्या बायका पळवून नेणारा-असें जें ' आदेश ' मध्यें म्हटलें आहे तें आम्हांला सिद्ध करावयाचें आहे. ( गाडगीळ यांना ) आपण कॉंग्रेसपक्षाचे आहांत, संपादक आहांत, तरी आपण श्री. सावंत यांस ओळखीत नाहीं असें सुचवायचें आहे काय ?

गाडगीळ—मी त्यांना ओळखत नाहीं.

भेंडे—हेच श्री. सावंत वनमालेचे पति ?

गाडगीळ—मला माहीत नाहीं.

भेंडे—तुम्ही ' नवयुग ' चे सहसंपादक होतां त्यावेळीं अत्रे यांनीं अनेकांवर हल्ले केले ?

गाडगीळ—होय.

भेंडे—प्रा. चिं. वि. जोशांना त्यांनीं चोंबडा चितोपंत असें म्हटलें होतें ?

गाडगीळ—त्यांच्या लेखांतील प्रत्येक शब्द मला आठवत नाहीं. पण तो लेख वाईट होता.

कोर्ट—शिवीगाळ करणारा होता ?

गाडगीळ—शिवीगाळ करणारा नव्हता. पण हीन अभिरुचीचा ( of bad taste ) होता.

भेंडे--अत्र्यांनीं फडक्यासंबंधीं लिहिलें तें कसें होतें ?

गाडगीळ—तेंही हीन अभिरुचीचें होतें.

भेंडे—खांडेकरांविरुद्ध अत्र्यांनीं लिहिलें तें बदनामीकारक नव्हतें काय ?

गाडगीळ—नाहीं. खांडेकरांवर श्री. अत्रे यांनीं लिहिलेले पांचसहा लेख. म्हणजे एक प्रबंध आहे.

भेंडे—तुम्ही टि. म. चे 'वा. वि.' आहांत ना ?

कोर्ट—टि. म. चे वा. वि. म्हणजे ?

भेंडे—टिळक महाविद्यालयाचा वाङ्मयविशारद. अत्र्यांनीच आपल्य वंदेभारतम् नाटकांत म्हटले आहे.

कोर्ट—काय आहे तें ?

भेंडे—( वंदेभारतम् नाटकाचे पुस्तकांतून वाचून ) "देशभक्त असून तुम्हांला टि. म. चा वा. वि. माहीत नाहीं ! टि. म. चा वा. वि. म्हणजे टिळक महाविद्यालयाचा वाङ्मयविशारद. मी वडिलांना साफ सांगितलें कीं, टि. म. चा वा. वि. होण्याऐवजीं एस. एम्. आर चा टी. सी. होईन ! सदर्न मराठा रेल्वेचा टिकिट कलेक्टर होईन." ( गाडगीळ यांना ) हें तुम्हाला उद्देशून लिहिले आहे काय ?

गाडगीळ—असेल.

भेंडे—बरं, सत्याचे प्रयोग व सट्ट्याचे प्रयोग हा लेख पहा. त्यांत म्हटलें आहे कीं—प्रल्हाद वल्लद केशव या नांवानें अखिल महाराष्ट्रांत बदनाम असणाऱ्या जिवाणूची पहेचान निदान नागपूरकरांस तरी करून देण्याची आवश्यता नाहीं.

जिवाणू म्हणणे बदनामीकारक आहे ?

गाडगीळ—कांहीं अशीं आहे. ( to some extent )

भेंडे—जिवाणू म्हणजे लहान प्राणी या अर्थानें म्हटलें आहे.

गाडगीळ—त्याचा उपयोग तिरस्कारानें केला आहे तें ( transferred epithet ) आहे.

भेंडे—अत्रे मोठे आहेत. त्यांना जिवाणू म्हटलें ही बदनामी होते काय ?

गाडगीळ—कांहीं अंशीं to some extent.

भेंडे—अत्रे कोणत्या नात्यानें मोठे आहेत ?

गाडगीळ—ते मोठे लेखक आहेत. त्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रांत ते मोठे असल्याचें माहीत नाहीं.

भेंडे—त्यांनीं राजकारण केलें आहेना ?

गाडगीळ—नाहीं. ते कॉंग्रेस पक्षांत होते, तेव्हां त्यांनीं कांहीं केलें असेल.

भेंडे—बरें, 'लाथाळ खेचरावर नागपूरकरांनीं स्वारी भरली' यांत वाईट काय आहे ?

गाडगीळ—तेंही transferred epithet आहे.

भेंडे—खेचर जशी लाथ मारतो त्याप्रमाणें अत्रे प्रत्येकावर टीका करतो व सतावतो असा अर्थ होईल काय ?

गाडगीळ—होईल.

भेंडे—नागपूरच्या सभेंत अत्रे यांच्यावर हल्ला झाला होता ?

गाडगीळ—मी तें वाचलें आहे.

भेंडे—त्यांच्यावर तेथें जोडे फेंकण्यांत आले होते ना ?

गाडगीळ—तें निश्चित नाहीं. पण हल्ला झाला होता.

१०-१-४२

पुरवणी पत्रें :—

# बापाचें मुलास पत्र !

( प्र. के अत्रे ह्या महापुरुषास जाणाऱ्या पत्रांचे स्वरुप अत्यंत विविध असून " नाटपेड " पत्रांपायीं त्यांस बसणारा भूर्दंड हा लक्षांत घेण्यासारखा आहे. " नवयुगांत ' न येवूं शकलेलीं कांहीं पत्रें वृत्तव्यवसायिकांतील बंधुभाव जाणून आम्हीं पुढें छापत आहोत. सक्रीय सहानुभूतीची ही खूण अत्रे ह्यांस कृतज्ञतेनें सद्गदित करील अशी आशा आहे !—संपादक )

चि. प्रल्हाद यांस,

आमच्या अंगावर जोड्याच्या नालेचे वण उमटले, तेव्हांच तुला कोठेंतरी खेटरले असावे अशी आमची निश्चिती पटली. जोडे तुझ्या तोंडावर, वळ आमच्या अंगावर टॉमटो तुझ्या पाठीवर, डाग आमच्या कपड्यांवर, लाथा तुझ्या कंबरेवर, दुःख आमच्या हृदयावर, हा प्रकार बरोबर आहे कां, ह्याचा आपणच विचार करावा, व ह्या महिन्यांत आपल्या प्रतापामुळें, ताकदी बाहेर फुगलेले आमचे धोब्याचे व डाक्टरचे बील तावडतोब पाठवून द्यावें. नाहींतर, " मारले तुम्हांला, जखमा महाराष्ट्रभर झाल्या " ह्या बेगुमान थापेच्या आम्हांस उघड इन्कार करावा लागेल. सूज्ञास अधिक काय लिहिणें ! कळावे—

आपला.
हिरण्यकश्यपू.

परलादराव मास्तर--
मेवेशी बाटाजी चांभार,

गेल्या महिन्यांत नव्या जुन्या व सर्व "मेकर" च्या खेटरांची आपणांस उत्तम प्राप्ति झाली असें नुकतेंच "छाप्यांत" वाचलें

ह्या बाबतींत आमी तुमच्याशीं कायमचे कंत्राट करूं इच्छितो. आपणास मिळालेली पायतणे, कमिशन वजा जाता घाऊक काय भावानें द्याल? तशीच ह्यापुढें आपणास वारंवार मिळणारी खेटरें, काय दरानें द्याल ? आपण चांगले भरंवशाचे आसामी दिसता. आपणाशी व्यवहार करावयास आमी फार उतावील आहोत. तरी उत्तर पाठवावें.

THE IDEAL ... CHABILDAS ROAD BOMBAY

आपला—
**बाटाजी चांभार**
**निशाणी डावा आंगठा**

**प्रह्लाद् वल्द केसव,**

ह्यांस " **टांग** " येथील संभू मानकापे, डाकूजी फरारे, इत्यादि रामोशी लोकांचे राम राम.

आपल्या किरतीचा वास अश्शी आंबलेल्या बेवड्यावानी आमच्या नाकांत घुसला, चिलमीचा धूर ज्या परमानें लपत नाहीं, त्या परमानें आपला नांव आमच्या पासून लपला नाहीं.

आमी रामोशी लोक येवडे उलट्या कालजाचे, दरोडेखोर, परंतु आमा-सबी, आपुन गुरुस्तानीं वाटता, आपल्यावीषीं आमास फार आदर आहे. आपल्यापून आमास पुष्कळ गोस्टी; सिकता येण्यासारख्या आहेत. आपन रामोश्याचे मुकूटमनी शोभन्यासारखे असतां, आपन बामनाच्या पोटीं जन्म घेतला ह्याविषीं फार वाईट वाटते. कायदा चुकवून धंदा कसा करावा हे आमास शिकविण्यासाठीं आपुन तावडतोब आमच्या " टांग " गांवीं यावें. येथें " विंग्रजी " मिळत नाहीं, परंतु " देशी " स कमी पडूं देणार नाहीं. सोबत **वणमालाबाईसही** घेऊन यावें. अनमान करूं नये. आमी लोक डाकू असलों, तरी नियतीचे साबूत आहोत, कळावें, तसदीची माफी व्हावी आपले—

संभू मानकापे, डाकूजी फरारे प्रभृति " टांग " गांवाचे रामोशी.

मिस्टर अत्रे ह्यास

सविनय प्रणाम—

आपण अमर झाल्याचें शुभवर्तमान नुकतेच आपल्या पत्रांत वाचलें. undertaker (मुडदेफरास) म्हणून आमचा लौकिक अखिल हिंदुस्थानांत गाजत आहे. आमच्या कामाविषयीं सर्व मुडद्यांनीं आम्हास एकमुखानें प्रशस्तिपत्र दिलें आहे. तरी आपली आम्हीं कांहीं सेवा करूं शकतो काय ते कळवावें !

त्याचप्रमाणें आम्हीं पुतळे उभारण्यांत व समाधी बांधण्यांत वाकबगार आहोत, इकडेही आपलें लक्ष असावें. कळावें. आपल्या कृपाळू उत्तराची पूँचेटवर वाट पाहणारे आम्हीं–आपले—

ग्रेव्ह. ग्रेव्हज्, व ग्रेव्हज्

प्रिय प्रल्हादपंत,

पुणें मुक्कामी कांहीं गुंड तरुणांनीं आपणांस बरेंच बदडून काढलें तें कळलें. आपणांस बदडल्यामुळें त्या गुंडास परमानंद जाहला असावा. इतरांस आनंद देण्यासाठीं देहकष्ट सोसण्याचें आपलें व्रत असेंच चालूं राहो अशी त्या जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना आहे. अधिक काय लिहूं ?

आपला—

म्हसोबा मानभावे.

ता. क.:—सोबत टिंचर आयोडीनचें एक पींप व बॅण्डेजच्या गाठाणी पाठवीत आहे. त्यांचा योग्य तो उपयोग करून घेत जावा.

म्ह. मा.

बेटा प्रल्हाद-

सोबतचे पत्र प्रिय वनमालेस देशील काय ? Now dont be jealous-you old dotard !

तुझा-

रंगराव फाकडे

वज्रचूडे मंडित

सौ. वनमाला

Via

प्रल्हाद के. अत्रे

प्रिय वनमाला,

बाबूला सर्वस्वी तुझ्या सुपुर्द केला होता हे विसरलीस काय ? हे बुजगबाहुलें इतक्या लवकर उलथून कसे चालेल ! ह्या ओळी मधला मजकूर ( Between the lines ) वाचशील व समजशील अशी आशा आहे.

तुझाच—

रंगराव फाकडे.

प्रल्हादपंत,

आपणास मार बसला. फार वाईट वाटले. मी आपला एक चाहता आहे. वनमालाबाईंचाही चाहता आहे. तरी आपण उभयतां चार दिवस माझे येथें रहावयास याल काय ! ह्या निमित्तानें तरी वनमालाबाईंचा ( व आपला ) अलभ्य सहवास घडेल. फार आतुर आहे. गावांत धोका नाहीं-म्हणजे लांडे विजारवाले नाहींत, त्यामुळें None But the Brave Deserves the fair हे तत्व अमलांत येण्याचा मुळींच संभव नाहीं, तरी यावे.

आपला

छटेलराव अंधारे

प्रिय मेहरबान,

आपल्या पत्रांतील अलीकडील लेख वाचून " सामाजिक नीति व भारतीयांचा धर्म " ह्या विषयांवर ग्रंथ लिहावयास फक्त आपणच लायक

आहांत, अशी आमची निश्चिती पटली आहे. तरी काय मोबदला घ्याल ? मोबदला रोख पाहिजे कीं in kind चालेल त्याचाही खुलासा व्हावा !

आपले विश्वासू

**लंबेअली, हिरवट ॲण्ड को.**

**धी प्रल्हाद केशव कंपनी, ब्रोकर्स व कमिशन एजंट्स,**

**प्रिय महाराज,**

आम्ही एक बायकोनें टाकून दिलेले विधुर आहोंत. आम्ही फार दुर्दैवी आहोत. आमच्या पदरीं चार कच्ची बच्ची आहेत, तरी ओल्या दाईचें ( Wet-Nurse ) व गव्हर्नेसचें काम जाणणारी एखादी तरुणी पुरवूं शकाल काय ! आपल्या सेवेविषयीं योग्य तो मुशाहिरा देण्यांत येईल तरी तत्काळ उत्तर पाठवावें.

आपले विश्वासू

**सर्जेराव जाधव**

ता. क.:--आमचें स्वतःचे शिक्षणही फारसे झालेलें नाहीं. तरी सदरहू मास्तरीण आमच्या उपयोगी पडून आम्हांसही शास्त्रपारंगत करून सोडील अशी असावी. सुज्ञास बहुत काय सांगावें ? --स. जा.

**प्रिय, मिस्टर अत्रे:--**

महायुद्धाच्या निमित्तानें कांचेचा भाव फारच कडाडला आहे. दारू उडवून शिल्लक उरलेल्या आपल्या बाटल्या आम्हांस पुरविण्याविषयीं विनंति आहे. काय दरानें द्याल ?

—विश्वासू

फर्दून दारूवाला.

" आदेश "

१५-११-४१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. .... ....

# अत्रे, पत्रे, व तारा !

( अत्र्यांनीं बेदम मार खाल्ल्यामुळें साऱ्या महाराष्ट्राचें आंग दुखूं लागलें व पोस्टाच्या उत्पन्नांस तेजी आली. स्थलाभावामुळें " नवयुगांत " ने आलेली पत्रें पुढें देत आहोंत. )

प्रिय प्रल्हाद !

—काय सांगू तुला ! मार तूं खाल्लास पण जखमा महाराष्ट्रभर झाल्या. दारु तूं प्यालास-घाण महाराष्ट्रभर पसरली; अश्रू तूं ढाळलेस, हातरुमाल मात्र महाराष्ट्राचे खराब झाले. शिकार तुझी झाली, मजा महाराष्ट्रास वाटला !— Hearty consolations

—राघूपंत रडतोंडे

प्रिय पि. के.

मोठा मजा उडवलास बुवा ! आतां मात्र तूं अखिल महाराष्ट्राला पोट धरून हंसवलेस—आणि तेही पी. जी. वुडहाउसची मदत न घेतां ! टोमॅटो आणि जोडे ह्यांनीं रंगलेली तुझी विनोदमूर्ति प्रत्यक्ष पहावयास न मिळाल्यामुळें राहून राहून वाईट वाटते ! पुन्हां तुझा " शो " कुठें असला तर तार कर बरं कां ?

तुझाच

—जी. के.

महात्मा अत्रे:—

खरेंच सांगावयाचें ह्मणजे दारुबाज गुंड प्रतिपक्षाच्या सभेत सोडून धमाल माजविण्याचे उदाहरण आपण गांधीजनांनीच घालून दिलें होतें. पण ह्या लबाड हिंदुत्वनिष्ठांनीं फॅसिस्ट वळणावर जाऊन आपली टांग आपल्याच गळ्यांत घालावी ह्मणजे काय ? आतां लोकशाही व भाषणस्वातंत्र्य ह्यांचं काय होणार ? त्याचप्रमाणें आपलें काय होणार ? कोट फाडल्याचे दुःख नाहीं. पण काळ सवकतो. ह्मणून विचारीत आहे. सुभाष आणि खरे ह्यांना ज्या उदार पद्धतीनें वागविण्यात आलें, ती पद्धतच आपण अधिक विकसित करावी काय ?

—महात्मा बातरे

प्रिय प्रिन्सिपॉल,

मला खाण्यापिण्याचा नाद आहे. पिण्याच्या नादामुळें मला भाषण स्वातंत्र्याविषयीं अभिमान उत्पन्न झाला आहे. मी एक विवाहित बाईही ठेवली आहे. त्यामुळें प्रचलित समाज व्यवस्था, नीति कल्पना, धर्मसंस्था इत्यादि जुनाट व प्रतिगामी गोष्टीं विषयीं माझ्या मनांत भयंकर राग उत्पन्न झाला असून समाजवाद हा मला सख्ख्या भावासारखा वाटतो. गांधी पंथांत मला जागा मिळणार नाहीं अशी आतांपर्यंत शंका वाटत होती. ती आपल्या पुण्यप्रतापानें दूर झाली आहे. इतरवेळीं खावयास प्यावयास नीट मिळाल्यास रुची पालट म्हणून मार खावयास माझी ना नाहीं ! तरी माझ्या अर्जाचा दयार्द्रपणें विचार करुन मला आपल्या School मधें सामील करुन घ्याल काय ?

--टॉम ताडीवाले.

प्रिय अत्रे :--

मार आपण खाल्ला.-दुःख आम्हांस झालें. अंडी आपणावर पडली-ऑमलेट आम्हीं खाल्लें ! पुस्तकें आपण लिहिलीं- दंड आम्हांस झाला ! पळ आपण काढला-पाय आमचे दुखले ! टेंगूळ आपणांस आले-हळद आम्हांस लागली ! मिरची आपणांस झोंबली-आग आमची झाली !

—श्री. व सौ. सदाफूल.

तार नं.--१

मेलास कीं जिवंत आहेस ! मेला नसलास तर मर-म्हणजे तरी सुटेन व पुनर्विवाहाची सोय होईल !

तार नं.--२

--तरी मी सांगत नव्हतो ?

" आदेश "
११-१०-४१

काहीं वृत्तपत्रीय अभिप्राय

# *रक्त आणि अश्रु*

लेखकः पुरुषोत्तम भास्कर भावे

"—सावधान साप्ताहिकाला ज्या लेखनकुसरीमुळें तेजस्विता आली, त्या लेखनकुसरीचे श्री. भावे ह्यांच्या लेखणीतून उतरलेले हे नमुने वाचकाचे रक्त सळसळविणारे आणि डोळ्यांना सजल करणारे असेच आहेत. कै. भावकर यांचे स्वभावचित्र हा या संग्रहातील कोहीनूर आहे. मराठी भाषा शब्द-दारिद्री आणि अर्थवाहकतेंत पंगू आहे; अशी तक्रार करणाऱ्यांनी हे स्वभावचित्र वांचून मराठी रसवंतीच्या वैभवाची साक्ष पटवून घ्यावी"

विविधवृत्त
२-८-४२

---

"कै. शिवराम महादेव परांजपे ह्यांच्या लेखणीतून खालीं दिलेला लेख उतरलेला असेल अशी ज्यांना खात्री वाटत असेल, त्यांना आम्ही थोडा विस्मयाचा धक्का देतो. या उत्कृष्ट राजकीय लेखाचे लेखक श्री. पुरुषोत्तम भास्कर भावे यांनी आपल्या प्रतिभाशाली व शब्दकुसर लेखणीनें शिवरामपंत अच्युतराव, यांची उज्वल परंपरा पुढें चालविली याबद्दल त्यांचे अभिनंदन केलें पाहिजे"

—चित्रा
१७-१-४२

---

" पुस्तकांतला प्रत्येक शब्द म्हणजे प्रत्येक हिंदु अंतःकरणाला भर आणणारे मंत्रच म्हटले पाहिजेत ...लेख अत्यंत चटकदार, नावीन्यपूर्ण आणि तडफेने लिहिलेले आहेत. विशेषतः श्री. मावकरांच्या हृदयद्रावक मृत्युव लिहिलेला शेवटचा वीस पानी मृत्युलेख म्हणजे मावळ्यांच्या भाषेनें कोणत्याहि पत्तरहृदयी माणसास केलेले आव्हान होय. शेवटची पाने वाचतांना वाचकाच्या डोळ्यांतून अश्रु येतात. शक्य असते तर रक्तहि आले असते."

--( पु. रा. भिडे. )
—झंकार
३-५-४२

---

"-- याशिवाय त्यांच्या लेखनांत सुरेलपणा व रंगेलपणा यांचे जे विलक्षण मिश्रण आहे ते विलोभनीय आहे. शेवटचे दोन लेख तर या पुस्तकांतील सर्वोत्कृष्ट लेख ठरतील. एवढेच नव्हे, तर अशा तऱ्हेचे जे कांहीं उत्तम लेख मराठींत सांपडतील, त्यांत त्यांना स्थान मिळेल. हा लेख इतका सुरेख उतरला आहे कीं, त्यांतला अमुक उतारा वाचा असे सांगणेच अवघड आहे, आणि तो बाकीच्या लेखाचा अपमान आहे. हिंदुत्वनिष्ठ मराठी वाचकांना आमचे आग्रहाचे सांगणे आहे कीं, " रक्त आणि अश्रु " चे चिंतन स्वतःच्या मनोभावनांवर करावयाचा क्रम ठेवा म्हणजे तुमच्या मनाचा तजेला कायम राहील."

— वाङ्मय-शोभा
१५-११-४२

---